सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
लातूर | सोमवार, २ फेब्रुवारी २०२६ । वर्ष ३ रे अंक ३३३ । पाने १२ । किंमत रु. ६/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



संघाचे काम करण्याची आपल्या सर्वांची जबरदस्त आकांक्षाच आपल्या कामाची प्रेरणा आहे. उत्तम कार्यकर्त्याचे मुख्य लक्षण आहे कार्याबद्दल दृढसंकल्प. ज्याला आपल्या ध्येयाची स्पष्ट कल्पना आहे. जो त्या ध्येयाच्या परिपूर्तीसाठी योग्य दिशेने वाटचाल करत असतो. तसेच टप्प्याटप्प्याने आपल्या कामाचा आढावा घेत असतो. तोच आपले ध्येय गाठण्यात यशस्वी होतो.

**- हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

# रिफॉर्म एक्सप्रेस सुसाट

**अर्थसंकल्पात विकसित भारताचे प्रतिबिंब | संरक्षणासाठी ७.८० लाख कोटींची तरतूद | आयकर रचनेत कुठलाही बदल नाही | कर चुकविणाऱ्यांना शिक्षेऐवजी ३० टक्के दंड | नवा आयकर कायदा १ एप्रिलपासून लागू**

## निर्मला सीतारामन् यांनी सादर केला सलग नववा अर्थसंकल्प

◆ **नवी दिल्ली, १ फेब्रुवारी**

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी रविवारी देशाचा सर्वसाधारण अर्थसंकल्प लोकसभेत सादर केला. सर्वसामान्य आणि पगारदार वर्गासाठी महत्त्वाच्या असलेल्या आयकर रचनेत कुठलाही बदल न करता सीतारामन् यांनी या संकल्पात भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनविण्यासाठी ठोस आराखडा सादर केला. त्याचवेळी नवा आयकर नियम आणला. तो १ एप्रिलपासून लागू होणार आहे. आयकर चुकविणाऱ्यांना आतापर्यंत असलेली शिक्षेची तरतूद रद्द करताना ३० टक्के दंडाची तरतूद यात करण्यात आली आहे. सोबतच, चीन आणि पाकिस्तानचा धोका ओळखून सीतारामन् यांनी संरक्षण मंत्रालयासाठी ७.८० लाख कोटी रुपयांची भरीव तरतूद केली. ही तरतूद मागील वर्षीच्या तुलनेत एक लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. सुरक्षा दलांना अद्ययावत करण्यासाठी अर्थसंकल्पात २.१९ लाख कोटींची तरतूद करण्यात आली आहे.**

आपला सलग नववा अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्री सीतारामन् यांनी आयटीआर दाखल करण्याच्या अंतिम मुदतीत वाढ करण्याची घोषणा केली. आयटीआर-१ आणि आयटीआर-२ आता ३१ जुलैपर्यंत दाखल करता येणार आहे. तसेच ऑडिट नसलेला व्यवसाय प्रकरणे आणि ट्रस्टसाठी रिटर्न दाखल करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट असेल. मालमत्ता विकणाऱ्या एनआरआयसाठी टीडीएस नियमांमध्येही बदल करण्यात आला. पूर्वी आवश्यक असलेला टीएएन आता आवश्यक राहणार नाही.



### स्मार्टफोन, टॅबलेट, टीव्ही, एसी स्वस्त होणार

सीतारामन् यांनी देशांतर्गत उत्पादनाला चालना देणे, कररचना सोपी करणे आणि ग्राहकांना काही प्रमाणात दिलासा देणे यावर भर दिला. यात स्मार्टफोन, टॅबलेट, टीव्ही आणि एअर कंडिशनर यासारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंवरील आयात कर कमी करून ग्राहकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला. विशेषतः स्मार्टफोन, टॅबलेट, टीव्ही आणि एसी या वस्तू आयात करताना करभार कमी होणार आहे.

### मधुमेह, कॅन्सरची औषधे होणार स्वस्त




सीतारामन् यांनी देशातील मधुमेह, कॅन्सर यासारख्या आजारांची भीषणता लक्षात घेत, या दुर्धर आजारांसाठी कमी दरात औषधे उपलब्ध करणार असल्याची घोषणा केली.

### वैयक्तिक आयातीवरील कस्टम ड्युटी अर्ध्यावर



या अर्थसंकल्पातील सर्वांत मोठा निर्णय म्हणजे, वैयक्तिक वापरासाठी आयात होणाऱ्या वस्तूंवरील कस्टम ड्युटी २० टक्क्यांवरून १० टक्के करण्यात आली आहे. यामुळे परदेशातून थेट खरेदी केलेल्या किंवा ऑनलाईन आंतरराष्ट्रीय वेबसाईटवरून मागवलेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंवरील कर कमी होणार आहे.

### शेअर बाजारात भूकंप



अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने शेअर बाजाराचे विशेष सत्र आयोजित करण्यात आले होते. अर्थसंकल्पात ऑप्शन अँड फ्युचर्सवरील एसटीटी वाढवण्याचा निर्णय सीतारामन् यांनी जाहीर केला. यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टीत मोठी घसरण झाली. सेन्सेक्समध्ये १५४६.८४ तर, निफ्टीत ४९५ अंकांनी घसरण झाली. ■

### मत्स्यव्यवसायाला बळकटी

अमेरिकेने लादलेल्या आयात शुल्काच्या पृष्ठभूमीवर आणि भारतीय सागरी उत्पादनांच्या निर्यातीला बसलेला फटका लक्षात घेता मासेमारांना मासेमारीवर शुल्क माफी दिली आहे. त्याचबरोबर मत्स्यव्यवसायाला बळकटी देण्यासाठी सरकार ५०० जलाशयांचा एकात्मिक विकास करणार आहे. मासेमारी आणि त्याची विक्री व्यवस्था सुधारण्यासाठी स्टार्टअप्स, महिला बचत गट आणि मत्स्यपालक संस्थांना बाजारपेठेशी जोडले जाईल. (वृत्तसंस्था)






आजचा अर्थसंकल्प ऐतिहासिक आहे. तो १४० कोटी भारतीयांच्या आकांक्षेचे प्रतिबिंब आहे. तो सुधारणांच्या प्रवासाला बळ देतो आणि विकसित भारतासाठी एक स्पष्ट आराखडा सादर करतो. हा अर्थसंकल्प २०४७ पर्यंत विकसित भारत घडवण्याच्या दिशेने आमच्या प्रवासाचा पाया आहे.या वर्षीचा अर्थसंकल्प भारताच्या सुधारणांच्या वाहनाला नवीन ऊर्जा आणि गती देईल.
**नरेंद्र मोदी,** पंतप्रधान



केंद्रीय अर्थसंकल्पात शेतकरी, युवक तसेच एमएसएमई उद्योगांवर लक्ष केंद्रित करणारा एक निर्णायक आराखडा मांडण्यात आला. उत्पादकता, स्पर्धात्मकता आणि उद्योजकतेला चालना देणाऱ्या तसेच भारताला जागतिक उत्पादन आणि नवोपक्रमाचे नेतृत्व करणाऱ्या देशांच्या यादीत स्थान मिळवून देणाऱ्या या आर्थिक धोरणाबद्दल मी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांचे मनःपूर्वक आभार मानतो.
**नितीन गडकरी,** केंद्रीय मंत्री



उत्पादनापासून पायाभूत सुविधांपर्यंत, आरोग्यापासून पर्यटनापर्यंत, ग्रामीण भागापासून कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंत, खेळांपासून तीर्थक्षेत्रांपर्यंत विकसित भारताचे बजेट प्रत्येक गाव, प्रत्येक शहर, प्रत्येक नगरातील तरुण महिला आणि शेतकऱ्यांच्या स्वप्नांना बळ देणारे आणि ती स्वप्ने साकार करण्यास सक्षम करणारे आहे. आत्मनिर्भर भारत आपल्या सरकारचा संकल्प असल्याचे या अर्थसंकल्पातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सिद्ध केले.
**अमित शाह,** केंद्रीय गृहमंत्री



मोदी सरकारकडे कल्पनांची वानवा आहे आणि यंदाच्या अर्थसंकल्पात भारतासमोरील अनेक आर्थिक, सामाजिक आणि राजकीय आव्हानांवर एकही उपाय सांगितलेला नाही. असमानतेने ब्रिटिश राजवटीत दिसलेल्या पातळीलाही मागे टाकले आहे. परंतु, अर्थसंकल्पात याचा साधा उल्लेखही नाही किंवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना कोणताही पाठिंबा दिलेला नाही.
**मल्लिकार्जुन खडगे,** काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष



२०२६-२७ चा केंद्रीय अर्थसंकल्प भारताच्या खऱ्या संकटाकडे दुर्लक्ष करणारा आहे. तरुणांकडे नोकऱ्या नाहीत, उत्पादन घटत आहे तसेच शेतकरी संकटात आहेत. नोकरी नसलेले तरुण, उत्पादन क्षेत्रात घट होत आहे. गुंतवणूकदार भांडवल काढून घेत आहेत. कौटुंबिक बचतीत मोठी घट झाली. शेतकरी संकटात आहेत. येऊ घातलेल्या जागतिक धक्क्यांकडे दुर्लक्ष केले जात आहेत.
**राहुल गांधी,** लोकसभेतील विरोधी पक्षनेते

## महत्त्वाचे

### चांदी दोन दिवसांत १.३६ लाखांनी स्वस्त



**नवी दिल्ली** : सोने-चांदीच्या बाजारात सलग दुसऱ्या दिवशी घसरण झाली . रविवारी म्हणजेच १ फेब्रुवारी रोजी अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वी सकाळच्या सत्रात मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर चांदी २६ हजार रुपयांनी (९ टक्क्यांनी) घसरली. १ किलो चांदीचा भाव २,६५,६५२ रुपयांवर व्यवहार करत आहे. सोन्यातही रविवारी सकाळच्या सत्रात १२ हजार रुपयांची (८ टक्के) घसरण झाली आहे. १० ग्रॅम सोने १.३८ लाख रुपयांवर व्यवहार करत आहे. सोन्या आणि चांदीच्या ईटीएफमध्येही २९ टक्क्यांपर्यंतची घसरण नोंदवली गेली आहे. ■

### मणिपूरमध्ये सरकार स्थापनेच्या हालचालीला वेग

**इम्फाळ** : मणिपूरमध्ये सरकार स्थापन करण्याच्या चर्चेसाठी माजी मुख्यमंत्री एन, बिरेन सिंह यांच्या नेतृत्वात २० पेक्षा अधिक भाजपा आमदार केंद्रीय नेतृत्वाची भेट घेण्यासाठी रविवारी राजधानी दिल्लीत पोहोचले. राज्यातील राष्ट्रपती राजवटीचा कार्यकाळ १२ फेब्रुवारी रोजी संपत असल्याने सत्तास्थापनेसाठी दिल्लीत होणारी ही बैठक महत्त्वाची आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वात रालोआ आमदारांची बैठक सोमवारी सायंकाळी होणार आहे. भाजपा आमदार एच. डिंगो म्हणाले, बैठक सोमवारी सायंकाळी होणार आहे, परंतु अद्याप अजेंडा जाहीर झालेला नाही. आम्हाला आजच दिल्लीला पोहोचण्यास सांगण्यात आले. दरम्यान मे २०२३ पासून मणिपूरमधील परिस्थिती तणावपूर्ण आहे. मैतेई आणि कुकी समुदायांमधील जातीय हिंसाचारात २६० हून अधिक लोक मृत्युमुखी पडले आणि हजारो लोक विस्थापित झाले. एन. बिरेन सिंह यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर केंद्र सरकारने गेल्या वर्षी १३ फेब्रुवारी रोजी राज्यात राष्ट्रपती राजवट लागू झाली. ■



### कर्करोग- मधुेहाची औषधे होणार स्वस्त

**नवी दिल्ली** : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी देशात औषधनिर्मिती क्षेत्राला बळकटी देण्यासाठी पुढील पाच वर्षांत १० हजार कोटींच्या एसएमई विकास निधीची घोषणा केली. यामुळे कर्करोग, मधुेहासह एकूण १७ औषधी स्वस्त होणार आहेत. भारताला जागतिक औषधीचे उत्पादन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी बायो फार्मा शक्ती योजना आणली जाईल, यामुळे जैविक आणि बायोसिमिलरच्या देशांतर्गत उत्पादनासाठी एक मजबूत इकोसिस्टम तयार होईल. जिवंत पेशी आणि ऊतींपासून बनण्यात येणाऱ्या औषधींच्या निर्मितीसाठी सरकार आर्थिक मदत करणार आहे. ही औषधे गंभीर आजारांवर उपचार करण्यासाठी वापरली जातात.

**१ एप्रिलपासून आयकर कायद्याची होणार अंमलबजावणी : अर्थमंत्री**

**सेमीकंडक्टरमध्ये भारताचा मास्टरस्ट्रोक!**




**कोणत्या योजनेसाठी किती पैसे?**

**शेजाऱ्यांना काय-काय मिळाले?**

**आता महिला लाभार्थी नव्हे, 'आर्थिक भागीदार'**

वृत्त पान ३




### स्वस्त

- कर्करोगाची औषधे, सात दुर्मिळ आजारांशी संबंधित औषधे, वैद्यकीय उत्पादने आणि विशेष वैद्यकीय उद्देशांसाठीचे अन्न.
- वैयक्तिक वापरासाठी आयात केलेली औषधे
- मायक्रोवेव्ह ओव्हनसाठी प्रमुख घटक
- विमानांच्या इंजिनांसह इतर घटक किंवा भाग
- सौर काचेचे घटक
- अणुऊर्जा प्रकल्पांसाठी आयात केलेले साहित्य
- महत्त्वपूर्ण खनिजांसाठी भांडवली वस्तू ■

### महाग

- कमी किमतीच्या आयातीत छत्र्या
- पोटॅशियम हायड्रोक्साईड
- एटीएम/कॅश डिस्पेंसर मशीन आणि त्याचे भाग व घटक
- विदेशी चमूंसाठी चित्रपट आणि प्रसारण उपकरणे
- आयात केलेले प्राणी आणि पक्षी
- अमोनियम फॉस्फेट/ खते आणि नाफ्था म्हणून खतांचा वापर
- कॉफी भाजण्याची, बनवण्याची आणि विकण्याची यंत्रे
- एरंडेल तेल केक ■

# कृषीसाठी १.४० लाख कोटी

## पशुपालक, मत्स्यपालन व्यावसायिकांना आर्थिक पाठबळ

◆ **नवी दिल्ली, १ फेब्रुवारी**

यावर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रासाठी १.४० लाख कोटींची आर्थिक तरतूद केली. यात अल्पभूधारक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यावर भर देण्यात आला. सिंचन क्षेत्रात वाढ करण्यासाठी ५०० जलाशयांची निर्मिती, अमृत सरोवर एकात्मिक योजनांचा विस्तार आणि पशूसपालक व मत्सपालन व्यावसायिकांना आर्थिक पाठबळ देण्यासाठी अनेक तरतूदींचा समावेश करण्यात आला. सागरी किनारी भागात मत्स्यपालन मूल्य साखळी मजबूत केली जाणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.



### भारत कार्यक्रम ॲपची घोषणा

शेतकऱ्यांना आधुनिक आणि सेंद्रीय आधारित शेतीसाठी प्रोत्साहित करण्यासाठी भारत कार्यक्रम नावाने ॲप सुरू केले जाईल. यात विविध भाषेतून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे. ग्रामीण महिलांच्या नेतृत्वाखालील उद्योगांसाठी स्वयं मदत उपक्रम सुरू करण्याची घोषणा सीतारामन् यांनी केली. ■

### पशुसंवर्धन क्षेत्रासाठी कर्ज आधारित अनुदान

स्टार्टअप्स आणि महिला नेतृत्वातील उद्योग गटांना कृषी क्षेत्राशी संबंधित बाजारपेठेशी जोडले जाईल. पशुपालन क्षेत्रासाठी कर्ज आधारित अनुदान कार्यक्रम नवीन आर्थिक वर्षांत सुरू केला जाणार आहे. पशुधन उद्योगांचे आधुनिकीकरण आणि आर्थिक मदत करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे आणि यातून पशुधन शेतकरी उत्पादक संघटनांना प्रोत्साहन दिले जाईल.

### नारळ, चंदन, काजू पिकांसाठी प्रोत्साहन योजना

नारळ, चंदन आणि काजूसारख्या पिकांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष तरतूद करण्यात आली. नारळ उत्पादनात स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी नारळ प्रोत्साहन योजना सुरू केली जाईल. भारतीय काजू आणि कोको उत्पादनांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध करण्यासाठी समर्पित कार्यक्रम सुरू करणार आहे. चंदनाच्या शेतीसाठी राज्यांना सहकार्य केले जाईल, तसेच अक्रोड, बदामाचे उत्पादन वाढवण्यासाठी विशेष कार्यक्रम सुरू केला जाणार आहे. (वृत्तसंस्था)

# देशात ७ हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर

◆ **नवी दिल्ली, १ फेब्रुवारी**

देशातील दळणवळण व्यवस्था अधिक वेगवान आणि आधुनिक करण्यासाठी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी आपल्या अर्थसंकल्पात हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉरच्या विस्तारावर विशेष भर दिला असून, देशातील प्रमुख शहरांमधील प्रवासाचे अंतर कमी करण्यासाठी सात नवीन हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर बनवण्याची घोषणा केली. अर्थसंकल्पात भारतीय रेल्वेसाठी २,९३,०३० कोटी रुपयांच्या निधीची घोषणा करण्यात आली. रेल्वेसाठी हा आतापर्यंतचा सर्वात मोठा निधी आहे.

सध्या सुरू असलेल्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या पृष्ठभूमीवर आता देशाच्या इतर भागांनाही हाय-स्पीड रेल्वेने जोडण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. यात मुंबई ते पुणे मार्गामुळे महाराष्ट्रातील दोन प्रमुख शहरांमधील प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होणार आहे. याशिवाय, दक्षिण भारताला जोडण्यासाठी पुणे ते हैदराबाद कॉरिडॉर महत्त्वपूर्ण ठरणार आहे. सोबतच, दक्षिण भारतातील हैदराबाद ते चेन्नई हे दोन मोठे आयटी हब आता हाय-स्पीडने जोडली जाणार आहेत. उत्तर भारतातील धार्मिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या शहरांसाठी दिल्ली ते वाराणसी हा कॉरिडॉर महत्त्वाचा ठरणार आहे. वाराणसी ते सिलिगुडी या ईशान्य भारताच्या प्रवेशद्वारापर्यंत रेल्वेचे जाळे विस्तारले जाणार आहे. तसेच, हैदराबाद-बंगळुरू आणि चेन्नई-बंगळुरू या कॉरिडोरचाही यात समावेश आहे. (वृत्तसंस्था)



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### गुगल देणार डेटाचोरीपासून संरक्षण

**नवी दिल्ली** : गुगलने वापरकर्त्यांसाठी दोन मोठे अपडेट्स लॉन्च केले आहेत. एकीकडे अँड्रॉइडमध्ये मजबूत 'थेफ्ट प्रोटेक्शन' फीचर देण्यात आले आहेत तर दुसरीकडे जीमेलमध्ये आता जेमिनी एआयचा प्रवेशी झाला आहे. एक अपडेट फोन चोरी झाल्यास डेटा आणि पैशांचे संरक्षण करण्यावर लक्ष केंद्रित करते, तर दुसरे जीमेल इनबॉक्सला एआय असिस्टंटमध्ये बदलण्यावर भर देते. गुगल बायोमेट्रिक सुरक्षेला मजबूत करत आहे. चोरी झाल्यास बँकिंग-फायनान्ससारखे थर्ड-पार्टी ॲप्स उघडण्यासाठी फिंगरप्रिंट/पिन आवश्यक असेल. जर कोणी वारंवार चुकीचा पिन टाकण्याचा प्रयत्न केला, तर फोन आता दीर्घकाळासाठी आपोआप लॉक होईल.

### इंडोनेशियात लग्नापूर्वी संबंध ठेवल्याबद्दल शिक्षा

**आचे** : इंडोनेशियातील आचे प्रांतात शरिया कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल एका अविवाहित जोडप्याला सर्वांसमोर १४० फटके मारण्यात आले. लग्नापूर्वी संबंध ठेवल्याचा आणि दारू प्यायल्याचा आरोप त्यांच्यावर होता. शिक्षेदरम्यान ती तरुणी बेशुद्ध पडली. तीन महिला अधिकाऱ्यांनी तिला आळीपाळीने छडीने मारले. तिची प्रकृती बिघडल्याने तिला रुग्णवाहिकेतून रुग्णालयात नेण्यात आले. या सार्वजनिक शिक्षेत एकूण ६ लोकांना फटके मारण्यात आले. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांमध्ये शरिया पोलिसाचा एक अधिकारी आणि त्याची महिला साथीदार यांचाही समावेश होता. दोघांना खासगीत एकत्र आढळल्याच्या आरोपाखाली प्रत्येकी २३ फटके मारण्यात आले. आचेच्या इस्लामिक पोलिसांनी सांगितले की, त्या अधिकाऱ्याला नोकरीवरूनही काढण्यात येईल.

### समाज माध्यम क्रिएटर्स जगतातील सर्वांत मोठा करार

**ट्यूरिन** : सोशल मीडियावरील सर्वात मोठ्या चेहऱ्यांपैकी एक असलेले खाबी लॅम आता एआयच्या जगात एक नवीन अध्याय लिहिणार आहेत. २०२० मध्ये ओव्हर-द-टॉप लाइफ हॅक्सवर न बोलता प्रतिक्रिया देऊन चर्चेत आलेले २५ वर्षीय लॅम आता डिजिटल ट्विनच्या माध्यमातून व्हर्च्युअल अवतारात समोर येणार आहेत. इटलीचे प्रभावशाली लॅम यांनी हाँगकाँगच्या एआय कंटेंट फर्म रिच स्पार्क होल्डिंग्ससोबत सुमारे ८,९६१ कोटी रुपयांचा ऐतिहासिक करार केला आहे. यामध्ये त्यांनी त्यांच्या ब्रँडिंग, फेस आयडी, व्हॉइस आयडी आणि बिहेवियरल मॉडेल्सच्या वापरास मान्यता दिली आहे. आता एआयद्वारे त्यांचा व्हर्च्युअल चेहरा तयार होईल, जो लाइव्हस्ट्रीमिंग आणि अनेक भाषांमध्ये कंटेंट तयार करू शकेल. सोशल मीडिया क्रिएटर्सच्या जगात हा सर्वात मोठा करार मानला जात आहे. हे डिजिटल व्यक्तिमत्व हक्कांच्या भविष्याला दिशा देऊ शकते.

### गायीला राज्यमाता बनवण्याची अविमुक्तेश्वरांची मागणी

**लखनौ** : शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी यूपीचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना पंतप्रधान बनण्यासाठी पाठिंबा देण्याची ऑफर दिली. त्यांनी शनिवारी सांगितले की, जर योगींना स्वतःला खरा हिंदू सिद्ध करायचे असेल, तर त्यांनी गाईला राज्यमाता घोषित करावे आणि गोमांसावर पूर्णपणे बंदी घालावी. आम्ही योगींना ४० दिवसांचा वेळ दिला आहे.अविमुक्तेश्वरानंद म्हणाले की, असे केल्यास ते योगींचे नाव पंतप्रधानपदासाठी पुढे करतील. त्यांनी इशारा दिला की, जर योगी हा निर्णय घेऊ शकले नाहीत, तर संत समाज त्यांना रद्द करण्याचे काम करेल.



### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,६०,१०० |
| **चांदी** (प्रतिकिलो) | रु. ३,०५,९०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३१.६ | १९.५ |
| अमरावती | ३३.२ | १४.९ |
| भंडारा | -.- | १५.० |
| बुलडाणा | ३०.६ | १७.५ |
| चंद्रपूर | ३२.४ | १६.८ |
| गडचिरोली | ३१.२ | १५.६ |
| गोंदिया | ३०.६ | १३.२ |
| नागपूर | ३१.२ | १३.४ |
| वर्धा | ३१.९ | १५.२ |
| वाशीम | ३१.२ | १५.४ |
| यवतमाळ | ३१.४ | ११.८ |

# दुर्मिळ खनिजांसाठी कॉरिडॉर उभारणार

**चार राज्यांत ४२ हजार कोटींची गुंतवणूक | चीनवरील अवलंबित्व संपुष्टात येणार | खाणकाम, प्रक्रिया, संशोधन, उत्पादनाला प्रोत्साहन**






◆ **नवी दिल्ली, १ फेब्रुवारी**

२०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात रेयर अर्थ अर्थात् दुर्मिळ पृथ्वी खनिजे शोधणे आणि त्यावर प्रक्रिया करण्यासाठी ४२ हजार कोटींची गुंतवणूक करण्यात येईल. यातून ५० हजार रोजगार निर्माण होतील. चीनवरील अवलंबित्व संपुष्टात आणण्याच्या उद्देशाने पहिल्यांदाच या क्षेत्रासाठी भरीव निधी जाहीर करण्यात आला. दुर्मिळ पृथ्वी खनिजांच्या क्षेत्रात देशाचे स्थान मजबूत करण्यासाठी कॉरिडॉर उभारण्यात येईल. तामिळनाडू, ओडिशा, आंध्र प्रदेश आणि केरळ यांना जोडण्यासाठी डेडिकेटेड रेयर अर्थ कॉरिडोरची घोषणा अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी केली. ही राज्ये समुद्रकिनाऱ्यावरील वाळूमध्ये मोनाझाइट साठ्यासाठी प्रसिद्ध आहेत, ज्यामधून दुर्मिळ घटक काढले जाणार आहेत. नोव्हेंबर २०२५ मध्ये यासंदर्भातील योजना सुरू करण्यात आली, असा उल्लेख करत अर्थमंत्र्यांनी सांगितले की, आम्ही खनिजांनी समृद्ध राज्यांना खाणकाम, प्रक्रिया, संशोधन आणि उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी डेडिकेटेड रेयर अर्थ कॉरिडोर बांधण्याचा प्रस्ताव ठेवला आहे.

**बांधकाम उपकरणे उत्पादनाला प्रोत्साहन**


बांधकाम आणि पायाभूत सुविधा उपकरणे उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी एक नवीन योजना सुरू करण्यात येणार आहे. यामुळे मेट्रो आणि उंचावरील रस्त्यांच्या खोदकामासाठी बोरिंग मशीन यासारख्या उच्च मूल्याच्या आणि तांत्रिकदृष्ट्या प्रगत उपकरणांचे देशांतर्गत उत्पादन वाढेल. तसेच पायाभूत सुविधा प्रकल्पांचा वेग आणि गुणवत्ता सुधारेल, तसेच आयातीवरील अवलंबित्व कमी होईल. (वृत्तसंस्था)

### ई-वाहने, मोबाईलनिर्मिसाठी मदत

दुर्मिळ खनिजे १७ घटकांचा समूह आहे जे स्मार्टफोन आणि इलेक्ट्रिक वाहनांसारख्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्सपासून ते लढाऊ विमानांपर्यंत वापरले जाते सध्या जागतिक बाजारात या खनिजांत चीनचा दबदबा आहे. जगभरातील उत्पादनात चीनची भागीदारी ९० टक्के आहे. त्यामुळे ही खनिज साठे शोधण्यासाठी आणि उत्पादन करण्याला प्राधान्य आहे.

### उपक्रमाची उद्दिष्टे काय?

- विद्युत वाहने, पवन टर्बाइन, संरक्षण उपकरणे, इलेक्ट्रॉनिक्स आणि स्वच्छ ऊर्जेसाठी दुर्मिळ पृथ्वी घटक महत्त्वाचे आहे
- दरवर्षी ६,००० टनांच्या एकात्मिक उत्पादन क्षमतेसाठी ७,२८० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. हा कॉरिडॉर या योजनेचा विस्तार आहे.
- डेडिकेटेड रेयर अर्थ कॉरिडोरची सुरुवात केरळ येथून होणार आहे. ज्याचा उद्देश आवश्यक खनिज प्रक्रिया आणि उत्पादनासाठी एकात्मिक इकोसिस्टम तयार करणे आहे
- भारताच्या धोरणात्मक साहित्यासाठी पुरवठा साखळी मजबूत करणे, स्वच्छ ऊर्जा तंत्रज्ञानाला समर्थन देणे आहे, रेयर अर्थ कॉरिडोर विझिंजम बंदराला चावरा आणि कोचीशी जोडेल.
- चुनखडी, मॅग्नेसाइट, ग्रेफाइट, बॉक्साइट, लोहखनिज, व्हर्मिक्युलाइट, ग्रॅनाइट, चिकणमाती, सिलिका वाळू, लिग्नाइट, मोनाझाइट, रुटाइल, इल्मेनाइट सारख्या खनिजांचे देशातच उत्पादन होईल.



# दहा हजार कोटींतून लघु उद्योगांचा कायापालट

**ऑरेंज इकॉनॉमीला प्रोत्साहन**

**औद्योगिक क्षेत्राचे पुनरुज्जीवन**

**२० लाख व्यावसायिक निर्माण करण्याचे लक्ष्य**

◆ **नवी दिल्ली, १ फेब्रुवारी**

रोजगाराच्या संधी आणि लघु उद्योगाचा कायापालट करण्यासाठी केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ मध्ये १० हजार कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली. विकास निधीच्या अंतर्गत हा निधी लघु उद्योगांना मिळणार आहे. ऑरेंज इकॉनॉमिला प्रोत्साहन, औद्योगिक क्षेत्राचे पुनरुज्जीवन आणि देशभरात २० लाख व्यावसायिक निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले.

कौशल्ये विकसित करण्याला प्राधान्य

अर्थसंकल्पात ऑरेंज इकॉनॉमीचा उल्लेख करण्यात आला. यामध्ये गेमिंग, कॉमिक्स, ॲनिमेशन आणि व्हिज्युअल इफेक्ट्स अर्थात् एव्हीजीसी क्षेत्राचा समावेश करण्यात आला. या क्षेत्रात २०३० पर्यंत २० लाख व्यावसायिकांची आवश्यकता आहे. उपरोक्त क्षेत्रात कौशल्ये विकसित करण्यासाठी एव्हीजीसी कंटेंट क्रिएटर लॅब्सची स्थापना केली जाईल. या क्षेत्रातील उपक्रमांमुळे रोजगाराच्या संधी वाढण्याची अपेक्षा आहे. (वृत्तसंस्था)

### उद्योगाला प्रोत्साहन देणाऱ्या घोषणा

- सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाच्या विकासाचे लक्ष्य गाठण्यासाठी अनेक उपक्रमांची घोषणा करण्यात आली
- २०० वारसा औद्योगिक क्लस्टर्सना पुनरुज्जीवित करण्याची योजना प्रस्तावित
- एमएसएमईंना चॅम्पियन म्हणून विकसित करण्यासाठी त्रिस्तरीय योजनांची घोषणा
- आत्मनिर्भर भारत निधीमध्ये २००० कोटी रुपयांचा टॉप अप प्रस्तावित
- लघु उद्योगांच्या उत्पादनांना शासकीय विभागांना खरेदी करण्याची सक्ती
- सरकारी खरेदीच्या माहितीसाठी जीईएमला टीआरईडीएससोबत एकत्रित करण्यात येणार
- टीआरईडीएस द्वारे लघु उद्योगांना आतापर्यंत ७ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम वितरित
- टियर-२ आणि टियर-३ शहरांमध्ये कॉर्पोरेट मित्र तयार करण्यासाठी व्यावसायिक संस्थांना समर्थन देणार

# परदेशात शिक्षण, उपचार घेणाऱ्यांना खूशखबर

**टूर पॅकेजेसवरील टीसीएस २ टक्के लागणार**

**परदेशी मालमत्तांची माहिती उघड करणाऱ्यांना दंडातून सवलत**

◆ **नवी दिल्ली, १ फेब्रुवारी**

परदेशी प्रवास आणि परदेशात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना द्यावा लागणारा टीसीएस कर दोन टक्क्यांपर्यंत कमी करण्याची घोषणा अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी केली. याशिवाय परदेशी मालमत्ता उघड करण्यासाठी आणि २० लाख रुपयांपर्यंतच्या मालमत्तेवरील कर दंड रद्द करण्यासाठी सहा महिन्यांची योजना जाहीर केली.

अर्थसंकल्प सरकारने करदात्यांना दुहेरी दिलासा दिला आहे. परदेशी प्रवास आणि शिक्षणावरील टीसीएस कर कमी करण्याच्या घोषणेतून मध्यमवर्गीयांना दिलासा देण्यात आला. परदेशी प्रवास पॅकेजेसच्या विक्रीवरील टीसीएस दर २ टक्के करण्यात आला. शिक्षण आणि कर्मचारी सेवांवरील टीडीएस २ टक्क्यांपर्यंत घटविण्याची घोषणा केली. (वृत्तसंस्था)



### प्रवास, मालमत्ता उघड करण्यासाठी तरतुदी

- शिक्षण आणि वैद्यकीय: उदारीकृत रेमिटन्स योजनेअंतर्गत शिक्षण आणि वैद्यकीय उद्देशांसाठी परदेशात पाठवलेल्या रकमेवरील टीसीएस दर ५ वरून २ टक्के करण्यात आला
- टीडीएस प्रक्रिया सोपी: ठेवीदार आता गुंतवणूकदारांकडून थेट फॉर्म १५जी किंवा फॉर्म १५एच स्वीकारू शकतील आणि ते कंपनीला सादर करू शकतील
- परदेशी मालमत्ता उघड करण्यासाठी योजना : परदेशी उत्पन्न किंवा मालमत्तांची स्थिती स्पष्ट करण्यास सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली.
- ही योजना अशा लोकांसाठी आहे ज्यांनी त्यांचे परदेशातील उत्पन्न, मालमत्ता जाहीर केलेली नाही




### कर विवाद कमी करण्यासाठी नियम बदलले

कर विवाद कमी करण्यासाठी आणि करदात्यांना अनावश्यक कायदेशीर अडचणींपासून संरक्षण करण्यासाठी नियमात बदल करण्यात आले. याअंतर्गत करदात्यांना अपील दाखल करण्याच्या कालावधीत दंडाच्या रकमेवर कोणतेही व्याज द्यावे लागणार नाही.

### करचोरी करणाऱ्यांना गुन्हेगारी श्रेणीतून वगळले

लेखा कागदपत्रे सादर न करणे आणि कर न भरणे या प्रकरणांना आता गुन्हेगारी श्रेणीतून वगळण्यात येईल. शिक्षेचे रूपांतर दंडात केले जाणार आहे. याशिवाय २० लाखांपेक्षा कमी किमतीची स्थावर परदेशी मालमत्ता उघड न केल्यास आता कोणताही दंड आकारला जाणार नाही. अनिवासी व्यक्तीकडून स्थावर मालमत्ता विक्री करण्यासाठी नवीन नियम प्रस्तावित करण्यात आले.

# अल्पसंख्यक समुदायाच्या आर्थिक विकासावर भर

**विविध योजनांसाठी ३,४०० कोटींची तरतूद**

◆ **नवी दिल्ली, १ फेब्रुवारी**

अर्थसंकल्पात अल्पसंख्याक कार्य मंत्रालयासाठी ३,४०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. ही रक्कम मागील आर्थिक वर्षातील ३,३९५.६२ कोटींच्या तुलनेत ४.३८ कोटींनी अधिक आहे.

या तरतुदीतून अल्पसंख्याक समुदायाच्या सामाजिक, आर्थिक विकासावर भर देण्याचा उद्देश आहे. अल्पसंख्याक मंत्रालयाच्या एकूण तरतुदींपैकी केंद्रीय क्षेत्र योजनांसाठी २,००० कोटी आणि प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रमासाठी १,१९७.९७ कोटी रुपयांची तरतूद असेल. या निधीतून शिक्षण, आरोग्य, निवास आणि सामुदायिक पायाभूत सुविधांचा विकास केला जाणार आहे. (वृत्तसंस्था)

# कोणत्या मंत्रालयाला किती निधी?

◆ **नवी दिल्ली, १ फेब्रुवारी**

केंद्राचा अर्थसंकल्प आला म्हणजे सर्वाधिक खर्च हा संरक्षण क्षेत्राला होणार असे कायम गृहित धरले जाते. मात्र, यावेळी संरक्षण क्षेत्रापेक्षा जास्त खर्च सरकारने दुसऱ्या ठिकाणी केला आहे. त्यामुळे सरकार मोठ्या प्रमाणात उत्पादकतेला प्रोत्साहन देणार असल्याचे यातून दिसून येते. २०२६-२७ वर्षासाठी केंद्र सरकार वाहतूक क्षेत्रावर सर्वाधिक खर्च करणार आहे.

या क्षेत्रासाठी एकूण तब्बल ५,९८,५२० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे येणाऱ्या वर्षात मोठ्या प्रमाणात रस्ते बांधणीचे प्रकल्प आपल्याला दिसून येतील.

### ग्रामीण विकास

त्याखालोखाल संरक्षण क्षेत्रासाठी ५,९४,५८५ कोटी रुपयांची तरतूद केली गेली आहे. तर ग्रामीण भागाच्या विकासासाठी सरकारने मोठा भर देत ग्रामीण विकास क्षेत्राला तब्बल २,७३,१०८ कोटी, आणि गृह मंत्रालयासाठी २,५५,२३४ कोटी मंजूर केले आहेत.

### शिक्षण

दरम्यान शिक्षण क्षेत्रासाठी मागच्या वर्षीच्या तुलनेत सुमारे १८ हजार रुपयांची वाढ करत २०२६-२७ साठी १,३९,२८९ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे ग्रामीण आणि शैक्षणिक पायाभूत सुविधांना चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

ऊर्जा क्षेत्रासाठी १,०९,०२९ कोटी, आरोग्य सेवांसाठी १,०४,५९९ कोटी, तर शहरी विकासासाठी ८५,५२२ कोटी निधी जाहीर करण्यात आला आहे. तसेच आयटी आणि टेलिकॉमसाठी ७४,५६० कोटी, वाणिज्य व उद्योगासाठी ७०,२९६ कोटी, आणि सामाजिक कल्याणासाठी ६२,३६२ कोटी खर्च करण्यात येणार आहेत. या अर्थसंकल्पातून सरकारचा भर मुख्यतः पायाभूत सुविधा, संरक्षण, ग्रामीण विकास आणि शिक्षण-आरोग्य यांसारख्या मूलभूत क्षेत्रांवर असल्याचे दिसून येत आहे. (वृत्तसंस्था)

# जानेवारीत जीएसटी संकलन तीन महिन्यांच्या उच्चांकावर

**नवी दिल्ली, १ फेब्रुवारी -**

जानेवारीत एकूण जीएसटी संकलन ६.२ टक्क्यांनी वाढून तीन महिन्यांच्या उच्चांकावर म्हणजेच १.९३ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झाले आहे. मागील वर्षीच्या अखेरीस झालेल्या दरकपातीमुळे मागणी वाढली असल्याचे यावरून स्पष्ट झाले, असे सूत्रांनी रविवारी सांगितले. मात्र, परताव्यांमध्ये ३.१ टक्क्यांनी घट होऊन ते २२,६६५ कोटी रुपयांवर आले. त्यामुळे जानेवारीत एकूण जीएसटी महसूल ७.६ टक्क्यांनी वाढून जवळपास १.७१ लाख कोटी रुपयांवर पोहोचला. जानेवारीत देशांतर्गत व्यवहारांमधून मिळणाऱ्या एकूण कर संकलनात ४.८ टक्के वाढ होऊन ते १.४१ लाख कोटी रुपये झाले, तर आयातीवरील महसूल १०.१ टक्क्यांनी वाढून ५२,२५३ कोटी रुपये झाला. सुमारे ३७५ वस्तूंवरील जीएसटी दरांमध्ये कपात करण्यात आली. यामुळे वस्तू स्वस्त झाल्या. ही कपात सप्टेंबर २०२५ पासून लागू झाली तसेच ५, १२, १८ आणि २८ टक्के असलेले चार कर स्तर एकत्र करून ५ आणि १८ टक्के असे दोन स्तर तयार करण्यात आले. काही निवडक आणि आलिशान वस्तू आणि तंबाखू उत्पादनांसाठी सर्वाधिक ४० टक्के कर स्तर ठेवण्यात आला.

# बँकिंग क्षेत्रात सुधारणा करणार




◆ **नवी दिल्ली, १ फेब्रुवारी**

बँकिंग क्षेत्राचा व्यापक आढावा घेण्यासाठी आणि सुधारणांवर आधारित वाढीसाठी एक नवीन योजना तयार करण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची घोषणा अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी केली.

विकसित भारताच्या दृष्टिकोनानुसार भारतीय बँकांना भविष्यासाठी तयार करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. त्यांनी सांगितले की, भारतीय बँका आज चांगल्या स्थितीत आहेत. त्यांचा नफा आणि जागतिक पोहोच वाढली आहे. या क्षेत्राला आता अधिक विकसित करण्याची आवश्यकता आहे आणि हे साध्य करण्यासाठी उच्चस्तरीय समिती गठीत केली जाईल. ही समिती बँकिंग व्यवस्थेची रचना, कार्यक्षमता आणि तयारी यांचा आढावा घेईल आणि आर्थिक विस्ताराच्या पुढील टप्प्याशी ती जुळवून घेईल. बाजार भांडवलानुसार जगातील टॉप १०० कंपन्यांमध्ये कोणतीही भारतीय बँक नाही, परंतु अनेक चिनी बँकांचा या यादीत समावेश आहे. (वृत्तसंस्था)


## ताबा नोटीस नमुना 'झेड' (Z NOTICE)

म.स.सं. नियम १९६० मधिल नियम १०७ (११) ड-१

### जिजाउ महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बार्शी ता. बार्शी

### स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबावतची नोटीस

ज्याअर्थी मला प्राप्त अधिकारानुसार भी गोपीचंद अरुण तुकशेट्टि विशेष वसुली व विक्री अधिकारी **जिजाउ महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बार्शी ता. बार्शी** म.स.सं. नियम १९०१ अन्वये खालील थकबाकीदार यांना मागणी नोटीसद्वारे त्यांच्याकडिल येणे रक्कम भरण्यास कळविले होते. मात्र त्यांनी रक्कम भरण्यास कसुर केली आहे. त्यामुळे यांच्या स्थावर मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत सदरचे जप्ती आदेश संस्थेच्य दप्तरी थकबाकीदार यांना पाहण्यास मिळेल. खातील ऋणकोने रक्कम भरण्यास कसुर केल्याने ऋणकोंना नोटीस देण्यात येते की, खाली निर्देशित केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करणाऱ्या अधिकाऱ्याने म.स.सं. १९६१ मधिल नियम १०७ (११) (ड) (१) नुसार असलेल्या अधिकारान्चये रितत्तर बोजा नोंद करून प्रतिकात्मक ताबा घेतलेला आहे. विशेष करून ऋणको व तनाग नागरिकांना या नोटीसद्वारे सावध करण्यात येते की, या स्थावर मालमत्तेबाबत कोणीही खरेदी विकी, गहान, दान, टाच, बोजा, किंवा इतर हक्कात व्यवहार करू नयेत. याउपर कोणी कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो **जिजाउ महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बार्शी ता. बार्शी** यांच्या खाली दर्शविलेल्या येणे बाकी, बोजाची रक्कम व त्यावरील होणारे व्याज, वसुलीखर्च. यांच्या कायदेशिररित्या अधिन राहावे लागेल याची नोंद घ्यावी.

| अ. नं. | कर्जदार /जामिनदार | मिळकतदार | दाखला क. दिनांक | ३१/०१/२६ अखेर येणेबाकी | मिळकत ठिकाग | मिळकत कमांक | क्षेत्र | मालमत्ता प्रतिकात्मक ताबा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अमोल नारायण अनागुंडे<br>आकाश सुनिल नवगिरे<br>सिध्देश्वर शंकर शेवते | अमोल नारायण अनागुंडे | ७८/२०२५<br>१७/०४/२०२५ | १,१०,९०४/- | बार्शी,<br>ता. बार्शी | ४४४ | ०.००.७५ पैकी | ०२/०२/२०२५ |
| २ | नागेश सुरेश गायकवाड<br>स्मिता सुरेश शेळके | स्मिता सुरेश शेळके | १०२८/२०२४<br>३०/०१/२०२४ | ९२,४२५/- | बार्शी,<br>ता. बार्शी | १४५० | ०.६६.०० | ०२/०२/२०२५ |
| ३ | नवनाथ गोरख जापवर<br>सतिष बलभिम जाधवर<br>गोरख दत्तु जाधवर | नवनाथ गोरख जाधवर | ७४/२०२५<br>१७/०४/२०२५ | १,८६,०३०/- | बोरगाव खु<br>ता. बार्शी<br>बोरगाव खु.<br>बोरगाव खु. | ६३<br>१०३<br>१०४ | ०/०९.५०<br>०/०९<br>०/३६<br>०/३६ | ०२/०२/२०२५ |
| ४ | धवल गणेश बदाले<br>शर्मिला गणेश बदाले<br>शिवाजी राजेंद्र वाघमारे | सतिष बलभिम जाधवर<br>गोरख दत्तु जापवर | १०३१/२०२४<br>३०/०१/२०२४ | २,७३,१०३/- | बार्शी,<br>ता. बार्शी | सि.स.क.<br>३८०२ | ४९.९० चौ.मी.पैकी | ०२/०२/२०२५ |
| ५ | दशरथ जालिंदर कुंभार<br>लक्ष्मण महादेव कुंभार<br>कैलास हनुमंत कांदे | लक्ष्मण महादेव कुंभार | ६९/२०२५<br>१७/०४/२०२५ | १,३०,६९९/- | बार्शी, ता. बार्शी | १४०२ | २.०९.८३ पैकी | ०२/०२/२०२५ |
| ६ | पल्लवी समाधान कदम<br>अतुल अंकुश भिसे<br>विजय सोमनाथ खंदोडे | पल्लवी समाधान कदम<br>अतुल अंकुश भिसे<br>विजय सोमनाथ खंदोडे | ७२/२०२५<br>१७/०४/२०२५ | ५,२८,४५८/- | सौंदरे, ता. बार्शी<br>पानगाव, ता. बार्शी<br>सौंदरे, ता. बार्शी | १३५<br>१७५/२<br>५४२/२ | १/४०<br>१/४०<br>१/२३ पैकी | ०२/०२/२०२५ |

ही ताबा नोटीस दिली असे.

शिक्का

सही/-
श्री. गोपीचंद अरूण तुकशेट्टी
विशेष वसुली व विक्री अधिकारी
जिजाउ महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बार्शी ता. बार्शी

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/






# १ एप्रिलपासून आयकर कायद्याची होणार अंमलबजावणी : अर्थमंत्री

## सहा दशके जुना कायदा होईल इतिहासजमा

**◆ नवी दिल्ली, १ फेब्रुवारी**

आयकर कायदा-२०२५ ची अंमलबजावणी १ एप्रिलपासून केली जाईल आणि त्याचे नियम आणि कर विवरणपत्रे लवकरच अधिसूचित केली जातील, असे निर्मला सीतारामन् यांनी रविवारी सांगितले.

१ एप्रिलपासून लागू होणारा नवीन आयकर कायदा सहा दशके जुन्या कर कायद्याची जागा घेईल आणि २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात कर कायद्यांमध्ये केलेल्या बदलांना नवीन कायद्यात समावेश केला जाईल.

ही प्रत्यक्ष कर संहिता विक्रमी वेळेत पूर्ण झाली आहे आणि आयकर कायदा-२०२५ १ एप्रिल २०२६ पासून लागू होईल. सुधारित आयकर नियम आणि फॉर्म लवकरच अधिसूचित केले जातील. यामुळे करदात्यांना त्यातील आवश्यकतांची माहिती करून घेण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल. सामान्य नागरिक कोणत्याही अडचणीविना या कायद्याचे पालन करू शकतील, अशी पुनर्रचना फॉर्मची करण्यात आली, असे सीतारामन् यांनी सांगितले.

नवीन कायद्याने मूल्यांकन वर्ष आणि मागील वर्षातील फरक रद्द करून त्याऐवजी कर वर्ष ही एकच चौकट लागू करून कर प्रक्रियेची कालमर्यादा सुलभ केली आहे. तसेच यामुळे करदात्यांना अंतिम मुदतीनंतर आयकर विवरणपत्र दाखल केले असले, तरीही कोणत्याही दंडात्मक शुल्काशिवाय टीडीएस परतावा मागण्याचा अधिकार मिळतो. (वृत्तसंस्था)

### कलमांची संख्या ५० टक्क्यांनी कमी

२०२५ चा आयकर कायदा महसूल तटस्थ आहे, म्हणजेच त्यात कर दरांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. या कायद्याने केवळ प्रत्यक्ष कर कायदे समजावण्यास सोपे केले आहेत तसेच संदिग्धता दूर केली आहे आणि त्यामुळे खटल्यांची शक्यता कमी झाली आहे. १९६१ च्या आयकर कायद्याच्या तुलनेत यामुळे मजकुराचे प्रमाण आणि कलमांची संख्या जवळपास ५० टक्क्यांनी कमी झाली आहे.



# कोणत्या योजनेसाठी किती पैसे?

**२०२६ च्या अर्थसंकल्पात, अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी गरीब, शेतकरी आणि ग्रामीण भारतावर लक्ष केंद्रित करणाऱ्या अनेक प्रमुख सरकारी योजनांसाठी महत्त्वपूर्ण निधीची तरतूद केली आहे.**

### जी-राम-जी रोजगार हमी योजना



सर्वात मोठी तरतूद रोजगार हमी योजनेसाठी (जी-राम-जी, पूर्वी मनरेगा) होती. या योजनेसाठी **९५,६९२.३१** कोटींची तरतूद करण्यात आली आहे. गेल्या वर्षीचे मूळ बजेट ८६,००० कोटी होते, जे सुधारित अंदाजात वाढवून ८८,००० कोटी करण्यात आले. याव्यतिरिक्त, मनरेगा कार्यक्रम घटकासाठी या वर्षी **३०,०००** कोटींची तरतूद करण्यात आली आहे. याचा थेट फायदा ग्रामीण मजूर, बेरोजगार कुटुंबे आणि गावांमधील लहान पायाभूत सुविधा प्रकल्पांना होईल.

### पंतप्रधान किसान योजना



शेतकऱ्यांसाठी सुरू असलेल्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचे (पीएम किसान योजना) बजेट **६३,५००** कोटी ठेवण्यात आले आहे, जे गेल्या वर्षीसारखेच आहे. या योजनेअंतर्गत, लहान आणि सीमांत शेतकऱ्यांना त्यांच्या खात्यात थेट हप्ते मिळतात, ज्यामुळे बियाणे, खते आणि शेतीचा खर्च भागवण्यास मदत होते.

### आयुष्मान भारत योजना



आरोग्य क्षेत्रात, आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (पीएम-जेएवाय) साठी ९,५०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. गेल्या वर्षी, ही तरतूद ९,४०१ कोटी होती, जी सुधारित अंदाजात ८,९९५ कोटी करण्यात आली होती. ही योजना गरीब आणि असुरक्षित कुटुंबांना, विशेषतः मोठ्या रुग्णालयांमध्ये महागड्या उपचारांसाठी मोफत उपचार प्रदान करते.

### पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजना



अन्न सुरक्षेसाठी प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेवर (पीएमजीकेएवाय) २,२७,४२९ कोटी खर्च केले जातील. गेल्या वर्षी, बजेट २,०३,००० कोटी होते, जे सुधारित अंदाजात वाढून २,२७,७५३.६५ कोटी झाले. ही योजना लाखो गरीब कुटुंबांना मोफत किंवा अनुदानित रेशन प्रदान करते. एकंदरीत, २०२६ च्या अर्थसंकल्पात हे स्पष्ट आहे की यावेळी गावे, शेतकरी, गरीब रुग्ण आणि रेशनवर अवलंबून कुटुंबे ही सर्वात मोठी प्राथमिकता आहे.

### अर्थसंकल्पाची वैशिष्ट्ये

पहिल्यांदाच देशाचे वार्षिक बजेट **५०** लाख कोटींच्या पुढे गेले आहे.

१३ पूर्ण बजेट्स, **खर्चात तिपट वाढ**


मोदी सरकारच्या कार्यकाळातील हा **१३वा पूर्ण अर्थसंकल्प** आहे

**२०१४-१५ (पहिले पूर्ण बजेट) : १७.९५ लाख कोटी**

**२०२६-२७ : ५३.५० लाख कोटी**

याचा अर्थ, १३ वर्षांत सरकारी खर्चात जवळपास **३ पट** (सुमारे २०० टक्के) **वाढ** झाली आहे. आगामी वर्षांतही या खर्चात वाढ होण्याचा अंदाज आहे.

# सेमीकंडक्टरमध्ये भारताचा मास्टरस्ट्रोक!



**या मोहिमेचे प्रमुख पैलू**

**फुल स्टॅक डिझाईन :** चिप्सचे डिझाईन करण्यापासून ते उत्पादनापर्यंत सर्व प्रक्रिया भारतातच होतील.

**इंडियन आयपी :** भारताची स्वतःची बौद्धिक संपदा विकसित करण्यावर भर दिला जाईल.

**कौशल्य विकास :** उद्योगांच्या नेतृत्वाखालील संशोधन आणि प्रशिक्षण केंद्रांद्वारे कुशल वर्कफोर्स तयार केला जाईल.

- **४०,००० कोटींच्या निधीची घोषणा**
- **चीनची मक्तेदारी संपणार?**

आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या युगात भारताला जागतिक स्तरावर टेक पॉवरहाऊस बनवण्यासाठी केंद्र सरकारने कंबर कसली आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी देशाच्या सेमीकंडक्टर परिसंस्थेला बळकट करण्यासाठी ४०,००० कोटी रुपयांच्या भरीव निधीची घोषणा केली आहे. यासोबतच, भारताला चिप उत्पादनाचे केंद्र बनवण्यासाठी इंडियन सेमीकंडक्टर मिशन २.० लाँच करण्याचे जाहीर केले आहे. सेमीकंडक्टर क्षेत्रातील ही गुंतवणूक केवळ आर्थिक तरतूद नसून, भारताच्या हाय-टेक भविष्याचा पाया आहे.

### जागतिक पुरवठा साखळी आणि भू-राजकीय तणाव

सध्या जागतिक स्तरावर चिप्सच्या पुरवठा साखळीत अनेक अडथळे आहेत. वाढत्या भू-राजकीय तणावादरम्यान इतर देशांवर अवलंबून राहण्यापेक्षा स्वतःचे उत्पादन असणे भारताच्या संरक्षणासाठी आणि अर्थव्यवस्थेसाठी गरजेचे आहे.

### भविष्यातील तंत्रज्ञानाचे इंधन

५जी/६जी टेलिकॉम, इलेक्ट्रिक वाहने, एआय, संरक्षण क्षेत्र आणि कन्झ्युमर इलेक्ट्रॉनिक्समध्ये चिप्सची मागणी प्रचंड वाढत आहे. ही वाढती गरज देशांतर्गत उत्पादनातून पूर्ण करणे हे या गुंतवणुकीचे मुख्य उद्दिष्ट आहे.

### विकसित भारत-२०३०

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत व्हिजनसाठी हे क्षेत्र कणा मानले जात आहे. २०३० च्या दशकापर्यंत भारताला जगातील प्रमुख सेमीकंडक्टर हब बनवण्याचे लक्ष्य सरकारने ठेवले आहे. अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले की, केवळ चिप बनवून भारत थांबणार नाही, तर या क्षेत्रातील संपूर्ण सप्लाय चेनवर भारताचे वर्चस्व असावे, हा सरकारचा उद्देश आहे.

# पुढील २१ वर्षांसाठी क्लाऊड कंपन्या करमुक्त

अर्थमंत्र्यांनी देशाच्या विकासासाठी तंत्रज्ञान आणि डिजिटल क्षेत्रांना एक प्रमुख शक्ती म्हणून वर्णन केले. अर्थसंकल्पात क्लाउड आणि एआयशी संबंधित कंपन्यांसाठी महत्त्वपूर्ण घोषणांचा समावेश होता.

परदेशी क्लाउड कंपन्यांना २०४७ पर्यंत कर सवलती मिळतील, अशी घोषणा केली. ही सूट भारतात बांधलेल्या डेटा सेंटर्सचा वापर करणाऱ्या आणि भारतातून जगभरातील ग्राहकांना क्लाउड सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांना उपलब्ध असेल. जर एखादी परदेशी कंपनी भारतीय पुनर्विक्रेत्यामार्फत भारतीय ग्राहकांना सेवा पुरवत असेल तर तिलाही कर सूटचा फायदा होईल.

### डेटा आणि एआय हब बनण्याची तयारी

या निर्णयामुळे भारतात गुंतवणूक वाढेल. मोठे डेटा सेंटर बांधले जातील आणि एआयशी संबंधित सेवांना गती मिळेल. यामुळे तरुणांसाठी नवीन नोकऱ्याही निर्माण होतील. डेटाची गरज सतत वाढत आहे. एआयच्या युगात डेटा सेंटर आवश्यक बनले आहेत, असे सरकारचे म्हणणे आहे. या निर्णयामुळे सामान्य वापरकर्त्यांच्यामध्ये लगेच बदल होणार नाही. हा धोरणात्मक निर्णय आहे आणि त्याचा परिणाम हळूहळू जाणवेल.

### प्रत्येक इंटरनेट वापरकर्त्यावर होणार परिणाम


### डिजिटल सेवांचा खर्च

कंपन्यांचा ऑपरेटिंग खर्च कमी होऊ शकतो. त्याचे फायदे वापरकर्त्यांना त्वरित मिळू शकत नाहीत. किंमतीतील बदलांना वेळ लागेल. काही सेवा स्वस्त होऊ शकतात, तर काही अपरिवर्तित राहतील.

भारतात डेटा साठवल्याने अनुपालन सोपे होईल. यामुळे वापरकर्त्यांच्या डेटावर सरकारी देखरेख वाढेल. भारतात संगणकीय आणि डेटामधील वाढीमुळे एआय टूल्स विकसित करणे सोपे होईल. कंपन्यांना प्रथम फायदा होईल, तर वापरकर्त्यांना नंतर त्याचा परिणाम दिसेल. हा एक दीर्घकालीन बदल आहे.

### शहरांमध्ये नवीन आर्थिक क्षेत्राची निर्मिती

टियर-२ आणि टियर-३ शहरांमध्ये नवीन आर्थिक क्षेत्रे निर्माण करण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. यासाठी नवीन वर्षांत १२.२ लाख कोटी रुपयांचा खर्च केला जाईल. ५ लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये पायाभूत सुविधांचा विकास सुरू करणार आहे. आंशिक कर्ज हमीसाठी इन्फ्रा रिस्क गॅरंटी फंड निर्माण केला जाईल असेही त्यांनी सांगितले.




# शेजाऱ्यांना काय-काय मिळाले?

**◆ नवी दिल्ली, १ फेब्रुवारी**

केंद्रातील मोदी सरकारने २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर करताना आपल्या परराष्ट्र धोरणाचे स्पष्ट संकेत दिले आहेत. एकीकडे भूतान, नेपाळ आणि श्रीलंका यांसारख्या विश्वासू मित्रांसाठी मदतीचा हात पुढे केला असताना, दुसरीकडे संबंधांमध्ये तणाव निर्माण झालेल्या बांगलादेशला भारताने मोठा आर्थिक झटका दिला आहे. बांगलादेशला दिली जाणारी वार्षिक मदत थेट निम्म्यावर आणली असून, इराणमधील महत्त्वाकांक्षी चाबहार बंदर प्रकल्पासाठीचा निधीही तांत्रिक कारणास्तव शून्यावर आणला आहे.

### बांगलादेशच्या मदतीला कात्री

२०२५-२६ च्या अर्थसंकल्पात बांगलादेशसाठी १२० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती, ती आता २०२६-२७ च्या बजेटमध्ये घटवून केवळ ६० कोटी रुपये करण्यात आली आहे. बांगलादेशातील बदललेली राजकीय परिस्थिती आणि वाढता तणाव पाहता, भारताने ही कठोर भूमिका घेतल्याचे मानले जात आहे.

### चाबहार प्रकल्पाची गणिते बिघडली?



भारतासाठी सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या इराणमधील चाबहार प्रकल्पासाठी गेल्यावर्षी ४०० कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबत व्यापार करणाऱ्या देशांवर २५ टक्के टॅरिफ लावण्याची घोषणा केल्यामुळे, या प्रकल्पाच्या भवितव्यावर अनिश्चिततेचे ढग दाटले आहेत. (वृत्तसंस्था)

### मित्रांना मदतीचा हात तर उपद्रवींना झटका

**मित्रांना मदत**

**भूतान :** भारताचा सर्वात जुना आणि विश्वासू मित्र असलेल्या भूतानला २,२८९ कोटी रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**नेपाळ :** नेपाळच्या मदतीत १४ टक्क्यांनी वाढ करून ती ८०० कोटी रुपये करण्यात आली आहे.

**श्रीलंका :** आर्थिक संकटातून सावरणाऱ्या श्रीलंकेला भारताने ४०० कोटींची मदत दिली आहे, जी गेल्या वर्षीपेक्षा ३३ टक्क्यांनी जास्त आहे.

**मालदीव आणि म्यानमारलाही झटका**

मालदीवसोबतचे संबंध सुधारण्याचे प्रयत्न सुरू असले तरी, त्यांच्या मदतीत ८ टक्क्यांची कपात करून ती ५५० कोटी रुपये करण्यात आली आहे. तसेच, राजकीय अस्थिरतेचा सामना करणाऱ्या म्यानमारला मिळणारा निधीही १४ टक्क्यांनी कमी झाला असून तो ३०० कोटींवर आला आहे. अफगाणिस्तानला मात्र १५० कोटींची मानवतावादी मदत सुरूच राहणार आहे.

# भारत जागतिक अर्थव्यवस्थेचा नवा 'बाहुबली'

**१६५ देशांच्या जीडीपीपेक्षा मोठा अर्थसंकल्प | प्रथमच ओलांडला ५० लाख कोटींचा टप्पा**

**◆ नवी दिल्ली, १ फेब्रुवारी**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी रविवारी देशाचा अर्थसंकल्प २०२६-२७ सादर केला. याद्वारे आगामी आर्थिक वर्षात सरकार ५३.५ लाख कोटी (५८३.५ अब्ज डॉलर्स) इतका खर्च करणार आहे. विशेष म्हणजे, हा आकडा जगातील १६५ देशांच्या एकूण सकल राष्ट्रीय उत्पादनापेक्षा अधिक आहे. मागील वर्षीचे बजेट ५० लाख कोटींपेक्षा कमी होते; त्यामुळे हा टप्पा पहिल्यांदाच ओलांडला गेला आहे.

भारत जागतिक अर्थव्यवस्थेत वेगाने पुढे जात असल्याचे चित्र या अर्थसंकल्पातून स्पष्ट होते. देशाचा वार्षिक खर्च अनेक मध्यम आकाराच्या अर्थव्यवस्थांच्या जीडीपीपेक्षा जास्त असल्याने भारताचा आर्थिक विस्तार आणि सरकारी गुंतवणुकीची क्षमता अधोरेखित होते. (वृत्तसंस्था)

**पाच वर्षांतील अर्थसंकल्पातील एकूण निधी**

| वर्ष | | आर्थिक तरतूद |
|---|---|---|
| २०२२ | : | ३९.४५ लाख कोटी |
| २०२३ | : | ४५.०० लाख कोटी |
| २०२४ | : | ४८.२१ लाख कोटी |
| २०२५ | : | ५० लाख कोटींपेक्षा कमी |
| २०२६ | : | ५३.५ लाख कोटी |

# आता महिला लाभार्थी नव्हे, 'आर्थिक भागीदार'

**यंदाचा अर्थसंकल्प महिलांसाठी ऐतिहासिकच ठरला आहे. या बजेटमध्ये सरकारने महिलांना केवळ लाभार्थी म्हणून न पाहता, त्यांना आर्थिक भागीदार म्हणून पाहण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. रोजगार, उद्योजकता, आत्मनिर्भरता आणि सामाजिक सुरक्षा या चार स्तंभांवर आधारलेला हा अर्थसंकल्प येणाऱ्या काळात महिलांची स्थिती तळागाळापर्यंत बदलू शकतो.**

### शी-मार्टस् : महिला उद्योजकांना मिळणार थेट बाजारपेठ

बजेट २०२६ मध्ये प्रस्तावित शी-मार्टस् ही केवळ विक्री केंद्रे नसून महिलांसाठी एक संपूर्ण इकोसिस्टम असेल. या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून स्वयंसहायता गट, ग्रामीण महिला उद्योजक आणि स्टार्टअपशी संबंधित महिला आपली उत्पादने थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवू शकतील. यामुळे मध्यस्थांवरील अवलंबित्व कमी होईल आणि घरबसल्या उत्पन्नाचा मार्ग मोकळा होईल. डिजिटल शी-मार्टस्‌ला ओएनडीसी आणि ई-कॉमर्सशी जोडल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचे दरवाजेही उघडतील, ज्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत महिलांचा सहभाग वाढून देशाची आर्थिक स्थिती सुधारेल.

### लखपती बहीण योजना - बचतीकडून समृद्धीकडे



आधी लखपती दीदी आणि आता लखपती बहीण योजना महिलांवर लक्ष केंद्रित करून सुरू केली जात आहे. हे कायमस्वरूपी उत्पन्नाचे साधन बनेल. याचं उद्दिष्ट केवळ एक लाख रुपये कमावणे नसून नियमित, सुरक्षित आणि कौशल्य आधारित कमाई करणे हे आहे. यामुळे सूक्ष्म वित्तपुरवठा आणि कौशल्य प्रशिक्षण वाढेल, ज्यामुळे महिलांचे आर्थिक नियोजन मजबूत होईल आणि कुटुंबातील निर्णयांमध्ये त्यांची भूमिका वाढेल.

### नोकरी करणाऱ्या महिलांसाठी सुरक्षा + मोबिलिटी पॅकेज

बजेट २०२६ मध्ये शहरी आणि निमशहरी महिलांसाठी कामाच्या ठिकाणची सुरक्षा, रात्रीची वाहतूक व्यवस्था आणि क्रेच सपोर्ट यावर भर देण्यात आला आहे. या योजनांमुळे नोकरी करणाऱ्या महिलांच्या मोठ्या अडचणी दूर होतील. मुलांची काळजी आणि प्रवासाची भीती दूर झाल्यामुळे नोकरी सोडण्याचे प्रमाण कमी होईल आणि महिला कामगारांचा सहभाग वाढेल, ज्यामुळे कॉर्पोरेट क्षेत्रात महिला टिकून राहण्याचे प्रमाण सुधारेल.



### आरोग्य बजेटमध्ये महिलांवर विशेष लक्ष



महिलांच्या आरोग्याला आता दुय्यम विषय मानले गेलेले नाही. बजेट २०२६ मध्ये माता आरोग्य, एनिमिया, मानसिक आरोग्य आणि सर्व्हाइकल कॅन्सरचे स्क्रीनिंग यांसारख्या मुद्द्यांसाठी निधी वाढवण्यात आला आहे. भारतातील १५-४९ वयोगटातील सुमारे ५७% महिला एनिमियाने ग्रस्त आहेत. हा अर्थसंकल्प या सायलेंट संकटावर थेट प्रहार करतो.

### कौशल्य + प्रशिक्षण

भविष्यातील महिला वर्कफोर्ससाठी प्रथमच बजेटमध्ये , डिजिटल स्किल्स आणि ग्रीन जॉब्ससाठी विशेष प्रशिक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे टेक क्षेत्रातील स्त्री-पुरुष गॅप कमी होईल आणि फ्रीलान्सिंग तसेच रिमोट वर्कच्या नवीन संधी उपलब्ध होतील. यामुळे महिला केवळ कर्मचारी न राहता नाविन्यपूर्ण संशोधनाचा भाग बनतील.

## अग्रलेख...

# विकसित भारताचा अर्थसंकल्प

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या स्वप्नाला गती देणारा अर्थसंकल्प असे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी रविवारी संसदेत सादर केलेल्या अर्थसंकल्पाचे वर्णन करावे लागेल. मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील हा तिसरा अर्थसंकल्प विकासाला चालना देणारा आणि ऐतिहासिक असा आहे. पंतप्रधान मोदी यांनी म्हटल्याप्रमाणे या अर्थसंकल्पात अपार संधी आहेत, विकसित भारताच्या उड्डाणाचा तो राजमार्ग आहे, यात शंका नाही. निवडणुकीचे वर्ष नसल्यामुळे २०२६-२७ या वर्षीचा अर्थसंकल्प लोकप्रिय राहणार नाही, हे आधीच स्पष्ट झाले होते. आता परंपरेप्रमाणे सत्ताधारी पक्षाचे सदस्य या अर्थसंकल्पाचे तोंड भरून कौतुक करतील, तर विरोधी पक्षांचे सदस्य त्यावर तुटून पडतील. सामान्यपणे कोणताही अर्थसंकल्प सत्ताधारी पक्षाचे सदस्य जेवढे कौतुक करतात, तेवढा चांगला नसतो आणि विरोधी पक्षांचे सदस्य ज्या त्वेषाने टीका करतात, तेवढा वाईटही नसतो. तुम्ही डोळ्यावर जसा चष्मा घालाल, तसा अर्थसंकल्प तुम्हाला दिसत असतो. त्यामुळे विरोधी पक्षांच्या सदस्यांना निराशाजनक, लोकविरोधी वाटणारा अर्थसंकल्प सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना विकासाला चालना देणारा वाटत असतो.

२०२५-२६ च्या अर्थसंकल्पात आयकराची मर्यादा १२ लाख रुपये करण्यात आल्यामुळे यावर्षी पगारदार वर्ग आणि मध्यमवर्गीयांच्या पदरात काही पडणार नाही, हे सांगायला ज्योतिष्याची गरज नव्हती. पगारदार वर्ग तसेच मध्यमवर्गाचे संपूर्ण लक्ष आयकराची मर्यादा किती वाढवली, यावरच केंद्रित असते, त्यात गैरही काही नसते. गुरुवारी संसदेत सादर करण्यात आलेल्या आर्थिक अहवालातून यंदाचा अर्थसंकल्प कसा राहणार, याची कल्पना आली होती. या अर्थसंकल्पाने निराशा केली नाही. अर्थमंत्री म्हणून निर्मला सीतारामन् यांनी सादर केलेला अर्थसंकल्प हा नववा आहे. आपल्या देशात अन्य अनेक खाती महिला मंत्र्यांनी भूषवली, पण अर्थखाते भूषवणाऱ्या सीतारामन् या पहिल्याच आहेत. नववा अर्थसंकल्प संसदेत सादर करत त्यांनी नऊ अर्थसंकल्प सादर करणाऱ्या काँग्रेसच्या पी. चिदम्बरम यांची बरोबरी केली आहे. पुढील वर्षी म्हणजे २०२७ मध्ये अर्थसंकल्प सादर करत सीतारामन् सर्वाधिक म्हणजे दहावेळा अर्थसंकल्प सादर करणारे अर्थमंत्री मोरारजी देसाई यांची बरोबरी करतील. २०२८ चा म्हणजे २०२९ च्या लोकसभा निवडणुकीच्या आधीचा अर्थसंकल्प सादर करत सीतारामन् देशात सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प सादर करणाचा विक्रम करतील. यात शंका नाही.

अर्थमंत्री मग तो राज्यातील असो की केंद्रातील, तो फारसा लोकप्रिय कधीच नसतो. अर्थमंत्र्याने लोकप्रिय होण्याचा प्रयत्न केला तर देशाच्या अर्थव्यवस्थेचे वाटोळे व्हायला वेळ लागणार नाही. त्यामुळे अर्थमंत्र्याने कठोरच राहायला पाहिजे. आई मुलांचे सतत लाड करू शकते, पण वडिलांना तसे करता येत नाही. अर्थमंत्री हा मुलांना शिस्त आणि चांगले वळण लागावे म्हणून सतत रागावणाऱ्या वडिलांसारखा असतो. कारण तो मुलाच्या उज्ज्वल भविष्याचा विचार करत असतो. अर्थमंत्र्याची स्थिती यापेक्षा वेगळी नसते. त्याला देशाचे उत्पन्न आणि खर्च यांची सांगड घालावी लागते. अंथरूण पाहून पाय पसरावे, अशी एक म्हण आहे. अर्थमंत्र्याला या म्हणीला सतत जागावे लागते. त्याला आजचा नाही तर उद्याचा विचार करावा लागतो. अर्थमंत्री हा जसा काटकसर करणारा असावा तसाच तो उधळपट्टी करणाराही नसावा. पण आवश्यक तेथे त्याने पैसा देताना आपला हात कधीच आखडता घेऊ नये, अशी त्याच्याकडून अपेक्षा असते. निर्मला सीतारामन् या कसोटीवर उतरल्या आहेत. देशातील पायाभूत सुविधांच्या विकासावर भर देताना त्यांनी गोरगरीब जनतेच्या कल्याणाकडेही आपले दुर्लक्ष होऊ दिले नाही. अर्थसंकल्पातून त्यांनी संतुलन साधले आहे.

भारत ही जगातील सर्वांत वेगवान अर्थव्यवस्था आहे. सध्या भारत ही जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असली तरी लवकरच जगातील तिसऱ्या अर्थव्यवस्थेच्या पायदानावर आपण उभे होणार आहे. सीतारामन् यांचा अर्थसंकल्प हा या दिशेने वाटचाल करणारा आहे. कोट्यवधी भारतीयांनी विकसित भारताचे जे स्वप्न पाहिले, ते साकार करण्याच्या दृष्टीने या अर्थसंकल्पातून आश्वासक असे पहिले पाऊल टाकले आहे. शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला आणि सर्वसामान्य जनतेसाठी अनेक भरीव उपाययोजना या अर्थसंकल्पातून करण्यात आल्या आहेत. संतुलित विकासाचा पाया या अर्थसंकल्पातून घालण्यात आला आहे. आयकराच्या मर्यादेत वाढ झाली नसली तरी अन्य मार्गाने पगारदारवर्गाला दिलासा देण्यात आला आहे, हे आपल्याला विसरता येणार नाही. आत्मनिर्भर आणि विकसित भारत हा मोदी सरकारच्या दृष्टीने निव्वळ नारा नाही तर संकल्प आहे आणि त्या संकल्पाची पूर्ती करण्याच्या दृष्टीने अनेक पावले या अर्थसंकल्पातून उचलण्यात आली आहेत. सीतारामन् यांनी अर्थसंकल्पातून उत्पादन क्षेत्र, पायाभूत सुविधा, ग्रामीण विकास, आरोग्य क्षेत्र आणि पर्यटन क्षेत्राला स्पर्श केला आहे. महागाई कमी करण्यासोबत रोजगार वाढवण्याला प्राधान्य दिले आहे. मोदी सरकारची वाटचाल पहिल्या दिवसापासूनच एकात्म मानववादाचे प्रणेते पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या अंत्योदय या धोरणानुसार सुरू आहे. समाजातील शेवटच्या माणसाचे कल्याण म्हणजे अंत्योदय. मोदी सरकारचे मागील १२ वर्षांतील सर्व अर्थसंकल्प समाजातील शेवटच्या माणसाच्या कल्याणाचे नुसते स्वप्न पाहणारे नाही तर त्याची पूर्तता करणारे होते. निर्मला सीतारामन् यांनी संसदेत रविवारी सादर केलेला अर्थसंकल्प हा याच भूमिकेचा परिचायक म्हणावा लागेल. समाजातील शेवटचा माणूस गोरगरीब, शोषित, पीडित, वंचित आणि दलित वर्गातील असतो, त्यामुळे या वर्गाला न्याय मिळवून देण्यासाठी सीतारामन् यांनी अर्थसंकल्पात अनेक उपाययोजना केल्या.

काही वर्षांपूर्वी रेल्वेचा स्वतंत्र अर्थसंकल्प मांडला जात होता, पण मोदी सरकारने ही प्रथा बंद केली आणि मूळ अर्थसंकल्पातच रेल्वेचा अर्थसंकल्प समाविष्ट केला. या अर्थसंकल्पात सात हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर सुरू करण्याची घोषणा आहे. अर्थमंत्र्याला देशातील कोणत्याही एका राज्याचा विचार करून चालत नाही, त्याला देशातील सर्व राज्यांचा सारखा विचार करावा लागतो. ज्याप्रमाणे आई-वडिलांना सर्व मुले सारखी असतात, कोणा एका मुलावर त्यांचे प्रेम नसते, तशीच स्थिती अर्थमंत्र्याची असते. त्याच्यासाठी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश हे मुलासारखे असतात. त्याला एका राज्याला झुकते माप देताना दुसऱ्या राज्यावर अन्याय करता येत नाही. भेदभावविरहित समन्यायी विकासाच्या तत्त्वाचे त्याला पालन करावे लागते. त्याचेच दर्शन यंदाच्या अर्थसंकल्पातून सीतारामन् यांनी घडवले आहे.

मोदी सरकारच्या आतापर्यंतच्या सर्व अर्थसंकल्पाचे आत्मनिर्भर भारत हे समान सूत्र आहे. 'सबका साथ सबका विकास' या धोरणानुसार मोदी सरकारची वाटचाल सुरू आहे. त्यामुळे अर्थसंकल्पातूनही या धोरणाचे प्रतिबिंब उमटणे स्वाभाविक म्हणावे लागेल. जगातील अस्थिर राजकीय परिस्थितीत संरक्षणासाठी तरतुदीत लक्षणीय वाढ करण्यात आली आहे, ज्याची खरोखर आवश्यकता होती. आरोग्य आणि शिक्षण या दोन प्रमुख क्षेत्रांसाठीही सीतारामन् यांनी भरीव तरतूद केली आहे. नरेंद्र मोदींसारखा दूरदृष्टीचा पंतप्रधान आणि निर्मला सीतारामन् यांच्यासारखी संवेदनशील अर्थमंत्री ज्या देशात आहे, त्या देशाला विश्वगुरू होण्यापासून कोणी रोखू शकत नाही. जगातील कोणतीही ताकद भारताचे विश्वगुरू हे पद हिरावून घेऊ शकत नाही. प्राचीन भारतीय संस्कृती, समृद्ध वारसा आणि वसुधैव कुटुंबकम् ही वृत्ती यामुळे भारत कालही महान होता, आजही महान आहे आणि उद्याही महान राहणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी संसदेत सादर केलेला अर्थसंकल्प भारताचे मोठेपण दर्शवणारा आहे. त्यामुळेच सीतारामन् यांच्या अर्थसंकल्पात अर्थ आहे आणि विकसित भारताचा संकल्पही आहे, असे म्हटले तर ते अनाठायी ठरू नये.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**


# पाक-बांगलादेश एकीकरण?

५५ वर्षांपूर्वी - १९७१ च्या डिसेंबर महिन्यात पाकिस्तानचे दोन तुकडे करण्यात आले. पाकिस्तान आणि बांगलादेश. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी फार दूरवरचा विचार करून पाकिस्तानचे दोन भाग करण्याचा निर्णय घेतला होता. ५५ वर्षांनंतर २०२६ मध्ये सुरू झालेला घटनाक्रम पाहता आता हे 'दोन तुकडे' पुन्हा एकत्र येतील काय, असा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे.

**पूर्व आणि पश्चिम :** १९४७ मध्ये पाकिस्तान अस्तित्वात आल्यापासून पूर्व व पश्चिम पाकिस्तानात फारसे सख्य नव्हते. पूर्व पाकिस्तानवर बंगाली संस्कृतीचा पगडा होता, तर पश्चिम पाकिस्तानवर पंजाबी संस्कृतीने आपली जरब बसविली होती. यातूनच पश्चिम पाकिस्तानातील लष्करी अधिकारी पूर्व पाकिस्तानला 'गुलाम' म्हणून वागवीत असत. त्यातून पूर्व पाकिस्तानी जनतेत एक प्रकारचा असंतोष तयार झाला व त्याची परिणती शेख मुजीबूर रहेमान यांच्या नेतृत्वाखाली 'मुक्ती बाहिनीने' सशस्त्र आंदोलन करण्यात झाली आणि या आंदोलनाला संपूर्ण पाठिंबा देण्याचा निर्णय इंदिरा गांधींनी घेतला होता. हे युद्ध सुरू करण्यापूर्वी इंदिरा गांधींनी दोन निर्णय घेतले होते. चीन तटस्थ राहील, तो यात पडणार नाही, असे आश्वासन त्यांनी मिळविले होते आणि दुसरीकडे अमेरिकेने पाकिस्तानला मदत केल्यास तत्कालीन सोवियत युनियन भारताच्या मदतीला धावून येईल, असा शब्द या देशाचे सर्वेसर्वा लिवोनिद ब्रेझनेव्ह यांनी इंदिरा गांधींना दिला होता. ठरल्याप्रमाणे, चीन तटस्थ राहिला आणि अमेरिकाही त्यात पडली नाही. काही दिवसांतच युद्ध संपले, पण पाकिस्तानचे दोन तुकडे करून नवा देश - बांगलादेश भारताचा मित्र झाला. मागील तीन वर्षांत मात्र बांगलादेशचे चित्र बदलले आहे.

**चीन आणि आयएसआय :** बांगलादेशला भारतापासून वेगळे करण्यात चीन व आयएसआय यांची निर्णायक भूमिका राहिली आहे आणि आता पाकिस्तान-बांगलादेश सरत्या दिवसागणिक जवळ येत आहेत. यांची ही जवळीक येणाऱ्या महिन्यांत नाही तर काही वर्षांत दोन्ही देशांच्या एकीकरणात बदलेल काय, असा प्रश्न आताच विचारला जाऊ लागला आहे. दोन्ही देशांमधील व्यापार वाढला आहे. शिष्टमंडळांची आवक-जावक वाढली आहे. आता तर बांगलादेशने पाकिस्तानकडून लढाऊ विमाने खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे.

**समान धागा :** दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व सोवियत युनियन यांनी जर्मनीचे विभाजन केले. पश्चिम जर्मनी लोकशाहीवादी झाली तर पूर्व जर्मनीवर कम्युनिस्ट शासन राहिले. केवळ देशाचे नाही तर बर्लिन शहराचेही विभाजन करण्यात आले. बर्लिन भिंत अस्तित्वात आली. पण, जनमताचा रेटा एवढा जबर होता की बर्लिन भिंत कोसळून पडली आणि दोन्ही देशांचे एकीकरण झाले. कारण, दोन्ही देशांना जोडणारा महत्त्वाचा दुवा होता- ख्रिश्चन धर्म!



**इस्लामसाठी :** आणि नेमका 'धर्म' हाच धागा पाकिस्तान आणि बांगलादेश यांना जवळ आणत आहे. दोन्ही देशांतील जनतेची बोली भाषा, पीक-पाणी या वेगळ्या असल्या तरी त्यांना जोडणारा दुवा एकच आहे, तो म्हणजे इस्लाम आणि भारताचा विरोध. विशेषतः हिंदुविरोध. बांगलादेशात सतत हिंदूंवर हल्ले केले जात आहेत. एकप्रकारे हिंदूंना जगणे अवघड करण्यात आले आहे. हे सारे एका योजनेनुसार केले जात असल्याचे मानले जाते. हिंदूंवर हल्ले केल्याने भारत-बांगलादेश संबंधात तणाव, तेढ निर्माण होईल, हे गृहीत धरून नेमके ते घडवून आणण्यासाठी हिंदूंना लक्ष्य केले जात आहे आणि बांगलादेश सरकारने यात बघ्याची भूमिका घेतली आहे.

**आता क्रिकेट :** बांगलादेश सरकारने आपल्या क्रिकेट मंडळास भारतात होणाऱ्या टी-२० क्रिकेट स्पर्धेसाठी आपला संघ न पाठविण्याचा आदेश दिला आहे. भारताशी असलेले सर्व प्रकारचे संबंध हळूहळू तोडण्याचा प्रयत्न बांगलादेश सरकारने सुरू केला आहे. याने पाकिस्तान सरकार सुखावले आहे.

**विभाजनाची सल :** पाकिस्तानी लष्करामध्ये १९७१ च्या पाकिस्तानी विभाजनाची सल आहे. १९७१ चा बदला म्हणूनच पाकिस्तानने 'ऑपरेशन टोपाक' नावाने काश्मीरला रक्तबंबाळ करण्याचा निर्णय घेतला होता. बांगलादेशातून शेख हसीना सरकारचे पतन झाल्यापासून पाकिस्तानने बांगलादेशला आपल्याकडे ओढण्याची मोहीम चालविली आहे. मग, ही 'मोहीम' मध्येच कशी थांबविली जाईल? या मोहिमेचा अंतिम थांबा पाकिस्तान-बांगलादेशचे विलीनीकरण असेल असे म्हटले जाते.

**काही अडसर :** दोन्ही देशांचे एकीकरण करण्याचा जोरदार प्रयत्न पाकिस्तान लष्कर करणार असले तरी त्यातील सर्वांत मोठा अडसर बांगलादेशचे लष्कर राहणार आहे. बांगलादेश लष्कराला आपले अस्तित्व कायम ठेवायचे आहे. पाकिस्तानी लष्कराची 'दादागिरी' त्यांना चांगली ठावूक आहे. दोन्ही देशांचे विलिनीकरण झाल्यास त्याचा पहिला फटका आपल्याला बसेल याची बांगलादेश लष्कराला पूर्ण जाणीव आहे.

**दुसरा अडसर :** बांगलादेशातील प्रसार माध्यमे पाकिस्तानला फारशी अनुकूल नाहीत. या माध्यमांवर बंगाली संस्कृतीचा, साहित्याचा आजही प्रभाव आहे. त्यांना सरळसरळ पाकिस्तानात विलीन होणे मान्य नाही.

**चीनची भूमिका :** पाकिस्तान-बांगलादेश संबंधात चीन नेमकी कोणती भूमिका घेतो हे निर्णायक राहणार आहे. आता हे दोन्ही देश एकप्रकारे चीनचे मांडलिक देश झाले आहेत. चीन आणि अमेरिका यांनी ठरविल्यास दोन्ही देशांच्या एकीकरणास फार वेळ लागणार नाही. सध्यातरी दोन्ही देशांची अर्थव्यवस्था चीन-अमेरिकेच्या आर्थिक मदतीवर अवलंबून आहे.

**एकी तर झालीच :** पाकिस्तान-बांगलादेशचे एकीकरण होईल काय, झाल्यास ते केव्हा होईल, या प्रश्नांची उत्तरे आज देणे अवघड असले तरी दोन्ही देशांत एकी मात्र झालेली आहे. अनेक बाबतीत ते संयुक्तपणे निर्णय घेऊ लागले आहेत. लष्करी करारांची देवाणघेवाण सुरू झाली आहे. बांगलादेश पाकिस्तानकडून लढाऊ विमाने खरेदी करणार आहे! ती कुणाविरुद्ध वापरण्यासाठी? अर्थातच भारताच्या विरोधात याचा वापर होण्याची शक्यता आहे.

**पाकिस्तानचा फायदा :** पाकिस्तान-बांगलादेश यांचे एकीकरण झाल्यास त्याचे काय परिणाम असतील याचा ताळेबंद मांडला जाऊ लागला आहे. पाकिस्तानच्या तुलनेत बांगलादेशने मागील ५० वर्षांत चांगली प्रगती केली. जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणे निधी यांनी बांगलादेशच्या प्रगतीचे भरभरून कौतुक केले आहे. पाकिस्तान-बांगलादेशचे एकीकरण झाल्यास, त्याचा पाकिस्तानला चांगला फायदा होईल असे मानले जाते. पाकिस्तानात सध्या 'औरंगजेब' युग सुरू आहे. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ श्री. औरंगजेब यांना अर्थमंत्री करण्यात आल्यापासून त्यांनी आर्थिक सुधारणांचा धडाका लावला आहे. खाजगीकरणाचे वारे पाकिस्तानातही वाहू लागले आहेत. यास बांगलादेश जोड मिळाल्यास पाकिस्तान 'बिमारू' अवस्थेतून बाहेर येईल असे मानले जाते.

**मोठे मुस्लिम राष्ट्र :** इंडोनेशिया हा जगातील सर्वाधिक मुस्लिम लोकसंख्या असलेला देश मानला जातो. जवळपास २८ कोटी मुस्लिम या देशात आहेत. पाकिस्तान-बांगला देश याचे एकीकरण झाल्यास तो सर्वाधिक मुस्लिम लोकसंख्या असणारा देश ठरेल. पाकिस्तानची लोकसंख्या आजच २५ कोटींच्या घरात, तर बांगलादेशची लोकसंख्या १७ कोटींच्या जवळपास आहे. म्हणजे एकीकृत पाकिस्तानची लोकसंख्या ४२ कोटींच्या घरात जाईल. आज भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे. भारतानंतर चीनचा क्रमांक लागतो. पाकिस्तान-बांगलादेश यांची संयुक्त लोकसंख्या विचारात घेतल्यास हा देश तिसऱ्या क्रमांकावर असेल, त्याचे भौगोलिक आकारमान वाढलेले असेल. याचा भारतावर होणारा सरळ परिणाम म्हणजे भारताच्या पूर्व-पश्चिम या दोन्ही सीमा संवेदनशील होतील. म्हणजेच भारताला आपल्या संरक्षणखर्चात मोठी वाढ करावी लागेल. भारताला यासाठी बाध्य करण्यासाठी चीन, पाकिस्तान-बांगलादेश एकीकरणाला आशीर्वाद देऊ शकतो. दोन्ही देशांचे एकीकरण, विलीनीकरण आज दृष्टिपथात दिसत नसले तरी दोन्ही देशांमध्ये सुरू झालेले सहकार्याचे युग मात्र निश्चितच 'दृष्ट' लागण्यासारखे आहे.

## वेध

**हेमंत सालोडकर**

# सुनेत्रा पवारांच्या निमित्ताने...

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली. अजित पवार यांच्यावर अन्त्यसंस्कार झाला आणि लगेच त्यांच्या जागी पक्षाचे नेतृत्व कोण करणार अशी चर्चा सुरू झाली. काळ आणि वेळ कुणासाठी थांबत नाही असे म्हणतात. काळ जसा पुढे जातो, तसे दुःख विसरावे लागते, तसेच राष्ट्रवादी काँग्रसमध्ये झाले. अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना जबाबदारी स्वीकारावी लागली आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांना नेतृत्व मिळाले. अजित पवारांबाबत अशी दुर्दैवी घटना घडून आपल्याला पक्षाचे नेतृत्व करावे लागेल, असे स्वप्नातही सुनेत्रा पवार यांना वाटले नसेल. पण दुःख सहन करून त्यांनी पक्षाचे नेतृत्व स्वीकारले आणि उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या.

यापूर्वीही देशातील आणि पुरोगामी म्हणून ओळख असलेल्या महाराष्ट्रातील अनेक महिलांनी विविध क्षेत्रांत स्वतःचे नाव उंचावले आहे. राजकारणातही महिलांनी सर्वोच्च पदे भूषविली आहेत आणि आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. भारताने वेळोवेळी अशा प्रभावशाली महिला राजकीय व्यक्ती पाहिल्या आहेत. त्यांच्या योजना आणि राजकीय वैशिष्ट्यांचे अनेकांनी कौतुक केले आहे. देशाच्या विकासात त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. अनेक महिलांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली. द्रौपदी मुर्मू या विद्यमान राष्ट्रपती आहेत. राजकारणाची सुरुवात अगदी नगरसेविका, आमदार, झारखंडच्या राज्यपाल आणि त्यानंतर राष्ट्रपती असा त्यांचा राजकीय प्रवास राहिला आहे. यापूर्वी अमरावती जिल्ह्यातील प्रतिभाताई पाटील यांनी देशातील सर्वोच्च राष्ट्रपतिपद भूषवले. इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या होत्या. त्यांनी राबविलेल्या अनेक योजना,



घेतलेले धाडसी निर्णय लोकांनी पाहिले आहेत. सुचेता कृपलानी या एक भारतीय स्वातंत्र्यसैनिक आणि राजकारणी होत्या. भारतातील सर्वांत मोठे राज्य उत्तर प्रदेशच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री म्हणून त्यांनी काम पाहिले. भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार करणाऱ्या संविधान सभेचा भाग असलेल्या १५ महिलांमध्ये त्या होत्या. अरुणा असफ अली यांच्यासह अनेक महिला भारत छोडो आंदोलनात आघाडीवर होत्या. सोनिया गांधींसमोरही आकस्मिक स्थिती निर्माण झाली होती. बॉम्बस्फोटात राजीव गांधी यांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांनी काँग्रेस पक्षाचे नेतृत्व केले. भारतीय जनता पक्षाच्या कुशाग्र नेत्यांमध्ये सुषमा स्वराज यांचे नाव नेहमीच घेतले जाते. त्या नरेंद्र मोदी यांच्या पहिल्या सरकारमध्ये भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्री होत्या. इंदिरा गांधींनंतर हे पद भूषवणाऱ्या त्या दुसऱ्या महिला होत्या. त्या सात वेळा खासदार आणि तीन वेळा विधानसभेच्या सदस्य म्हणून निवडून आल्या. त्यांनी दिल्लीच्या यशस्वी मुख्यमंत्री म्हणून काम पाहिले. अशाच कर्तृत्ववान महिलांमध्ये पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, शीला दीक्षित, जयललिता, मायावती, रेखा गुप्ता, वसुंधरा राजे, सुप्रिया सुळे यांचा समावेश होतो. इतकेच काय तर देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी तर नवव्यांदा अर्थसंकल्प सादर केला. देशाच्या तिजोरीची चावी महिलेच्या हाती असल्याचा अभिमान सर्व महिलांना आहेच. पौराणिक, इतिहास काळातही महिलांनी कर्तृत्व गाजविले आहे. त्यांनी अनेक संकटप्रसंगी देशाचे नेतृत्व केले आहे. महाराष्ट्रात डॉ. नीलम गोऱ्हे, पंकजा मुंडे, नवनीत राणा, पूनम महाजन, वर्षा गायकवाड, प्रणिती शिंदे यांनीही आपल्या कर्तृत्वाने महिलांचे नेतृत्व केले आहे. आता याच मालिकेत सुनेत्रा पवार यांना महाराष्ट्रात पक्षाचे आणि राज्याचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर संपूर्ण राज्य शोकाकुल आहे. अजितदादांची पोकळी कधीही भरून निघणार नाही, हे सत्य असले तरी काळ पुढे सरकत असतो. तसे आपल्यालाही त्याच्यासोबत चालावे लागते. राजकीय नेत्याला कुटुंब, पक्ष, समाजाचे नेतृत्व करायचे असते. आपले दुःख विसरून समाजाचे नेतृत्व करायचे असते. सुनेत्रा पवारांना राजकीय वारसा लाभला आहे. अजित पवारांचे राजकारण त्यांनी जवळून पाहिले आहे. त्यांची काम करण्याची पद्धत, निर्णयक्षमता, कार्यकर्त्यांना सांभाळणे, त्यांच्या समस्या, राजकीय डावपेच याचा अभ्यास त्यांना नक्कीच असणार. सुनेत्रा पवार या राज्यसभेच्या खासदार आहेत. त्यामुळे त्यांनी स्वीकारलेली उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी त्या व्यवस्थित पार पाडतील यात शंका नाही.

९८५०७५३२८१

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# आणखी किती दिवस असे चालणार?

उत्तर प्रदेशातील मिर्जापूर जिल्ह्यात जिम म्हणजे महिला व्यायामशाळेच्या नावाखाली महिलांना एकत्र करणे, कॅमेऱ्याद्वारे त्यांच्या आक्षेपार्ह चित्रफीत बनविणे, त्याच्या आधारावर त्यांच्याकडून पैसे उकळणे व धर्मांतरणासाठी दबाव टाकणे, अत्याचार आणि शोषण करणे इत्यादी आरोप इम्रान खान नावाच्या आरोपीवर आहेत. इतके सर्व होऊन ५० पैकी केवळ एक महिला पोलिसात तक्रार करण्याची हिंमत दाखवते. ही सर्वच परिस्थिती चिंताजनक आहे. दुसरी घटना उत्तर प्रदेशातील मुरादाबाद येथे पाच मुस्लिम मुलींनी एका हिंदू मुलीला बळजबरीने बुरखा घालायला लावला. त्या केरळ फाईल चित्रपटाप्रमाणे तिच्यावर धर्मांतरित होण्यासाठी दबाव टाकत होत्या. त्यांच्यावरही गुन्हा दाखल झालेला आहे. तिसरी घटना वाशीम जिल्ह्यात समोर आली आहे, ज्यामध्ये एका विवाहित शाहरुख नावाच्या तरुणाने अल्पवयीन मुलीला लग्नासाठी दबाव टाकल्याचे समोर आलेले आहे. या सर्व प्रकाशित घटना आहेत, परंतु अप्रकाशित घटनांचे काय? त्या सुद्धा भरपूर आहेत.

बरेचदा अशा घटना पोलिसांकडे येत नाहीत कारण अशा प्रकरणात बळी ठरलेल्या ज्या महिला असतात, त्यांना आपल्या बदनामीची भीती वाटत असते. अनेक वेळा हे आरोपी ज्या धर्माचे आहेत, त्यांच्या गुन्हेगारी पृष्ठभूमीमुळे सुद्धा अनेक महिलांना असे प्रकरण पोलिसांपर्यंत नेण्याची भीती वाटत असते. बरेचदा या गुंड लोकांकडून त्यांना त्यांच्या घरच्यांना जीवे मारण्याच्या किंवा दुखापत करण्याच्या धमक्या दिल्या गेलेल्या असतात.

अशाच एका घटनेमध्ये एक महिला आपले गाव सोडून नागपुरात राहिली, परंतु तेथे आरोपी व आरोपीचा वडील हे दोघेही आले व त्यांनी सुद्धा अत्याचार केला. अशा वेळेस कायद्याचे राज्य कुठे आहे, असा प्रश्न पीडितांना पडत असावा. समाज माध्यमांवर नाव बदलून, आपला धर्म लपवून मैत्री करणाऱ्यांची व त्यातून गुन्हे घडविणाऱ्यांची संख्या सुद्धा काही कमी नाही. अशा सर्व प्रकरणांमध्ये सर्वसामान्य समाज अशा बातम्या वर्तमानपत्रात वाचतो आणि त्यावर दुःख व्यक्त करीत आपल्या कामाला लागतो, पण असे सर्व किती दिवस चालणार हा मात्र प्रश्न आहे.

महानगर असो वा ग्रामीण भाग अशा सर्व ठिकाणी यांच्या कारवाया सुरू असतात. यांचा उद्देश हा केवळ गुंडगिरी आणि दहशत माजवणे हा नाही, तर हिंदू महिलांचा अपमान करणे, त्यांना त्रास देणे हा सुद्धा आहे. त्यांचा हा पक्का समज असतो की आपल्या येथील न्यायव्यवस्था, पोलिस प्रशासन माझे काही बिघडवू शकत नाही. अत्याचाराच्या कुठल्याही प्रकरणात शिक्षा झाल्यास दोन-चार-दहा वर्ष तुरुंगामध्ये काढण्याची त्यांची तयारी असते. त्यांच्या समाजामध्ये अशा आरोपींना वाईट समजले जात नाही, त्यामुळे त्यांची हिंमत आणखी वाढलेली असते. त्यांचा समाज त्यांना शाबासकी देतो. त्यांच्या समाजातील महिला या सुद्धा हिंदू समाजातील गरजू महिलांना हेरून त्याही अशा लोकांना मदतच करीत असतात. मग हिंदू समाजाचे काय? अशा महिलांना धीर देण्याचे कार्य कोणीतरी करायलाच पाहिजे. त्यांच्या पाठीमागे उभे राहण्याचे कार्य सुद्धा केले पाहिजे. हुंडाबळीच्या विरोधात किंवा महिला अत्याचाराच्या इतर घटनांमध्ये जसे मोर्चे निघतात, पोलिसांना निवेदन दिले जाते, जनक्षोभ उसळतो, असे या प्रकरणांमध्ये कधीच दिसत नाही. कदाचित या धर्मातील लोकांची दहशत याला कारणीभूत असू शकते.

पाकिस्तानमध्ये नेहमीच असे प्रकार घडतात की तिथल्या हिंदू मुलींना उचलून नेण्यात आले, त्यांचे धर्मांतरण करण्यात आले. बांगलादेशमध्ये पण असे प्रकार घडत असतात. परंतु हिंदुस्थानामध्ये असे प्रकार घडावे ही लज्जास्पद गोष्ट नव्हे का? हिंदूंच्या हिंदुस्थानामध्ये आम्ही अशा घटना का खपवून घेतो? कुठल्या हिंदुत्ववादी पक्षाच्या, संघटनांच्या नेत्यांना, पदाधिकाऱ्यांना अशा घटनांच्या विरोधात नेतृत्व करावे, समाजाला एकत्रित करावे, त्याचे प्रबोधन करावे, अशा घटना घडू नये यासाठी काय करता येईल याचा विचार करावा असे का वाटत नसावे?

या संदर्भात एक अत्यंत दहशत निर्माण करणारी घटना एका महिलेने मला सांगितली. त्या म्हणाल्या की, ज्यावेळेस त्या कॉलेजमध्ये शिकत होत्या, त्यावेळेस त्या अशाच एका गुन्हेगारी आणि दहशतीत अग्रेसर असणाऱ्या धर्माच्या लोकांच्या वस्तीमध्ये राहत होत्या. त्या जेव्हा कॉलेजला निघायच्या त्यावेळेस गुंड तरुणांचे टोळके त्यांच्या घरापासून तर वस्ती संपतपर्यंत त्यांच्या मागे मागे शिव्या आणि धमक्या देत चालायचे. पुन्हा कॉलेजमधून येताना तसाच प्रकार चालायचा. हा प्रकार त्या ज्या काकांच्या घरी राहायच्या त्यांना सांगायच्या. त्यावर त्यांची काकू त्यांना म्हणायची की, तू सुंदर असल्यामुळे तुझ्या मागे ते लागत असतील. अशा प्रकारे एक वर्ष संपले. एक दिवस सकाळी त्यांनी सडा टाकण्यासाठी दार उघडले तर त्यांना धक्का बसला, कारण त्यांच्या दारासमोर एका माणसाचा मृतदेह पडलेला होता. त्यांचे संपूर्ण कुटुंब भयग्रस्त झाले. त्या नेहमीप्रमाणे महाविद्यालयात जायला निघाल्या तेव्हा त्यांच्या मागे मागे जाणाऱ्या टोळक्यातील एका तरुणाने त्यांना सांगितले की, याला मी मारून तुझ्या दारासमोर फेकलेले आहे. एक दिवस तुझ्या काकालाही असेच मारून टाकील. त्यांनी ही गोष्ट आपल्या घरी सांगितली. यावर त्यांच्या काकूने तिचे तात्काळ लग्न करून टाका असे फर्मान सोडले. शेवटी त्यांचे महाविद्यालयाच्या द्वितीय वर्षाला शिकत असताना लग्न झाले. हे असे किती दिवस चालणार? हिंदूंच्याच देशांमध्ये हिंदूंना तारणहाराची आवश्यकता भासावी हे अतिशय लज्जास्पद आहे. जगन्नाथ पुरीचे शंकराचार्य म्हणाले होते की, ज्यांचा जन्म हिंदू रक्षणासाठी झालेला आहे ते त्यांचे कार्य आज विसरले आहेत का? समाजाने अशा सगळ्या घटनांना बिलकूल सहन करू नये. पोलिस, प्रशासन, राजकीय नेते, हिंदू संघटना या सर्वांवरच समाजाचा दबाव असणे आवश्यक आहे.

"अगणित सीताये अपहृत है, महावीर निजको पहिचानो. अपमानित दृपदाए कितनी समरधीर शरको संधानो" असे म्हणण्याची आवश्यकता आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### जग खूप सुंदर आहे, फक्त नीट जगता यायला हवं

परमेश्वराने निर्माण केलेले हे जग खूप सुंदर आहे. मानवाला उत्तम जीवन जगता यावं या उद्देशाने देवाने इथली प्रत्येक गोष्ट डिझाईन केलेली आहे. जेणेकरून माणूस आपलं जीवन आनंदाने शंभर वर्षांपर्यंत समाधानाने जगू शकेल, एवढे परिपूर्ण आहे. माणसाला जीवन जगायला या जगाइतके दुसरे सुंदर स्थान ब्रह्मांडात असू शकत नाही. विश्वास बसत नसेल तर, मानवी जीवन जगायला दुसरे उत्तम स्थान आहे काय? याचा शोध घ्यायला आजपासून सुरुवात करा आणि असं एक नवीन जग शोधून काढा, जिथे असेल सर्व काही छान- छान ,अगदी तुमच्या मनासारखं तुम्हाला हवं तसं. जिथे स्पर्धा नसेल, वादविवाद नसेल, संघर्ष नसेल, शत्रू नाही, अपमान नाही, राजकारण नाही, टीकाकार नाही, ईर्ष्या नाही, भेदभाव, द्वेष, मत्सर नाही, सर्व कसं अगदी तुम्हाला हवं तसं, फक्त तुम्ही आणि तुमचे आनंदी जग. अशा स्वप्नवत जगात तुम्हाला जीवन जगायला आवडेल का? सखोल विचारांती तुमचं उत्तर असेल, नाही. कारण, संघर्षाशिवाय मानवजीवन असूच शकत नाही आणि असेल तर ते जीवन नसेल. एवढं मात्र खरं. आज प्रत्येक घडीला, हे जग फार वाईट आहे, कुणी कुणाचं नाही, हे जग दुःखालय आहे, अशी वाक्ये कोणत्या तरी दिशेने, कुणाच्यातरी मुखातून आपल्या कानावर आदळत असतात आणि हेच पूर्ण सत्य माणून, जगाविषयी आपण चुकीचा भ्रम निर्माण करून जीवनाकडे बघत असतो. पण प्रत्यक्षात मात्र हे जग मानवासाठी परिपूर्ण आहे. या जगात माणसाने निसर्ग नियमानुसार प्रामाणिकपणे जगायला सुरुवात केली तर हे जग अधिक सुंदर दिसेल व जगणंही आनंदी होईल. परमेश्वराने आपल्याला येथे जीवन जगायला पाठवले आहे. ज्या ज्या गोष्टी परमेश्वराने निर्माण केल्या आहेत त्या वाईट असूच शकत नाही. कारण ब्रह्मांडातील दिव्य शक्ती, मानवाच्या आणि पृथ्वीच्या हितासाठी सदैव कार्यरत असतात. म्हणून ज्या जगात, ज्या देशात, ज्या धर्मात, ज्या कुळात आपला जन्म झाला आहे तेच आपल्यासाठी सर्वश्रेष्ठ आहे. आपण जसे आहोत, जिथे आहोत तिथेच छान आहोत. मी या जगाला माझ्यातलं सर्वोत्तम काय देऊ शकतो, जेणेकरून माझ्यामुळे हे जग अधिक सुंदर होईल आणि इतरांनाही सुंदर वाटेल.

**विजय इंगोले**/जुनी वस्ती, बडनेरा

## वाचक पत्रे

### गिग कामगारांचे उत्पन्न आणि निवृत्तिवेतनधारक

संसदेत नुकत्याच सादर करण्यात आलेल्या आर्थिक सर्वेक्षणानुसार गिग कामगारांचे मासिक उत्पन्न १५ हजारांपेक्षा कमी असल्याची माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिली. भारतात सुमारे ४० टक्के गिग कामगार असल्याचे सांगण्यात आले. यात वाढ करण्याची गरज असल्याचे सांगण्यात आले. गिग कामगारांचे काम मेहनतीचे आहे. घरोघरी जाऊन गरजू वस्तूंचा पुरवठा हे कामगार करीत आहे. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्याची गरज आहे जेणेकरून ते आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या चांगल्या पद्धतीने पार पाडू शकतील. याचबरोबर ईपीएस ९५ अंतर्गत निवृत्ती वेतन प्राप्त करणाऱ्यांची चिंता केंद्र सरकारने करायला हवी. गिग कामगारांना किमान मासिक १५ हजारापर्यंत किमान उत्पन्न मिळत आहे. पण ज्यांनी सरकारी/निम सरकारी, खाजगी सेवेत आपल्या आयुष्याची ३० ते ४० वर्षे घालविली आणि प्रामाणिकपणे देशाच्या विकासात योगदान दिले, त्यांना त्यांच्या सरत्या आयुष्यात वार्षिक १२ हजार आणि काहींना त्यापेक्षाही कमी उत्पन्न मिळतं ही वस्तुस्थिती सरकार नजरेआड का करीत आहे हे न उलगडणारे कोडे आहे. सप्टेंबर २०१४ पासून निवृत्ती वेतनात वाढ झालेली नाही. आशेवर जगणाऱ्यांपैकी काहींनी मधल्या काळात अखेरचा श्वास घेतला पण केंद्र सरकारला पाझर फुटला नाही. या गंभीर विषयाकडे केंद्र सरकारने सहानुभूतीच्या नजरेतून बघावे, ही माफक अपेक्षा आहे.

**वसंत पिंपळापुरे**/नागपूर

### संसारातून परमार्थाकडे नेणारे श्रीशैल्य गमन...

श्री नृसिंह सरस्वती महाराज हे दत्तसंप्रदायातील द्वितीय अवतार मानले जातात. माघ वद्य प्रतिपदेला श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांचा श्रीशैल्य (कर्दळीवन) गमन दिवस साजरा केला जातो. हा दिवस गुरुप्रतिपदा म्हणूनही ओळखला जातो. गाणगापूर येथे २४ वर्षे वास्तव्य केल्यानंतर, तेथे आपल्या निर्गुण पादुका स्थापन करून या दिवशी स्वामींनी गाणगापूर सोडले आणि श्रीशैल्य पर्वत यात्रेला निघाले. दत्तसंप्रदायात हा दिवस अत्यंत पवित्र मानला जातो. केवळ भौगोलिक प्रवास करणे हा या यात्रेचा उद्देश नव्हता तर, संसारातून परमार्थाकडे जाण्याचा गूढ आध्यात्मिक संदेश या गमनातून स्वामींनी दिला आहे. श्रीशैल्य येथे स्वामींनी दीर्घ तपश्चर्या केली आणि मौनव्रत धारण केले.

स्वामींचे संपूर्ण जीवन धर्म, वैराग्य, तपस्या आणि लोककल्याणासाठी समर्पित होते. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्रांना भेटी देऊन श्री दत्त उपासनेचा व्यापक प्रसार केला. दत्त उपासनेचे महत्त्व त्यांनी जनमानसात खोलवर रुजवले. श्रीशैल्य गमनानंतर स्वामी महाराजांनी कर्दळीवनात गुप्त स्वरूपात आपले कार्य अखंडपणे चालू ठेवले. या दिवशी दत्तभक्त उपवास, जप, अभिषेक व दत्तनामस्मरण करतात. संसारातून परमार्थाकडे जाण्याचा आत्मबोध देणारा हा पवित्र दिवस आहे.

**रेणुका हरदास**/नागपूर

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# बनावट विदेशी मद्य प्रकरणी आरोपीस जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१ फेब्रुवारी-**

गोवा राज्यात विक्रीस असलेले परंतु महाराष्ट्रात विक्रीस प्रतिबंधित असलेले विदेशी मद्य महाराष्ट्रातील परवानाधारक दारूच्या रिकाम्या बाटल्यांमध्ये भरून बनावट मद्य तयार करून विक्री केल्याच्या गंभीर प्रकरणात अटक करण्यात आलेल्या सोलापूर येथील आरोपीस न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. सुमित राजेंद्र गडगी (रा. सोलापूर) असे त्या आरोपीचे नाव आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागास २७ जानेवारी २०२६ रोजी खात्रीलायक बातमी मिळाल्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचांसह सोलापूर शहरातील रंगराज नगर, आर्यन इंग्लिश मिडियम स्कूलसमोर असलेल्या गडगी फार्म हाऊसवर छापा टाकला. छाप्यादरम्यान घराच्या पोर्चमध्ये एक इसम संशयास्पद अवस्थेत आढळून आला. तपासणी दरम्यान फार्म हाऊसमधील दोन खोल्यांमध्ये विविध बँडच्या विदेशी दारूच्या भरलेल्या व रिकाम्या बाटल्या, कागदी बॉक्समध्ये साठवून ठेवल्याचे निदर्शनास आले.



तपासात मास्टर डिलक्स, किंगफिशर, रॉयल स्टॅग, ओल्ड मंक, ब्लेंडर्स प्राईड, मॅकडोवेल्स, इम्पेरियल ब्लू, ट्युबर्ग बिअर आदी बँडचा सुमारे ८ लाख ४ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. सदर दारू गोव्यात विक्रीस असलेली असल्याचे आरोपीने कबूल केले. यासह बनावट विदेशी मद्य तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या रिकाम्या बाटल्याही जप्त करण्यात आल्या.

आरोपी सुमित गडगी यास अटक करून त्याच्या विरोधात राज्य उत्पादन शुल्क विभागात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पुढील तपासात आरोपीने सदर मद्य दुसऱ्या व्यक्तीकडून आणल्याचे तसेच अक्कलकोट रोड परिसरातील एका इसमास विक्री केल्याचे सांगितले.

दरम्यान, आरोपीतर्फे ॲड. अभिजीत इटकर यांच्या मार्फत जामिनासाठी अर्ज दाखल करण्यात आला. सर्व मुद्देमाल जप्त झाला असून तपास पूर्ण झाल्याचा युक्तिवाद ग्राह्य धरत सोलापूर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी आरोपीस जामीन मंजूर केला. या प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. अभिजीत इटकर, ॲड. राम शिंदे, ॲड. संतोष आवळे, ॲड. फैयाज शेख व ॲड. सुमित लवटे यांनी काम पाहिले.

# शेती व्यवसायाला लागली घरघर!



राज्य अन् केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पातील शेतकऱ्यांसाठी केलेल्या तरतुदी नको ना... प्रतिवर्षी शेतकऱ्यांना मिळणारी किरकोळ ६ हजाराची पेन्शन नको...आमच्या कष्टाच्या, घामाच्या उत्पादित मालाला फक्त हमीभाव द्यावा, इतकीच माफक अपेक्षा राज्यातील शेतकरी बांधवांची आहे...अन्यथा हळूहळू शेतीव्यवसायच संपुष्टात येईल, अशी भीतीही जाणकार बळीराजाला वाटत आहे.

यामुळे राज्य अन् केंद्रीय अर्थसंकल्पात शेतकऱ्यांच्या इतर पैलुंपेक्षा कर्जमाफी अन् उत्पादित मालाच्या हमीभावावरच चर्चा करून त्याची तातडीने अंमलबजावणी करावी...इस्राईलच्या धर्तीवर शेतीव्यवसायाकडे राज्य सरकारने लक्ष दिल्यास नक्कीच बळीराजा सुखी होईल.

सध्या शेती व्यवसाय करायचा म्हटलं तर सर्वांच्याच अंगावर काटा उभा राहत आहे. प्रतिवर्षी शेतमजुरी वाढत आहे...यांत्रिक मशागतीचे दर वाढतात...खते, बि-बियाणे, औषधे आदींचा दर कंपन्यांकडून बिनधास्त वाढविला जातो...मात्र गरीब बळीराजाच्या एकाही मालाला दरवर्षी योग्य दर मिळत नसल्याने त्यांचे सध्या प्रचंड बेहाल होत आहेत. शेती व्यवसाय करणारे लाखो शेतकरी यामुळेच कर्जबाजारी होताना आपण पाहतो आहे. गेल्या अनेक वर्षांपासून त्यांची एकच हमीभावाचीच मागणी असून अन् हीच हमीभावाची मागणी टाळून दुसऱ्याच किरकोळ सवलती देवून त्यांची नेतेगणांकडून बोळवण केली जाते. राज्यासह केंद्रीय स्तरावरील शेतकरी संघटनांनी हमीभाव, कर्जमाफीसाठी अनेक आंदोलने केली. मात्र त्याचाही काही फायदा होत नाही.

निसर्गाचीही साथ नसल्याने जास्त शेती असणाऱ्या शेतकऱ्यांचा तर पाय अधिकच खोलात जात आहे. गतवर्षीचेच आपल्या सोलापूर जिल्ह्याचे उदाहरण पाहिले तर कधी नाही ती अतिवृष्टी झाल्याने जवळपास सरासरीच्या दीड-दोन पट पाऊस पडला. त्यातच भरीस भर म्हणून २२-२३ सप्टेंबर २०२५ रोजी सीना-भीमा नदीच्या पात्रात महापूर आला आणि नदीकाठच्या शेतकऱ्यांच्या शेतीचा सर्वनाश झाला. अजून ते बिचारे शेतकरी पुराचे नाव काढले की धास्तावत आहेत. या शेतकऱ्यांना शासनाकडून मदत सुध्दा वेळेवर झाली नाही.... यामध्ये कोणाच्या द्राक्षबागा, ऊस, केळीबागा, हळद, सोयाबीन, गोठे, जनावरे आदींसह इतर फळबागा वाहून गेल्या आहेत; होत्याचं नव्हतं झाल्याने शेतकरी दादा धास्तावला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून सोयाबीनसह इतर मालाचे दर वाढत नाहीत, सध्या कांद्याला कवडीमोल भाव येत असल्याने शेतकरी कांदा शेतातच कुजवत आहेत. या कांदापिकासाठी होणारा खर्च याचा अंदाज कोणी कधीही काढला का? सध्याही कांदा घेवून येणारा बळीराजा त्यांच्या हातात आडत्यांची पावती पडताच बाजार समितीसमोर उभा राहून धाय मोकलून रडतो आहे...याचे कितीतरी व्हिडिओ सरकार दरबारी गेले...अनेकांनी कर्जबाजारी होवून आपले जीवन संपविले. दरच वर्षी निसर्गाचा समतोल राहत नसल्याने कायम त्यांच्या शेतातील काही ना काही नुकसान होतच असते. दरवर्षी राज्यातील हजारो शेती व्यवसाय करणारे शेतकरी आर्थिक अडचणीत येवून गळफास लावून आत्महत्या करतात. दरवर्षी देणं काढून (सावकारी किंवा बँकेचे) काळ्या आईची ओटी भरली जाते...काळी आईही अनेकदा भरभरून देते...मात्र मालाला भावच नसल्याने नाक दाबून बुक्क्याचा मार शेतकऱ्यांना बसतो आहे.

पेरणीपूर्व मशागत...पेरणी, बि-बियाणे, खते, पीक उगवणीनंतरची आंतरमशागत, काढणीखर्च, बारदाना, वाहतूक खर्च, व्यापाऱ्यांची आडत, तोलाई, हमाली धरली अन् त्यातच मालाला हमीभाव मिळत नसल्याने शेतकरवर्ग दरवर्षी आर्थिक अडचणीतच जातो आणि त्यांचे पाय अधिकच खोलात जात आहेत. सध्या आपल्या राज्यातील शेती व्यवसायाला अक्षरश: घरघर लागली असून, मोठ-मोठे शेतकरीही हतबल झाले आहेत; वैतागाने अनेकांनी शेती व्यवसाय सोडला आहे. यामुळे आपल्या राज्यात इस्राईल देशाच्या धर्तीवर शेती व्यवसायासाठी नवनवे प्रयोग राबविण्याची गरज आहे...शेतकऱ्यांना बि-बियाणे, वीज, यांत्रिक मशागती, पिकांसाठी पाणी मोफत द्यावे...जेणेकरून बळीराजा कर्जबाजारी होणार नाही अन् आत्महत्या करणार नाही...याची काळजी राज्यातील वरिष्ठ नेत्यांनी घेण्याची गरज निर्माण झाली आहे...अन्यथा शेतीव्यवसाय हळूहळू संपुष्टात येण्यास वेळ लागणार नाही.

**- अविनाश गायकवाड**
**मो. ९४२१८७६३४०**

## निधन वृत्त...

### उत्तम पाटोळे

**सांगोला, दि. १ फेब्रुवारी-**



सांगोला शहरातील परीट गल्ली येथील रहिवाशी व परीट समाज ट्रस्टचे उपाध्यक्ष उत्तम महादेव पाटोळे (वय-६२) यांचे अल्पशा आजाराने रविवारी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, २ भाऊ, भावजयी असा परिवार आहे.

### लक्ष्मीबाई महिंद्रकर

**सोलापूर, दि. १ फेब्रुवारी-**



मुळच्या अक्कलकोटच्या रहिवासी म्हाडा कॉलनी शेजारी शिवाजीनगर नरसिंहनगर येथील लक्ष्मीबाई पांडुरंग महिंद्रकर (वय ९५) यांचे आज शनिवार (दि.३१) रात्री दहा वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर रविवारी मोदी स्मशानभूमीत अंत्यविधी करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातू व पणतू असा परिवार आहे. वालचंद कॉलेजमधील निवृत्त प्रयोगशाळा सहाय्यक शंकरराव महिंद्रकर यांच्या आई आणि हिंगुलांबिका प्राथमिक शाळेच्या माजी मुख्याध्यापिका शीला महिंद्रकर यांच्या त्या सासूबाई होत.


## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या खरेदीपुर्व जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, डि।। व सब डि।। सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील जोडभावी पेठ येथील सिटी सर्व्हे नं.फा. प्लॉट नं.९२०५/१/२४५ यांसी म्यु.पल घर नं. ९४/२४५ याचे एकूण क्षेत्र १८८.२ चौ.मी. असून त्यापैकी मधील भागाची मिळकत क्षेत्र १५.२० यात तळमजला व पहिला मजला मिळून एकूण बांधकाम क्षेत्र २०.५० चौ.मी. येणेप्रमाणे वर नमुद केलेली मिळकत व त्यातील तदंगभुत वस्तुसह. ही मिळकत रमेश रामकृष्ण चेक्कील्ला यांचे मालकी व कब्जे वहिवाटीचे आहे. त्यांनी सदरील मिळकत आमचे अशिल अनारकली महिबुबसाब मनियार यांना विक्री करण्याचे ठरवून त्यांचेकडून इसारापोटी रक्कम स्विकारलेले आहे. व तसेच सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याचे खात्री व हमी आमचे अशिलांस दिलेली आहे.

तरी वर नमुद मिळकतीवर कोणाचेही कसल्याही प्रकारचे गहाण, दान, लिज, भाडे, लिव्ह अ‍ॅन्ड लायसेन्स, बक्षीस, साठेखत, खरेदीखत, पोटगी, टाच, जप्ती, या व इतर अन्य कोणत्याही स्वरुपाचे बोजा, हक्क व हितसंबंध असल्यास अथवा सदर मिळकतीसंबंधी कोणाचेही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत आम्हांस खालील नमुद पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी वैध हरकती नोंदवावीत. मुदतीत कोणाचेही कसलीही तक्रार व हरकत न आल्यास सदरची मिळकत ही संपुर्ण निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे, असे गृहीत धरुन आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. तद्नंतर कोणाचेही हरकत आल्यास ते आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद या खरेदीपुर्व जाहीर नोटीसीने घ्यावी.

ही खरेदीपुर्व जाहिर नोटीस दिली ता. ३१/०१/२०२६.

**सही/-**
**ॲड. अमोल कल्याणी कोटीवाले**
**६०, शांती नगर, मार्केट यार्डजवळ,**
**सोलापूर मो.नं. ९८९०९१०९६०,**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे कासारी, ता. बार्शी येथील लोकांना, तसेच आसपासचे परिसरातील लोकांना, या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की - डि. सोलापूर सब डि. वैराग पैकी, मौजे कासारी, ता. बार्शी हद्दीतील जमीन - ग.नं. ४६ पैकी क्षेत्र ०१ हे. १८ आर, आकार ०२ रू. ५५ पैसे ही जमीन, आतील सर्व झाड, झुडुप, दगड, माती, ताली वगैरे तदंगभूत वस्तुसह.

वर नमूद केलेली जमीन ही, सध्या आमचे अशिलाचा सख्खा भाऊ गोपाळ नामदेव गंभीरे याचे नावे आहे. आमचे अशिल तसेच त्यांच्या बहिणी शारदा विष्वंभर जाधव व वेणू राजेंद्र निकम, यांचे सदर जमीनीत समाईक, अविभक्त असे हिस्से आहेत. त्याबाबत त्यांच्यामध्ये अद्यापही वाटप झालेले नाही. ते समाईकरित्या उपभोग घेतात.

सदर जमीनीस, सदर गोपाळ गंभीरे याचे नावाची नोंद पोकळ स्वरुपी असलेचा, गैरफायदा तो घेऊ लागला आहे. आमचे अशिलास व त्यांच्या बहिणी यांना, सदर जमीनीतील हिस्से मिळू नयेत म्हणून, सदरची माहिती लपवून ठेवून, सदर मिळकतीची विक्री करुन, रक्कम हडप करणेचे प्रयत्नात तो आहे. त्यादृष्टीने त्याने जोरदार खटाटोप चालू केलेला आहे.

तेंव्हा सदर मिळकतीमध्ये, आमचे अशिल व त्यांच्या सदर बहिणींचे समाईक, अविभक्त असो हिस्से असलेने, तसेच त्याबाबत अद्यापही वाटप झालेले नसल्याने, सदर मिळकतीबाबत, सदर गोपाळ गंभीरे याचेशी, कोणीही, गहाण, दान, लीज, भाडेपट्टा, खरेदी, बक्षीस, वहिवाटीचे हक्क, वा तत्सम स्वरूपाचे हस्तांतराचे व्यवहार, तसेच कर्जबोजाचे स्वरुपाचे व्यवहार करू नयेत. तसे व्यवहार केलेस, ते आमचे अशिलाचे हक्क हिस्यावर बंधनकारक राहणार नाहीत. तसे व्यवहार करणाऱ्यावर आमचे आशिल कायदेशीर कारवाई करतील. मग त्याचे खर्चाची व परिणामाची सर्वस्वी जबाबदारी त्यांच्यावरच राहील. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहिर नोटीस दिली. ता. ०१/०२/२०२६

**सही/-**
**ॲड. श्री. गुंड एस.एम. (लाडोळेकर)**
**बी.ए. (ऑनर्स), एल.एल.बी,**
**ॲड. श्री. गुंड ए.एस. (लाडोळेकर)**
**७३०/२/३७ सिध्देश्वर नगर,**
**कासारवाडी रोड, बार्शी,**
**ता. बार्शी, विष्णू नामदेव गंभीरे,**
**रा. कासारी, ता. बार्शी**
**जि. सोलापूर तर्फे ॲडव्होकेटस्**

## ताबा नोटीस नमुना ‘झेड’ (Z NOTICE)

**म.स.सं. नियम १९६० मधिल नियम १०७ (११) ड-१**

## यशवंत नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बार्शी ता. बार्शी

### स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस

ज्या अर्थी मला प्राप्त अधिकारानुसार मी गोपीचंद अरूण तुकशेट्टि विशेष वसुली व विकी अधिकारी **यशवंत नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बार्शी ता. बार्शी** म.स.सं. नियम १९६१ अन्वये खालील थकबाकीदार यांना मागणी नोटीसद्वारे त्यांच्याकडील येणे रक्कम भरण्यास कळविले होते. मात्र त्यांनी रक्कम भरण्यास कसुर केली आहे. त्यामुळे यांच्या स्थावर मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत. सदरचे जप्ती आदेश संस्थेच्या दप्तरी थकबाकीदार यांना पाहण्यास मिळेल. खालील ऋणकोने रक्कम भरण्यास कसुर केल्याने ऋणकोंना नोटीस देण्यात येते की, खाली निर्देशित केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करणाऱ्या अधिकाऱ्याने म.स.सं. १९६१ मधिल नियम १०७ (११)(ड)(१) नुसार असलेल्या अधिकारान्वये रितसर बोजा नोंद करून प्रतिकात्मक ताबा घेतलेला आहे. विशेष करून ऋणको व तमाम नागरिकांना या नोटीसद्वारे सावध करण्यात येते की, या स्थावर मालमत्तेबाबत कोणीही खरेदी-विकी, गहान, दान, टाच, बोजा, किंवा इतर हक्कात व्यवहार करू नयेत. याउपर कोणी कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो **यशवंत नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बार्शी ता. बार्शी** यांच्या खाली दर्शविलेल्या येणे बाकी, बोजाची रक्कम व त्यावरील होणारे व्याज, वसुलीखर्च, यांच्या कायदेशिररित्या अधिन राहावे लागेल याची नोंद घ्यावी.

| अ.नं. | कर्जदार /जामिनदार | मिळकतदार | दाखला क्र. दिनांक | ३१/०१/२६ अखेर येणेबाकी | मिळकत ठिकाण | मिळकत कमांक | क्षेत्र | मालमत्ता प्रतिकात्मक ताबा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मयुर राजेंद्र भगत<br>दिपक गजानन गावसाने<br>अभय नंदकुमार काळे | दिपक गजानन गावसाने | ८७/२०२५<br>१७/०४/२०२५ | १,२७,००१/- | बार्शी<br>ता. बार्शी | १४०१/१ | ०.०१.८५ चौरस मिटरपैकी | ०२/०२/२०२६ |
| २ | विठ्ठल दत्तात्रय लोहार<br>राजेंद्र भिकाजी मोरे<br>सागर गोविंद भालके<br>किरण दत्तात्रय लोहार<br>बालाजी दत्तात्रय रणशिंग (लोहार) | विठ्ठ्ल दत्तात्रय लोहार<br>किरण दत्तात्रय लोहार<br>बालाजी दत्तात्रय रणशिंग (लोहार)<br>राजेंद्र भिकाजी मोरे | ९०/२०२५<br>१७/०४/२०२५ | ५,४३,८०३/- | बार्शी<br>ता. बार्शी<br>बार्शी<br>ता. बार्शी | १८९/१<br>१८९/१ | ०.००.८५<br>चौरस मिटर<br>०.००.७५ चौरसमिटर | ०२/०२/२०२६ |
| ३ | चंद्रकांत बलभिम पिंगळे<br>शिवलिंग मच्छिंद्र चांदणे<br>राजेश दत्तात्रय नायकोजी | शिवलिंग मच्छिंद्र चांदणे<br>मच्छिंद्र विठ्ठल चांदणे | ८२/२०२५<br>१७/०४/२०२५ | २,८१,६३६/- | बार्शी ता.बाश | ३९६/४<br>६०/७६२ | ०.०५.२६ पैकी २.९७.४५<br>बिनशेती | ०२/०२/२०२६ |
| ४ | अरबाज हुसेन अन्सारी<br>सुर्यकांत अनिल जाधव<br>इब्राहिम महंमद शेख | सुर्यकांत अनिल जाधव | १०३६/२०२४<br>३०/०१/२०२४ | १,००,१२०/- | बार्शी ता. बार्शी | २९९ | ०.०१.०० | ०२/०२/२०२६ |
| ५ | अमर सुभाष कथले<br>गणेश काशिनाथ परांडकर<br>शिवलिंग मुरलीघर गाजरे | अमर सुभाष कथले<br>सोनाली गणेश परांडकर<br>रोहिणी शिवलिंग गाजरे | ८२४/२०१३<br>१६/०२/२०१३ | ४,७६,५२०/- | बार्शी बार्शी<br>बार्शी | सिसक.<br>१५५०/५३क<br>१२७०/३/१८<br>१२९९/२ | ५१० चौमी पैकी<br>१.४८.७२ बिनशेती<br>०.००.६९ चौमीपैकी | ०२/०२/२०२६ |
| ६ | संजय शिवाजी गव्हाणे<br>भोलेनाथ भगवान काळजापुरे | सुलोचना शिवाजी गव्हाणे | १०३४/२०२४<br>३०/०१/२०२४ | ७०,४७३/- | बार्शी,<br>ता. बार्शी | २९९ | ०.००.५४ | ०२/०२/२०२६ |
| ७ | सागर शिवाजी पौळ<br>पार्वती रामभाऊ गरड<br>प्रविण प्रकाश सातपुते<br>अनिल कांतीलाल तांबे<br>कलावती पांडुरंग आगलावे | पार्वती रामभाउ गरड<br>प्रकाश गेनदेव सातपुते<br>कलावती पांडुरंग आगलावे | २९२/२०२२<br>०२/०६/२०२२ | ९,८९,९६३/- | बार्शी बार्शी<br>बार्शी | २९९<br>२९९<br>२९९ | ०.०१.० पैकी<br>०.००.५०<br>०.०१.०० पैकी | ०२/०२/२०२६ |
| ८ | आकाश शिवाजी पौळ<br>कलावती पांडुरंग आगलावे<br>पार्वती रामभाऊ गरड<br>प्रविण प्रकाश सातपुते | कलावती पांडुरंग आगलावे<br>पार्वती रामभाऊ गरड<br>प्रकाश गेनदेव सातपुते | २८८/२०२२<br>०२/०६/२०२२ | ४,४९,९२८/- | बार्शी बार्शी<br>बार्शी | २९९<br>२९९<br>२९९ | ०.०१.० पैकी<br>०.०१.०० पैकी<br>०.००.५० | ०२/०२/२०२६ |
| ९ | किरीट रसिक माटे<br>अमोल शामसुंदर पल्लोड<br>गोविद यशवंत कुलकर्णी | भारती शामसुंदर पल्लोड<br>गोविद यशवंत कुलकर्णी | ८८/२०२५<br>१७/०४/२०२५ | ९६,०७१/- | बार्शी बार्शी | १३६४/२/अ/१<br>८६९ | ०.००.९८ चौमी<br>०.००.९१ चौमी | ०२/०२/२०२६ |
| १० | गणेश घोंडिबा वाघमारे<br>निवृत्ती सोपान गायकवाड<br>रूपाली तानाजी गायकवाड | निवृत्ती सोपान गायकवाड | १०३७/२०२४<br>३०/०१/२०२४ | १,१०,१२४/- | ममदापुर,<br>ता. बार्शी | ८५ | ०.९८.०० | ०२/०२/२०२६ |
| ११ | पल्लवी कुमार भालेकर<br>कुमार सौदागर भालेकर<br>काशिनाथ दत्तात्रय पवार | सौदागर शिवराम भालेकर<br>काशिनाथ दत्तात्रय पवार | ८४/२०२५<br>१७/०४/२०२५ | १२,४४,०६४/- | देकरी, ता. तुळजापुर,<br>पानगाव,<br>ता. बार्शी | १५१<br>२०६ | ०.०२.०० पैकी<br>०.२० | ०२/०२/२०२६ |
| १२ | गिरीष दत्तु बोंदर<br>सुनंदा दत्तु बोंदर<br>संतोष ज्ञानोबा लाटे | गिरीष दत्तु बोंदर<br>सुनंदा दत्तु बोंदर | १०४१/२०२४<br>३०/०१/२०२४ | ४,१२,९८८/- | बार्शी बार्शी | सि.स.क.<br>१५५०/४७अ/६ | पश्चिम बाजू<br>५०.५१ चौमी | ०२/०२/२०२६ |
| १३ | प्रशांत बबन क्षीरसागर<br>अर्चना उमेश स्वामी<br>अमर बबन क्षीरसागर | अर्चना उमेश स्वामी | १०३२/२०२४<br>३०/०१/२०२४ | ५८,०१०/- | बार्शी बार्शी | सिसक २११६<br>गट नं. ११२८ | ६९.५० चौमी पैकी<br>०.००.६३ चौमी पैकी | ०२/०२/२०२६ |
| १४ | बबन ज्ञानदेव क्षिरसागर<br>अमर बबन क्षिरसागर<br>अनिल लक्ष्मण देवकर | अनिल लक्ष्मण देवकर | १०३८/२०२४<br>३०/०१/२०२४ | १,१३,४०२/- | बार्शी | सिसक २११६ | ६९.५० चौमी पैकी | ०२/०२/२०२६ |
| १५ | भारती बबन क्षिरसागर<br>अर्चना उमेश स्वामी<br>अमर बबन क्षिरसागर | अर्चना उमेश स्वामी | १०३३/२०२४<br>३०/०१/२०२४ | ५८,६८५/- | बार्शी<br>बार्शी | सिसक २११६<br>गट नं. ११२८ | ६९.५०<br>चौमीपैकी<br>०.००.६३ चौमीपैकी | ०२/०२/२०२६ |
| १६ | कृष्णाथ उर्फ विजय दिगांबर पालके<br>प्रित्तम सुभाष जगदाळे<br>अभिजीत भारत मंडलिक | कृष्णाथ उर्फ विजय दिगांबर पालके | ८५/२०२५<br>१७/०४/२०२५ | ६८,५७१/- | बार्शी | सिसक. ५०१ | ८२.२० चौरसमिटर | ०२/०२/२०२६ |
| १७ | प्रेमा देविदास माने<br>राहुल रामलिंग गुजर<br>देविदास अर्जुन माने | राहुल रामलिंग गुजर | १२/२०१५<br>१०/०६/२०१५ | १,५८,२७३/- | खांडवी, ता.<br>बार्शी | ८८/२ | ०.०६.०० | ०२/०२/२०२६ |
| १८ | गणेश भगवान मोरे<br>विशाल रमेश मोरे<br>गिरीष अर्जुन माने | विशाल रमेश मोरे<br>गिरीष अर्जुन माने | २९१/२०२२<br>०२/०६/२०२२ | १३,८३,३१०/- | बार्शी<br>बार्शी<br>बार्शी | ९८३/२/अ<br>९८३/२/अ<br>७२५/पैकी | ०/१८ पैकी<br>०/०५<br>५.११.०० | ०२/०२/२०२६ |
| १९ | सुरेश शिवाजी हिंगसे<br>रशिद रमजान कुरेशी<br>राजेश हरिश्चंद्र इटकर | राजेश हरिश्चंद्र इटकर | ५७६/२०१७<br>१६/११/२०१७ | १,४१७३६/- | बार्शी | १२९६/१/अ/६ | ०.००.९२ | ०२/०२/२०२६ |
| २० | तानाजी आण्णा चौधरी<br>सुनंदा राजेंद्र दळवी<br>इंद्रजीत विकम कदम | आण्णा बाबु चौघरी | १४४६/२०<br>१८/०३/२०२० | ६९,३९२/- | खांडवी,<br>ता.बार्शी | सि.स.कमांक<br>६५४ | ६०.५० चौमी | ०२/०२/२०२६ |
| २१ | सुनिल राजेंद्र झोंबाडे<br>बाळकृष्ण शिवाजी जगताप<br>महेंद्र राजेंद्र सरवदे | बाळकृष्ण शिवाजी जगताप | ४२९/२०१७<br>११/१०/२०१७ | २,९५,९३४/- | जामगाव,<br>आ.ता.बार्शी | ३३६/१/५० | १५९.१७<br>चौरसमिटर | ०२/०२/२०२६ |

ही ताबा नोटीस दिली असे.

(शिक्का)

**सही/-**
**श्री. गोपीचंद अरूण तुकशेट्टी**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**यशवंत नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बार्शी ता. बार्शी**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### अनाहत सिंग अंतिम फेरीत



**वॉशिंग्टन** : भारताची किशोरवयीन स्टार अनाहत सिंगने वॉशिंग्टनमधील स्क्वॅश ऑन फायर ओपन स्पर्धेत अमेरिकेच्या सबरीना सोभीवर ३-१ असा विजय मिळवून पीएसए ब्रॉन्झ-स्तरीय स्पर्धेची आपली पहिली अंतिम फेरी गाठली आहे. जागतिक क्रमवारीत ३१व्या क्रमांकावर असलेल्या या भारतीय खेळाडूने उपांत्य फेरीत जागतिक क्रमवारीत २३व्या क्रमांकावर असलेल्या अमेरिकन खेळाडूला ११-९, ११-३, ९-११, ११-५ असे पराभूत करून धक्का दिला. आता ती विजेतेपदासाठी अव्वल मानांकित व जागतिक क्रमवारीत १०व्या क्रमांकावर असलेल्या इंग्लंडच्या जॉर्जिया केनेडीशी खेळेल. नवी दिल्लीी ही खेळाडू या स्पर्धेत सातवी मानांकित आहे. यापूर्वी, अनाहतने २-० अशा पिछाडीवरून मुसंडी मारत दुसरी मानांकित साना इब्राहिमला हरवले आणि शनिवारी स्क्वॉश ऑन फायर ओपन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला होता. जागतिक क्रमवारीत ३१व्या क्रमांकावर असलेल्या आणि सातव्या मानांकित भारतीय खेळाडूने सामन्यात जोरदार पुनरागमन केले, तिसऱ्या आणि चौथ्या दोन्ही गेममध्ये ६-५ अशी पिछाडी भरून काढली.

### हितेश, सचिन, लवलिना भारतीय मुष्टियुद्ध संघात

**नवी दिल्ली** : जागतिक मुष्टियुद्ध चषक फायनल्सचे विजेते हितेश गुलिया आणि सचिन सिवाच, यांच्यासोबत ऑलिम्पिक पदक विजेती लव्हलिना बोर्गोहेन, स्पेनमधील ला नुसिया, अलिकान्ते येथे होणाऱ्या बॉक्सम एलिट आंतरराष्ट्रीय २०२६ स्पर्धेत भारताच्या ३३ सदस्यीय पुरुष आणि महिला संघांचे नेतृत्व करतील. ही स्पर्धा या वर्षातील भारताची पहिली मोठी परदेशी मुष्टियुद्ध स्पर्धा आहे आणि २०२६ च्या उत्तरार्धात होणाऱ्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा आणि आशियाई क्रीडा स्पर्धांच्या तयारीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावेल. भारतीय मुष्टियुद्ध महासंघाने रविवारी जाहीर केलेला हा संघ, नुकत्याच झालेल्या ९व्या एलिट पुरुष आणि महिला राष्ट्रीय मुष्टियुद्ध स्पर्धेतील कामगिरीच्या आधारावर निवडण्यात आला आहे. पुरुषः ऋषी सिंग, जादुमणी सिंग, पवन बर्तवाल, मोहम्मद हुसामुद्दीन, सचिन सिवाच, आदित्य प्रताप यादव, अविनाश जामवाल, हितेश गुलिया, दीपक, आकाश, अंकुश, मालसावमतलुआंगा, जुगनू अहलावत, हर्ष चौधरी, नमन तन्वर. महिलाः मंजू राणी, नीतू, कुसुम, प्रीती, पूनम, प्राची, विंका, प्रिया, दिशा विजय पाटील, प्रांजल यादव, काजल, अरुंधती चौधरी, स्नेहा, लवलिना बोर्गोहेन, सनमाचा चानू, नैना व मनकीरत कौर.

### सचिन तेंडुलकरने केले अल्काराझचे अभिनंदन

**नवी दिल्ली** : भारताचा माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरने ऑस्ट्रेलियन ओपन २०२६ चा विजेता कार्लोस अल्काराझच्या 'संयम आणि शांत स्वभावाचे' कौतुक केले. अल्काराझने नोव्हाक जोकोविचला २-६, ६-२, ६-३, ७-५ असे हरवून हंगामातील पहिल्या ग्रॅण्ड स्लॅम स्पर्धेत आपले पहिले विजेतेपद पटकावले. अल्काराझने रविवारी टेनिसमध्ये इतिहास रचला, त्याने आपले पहिले ऑस्ट्रेलियन ओपन पुरुष एकेरीचे विजेतेपद जिंकले. 'ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये कार्लोस अल्काराझचा संयम लक्षवेधी होता. लांब रॅलींमध्ये तो शांत राहिला, प्रतिस्पर्ध्यावर दबाव कायम ठेवला आणि योग्य क्षणी हुशारीने निर्णय घेतले. आणि त्याने ज्या प्रकारे कोर्ट कव्हर केले, इतक्या जलद आणि अचूकपणे, ते पाहणे आनंददायक होते! अभिनंदन ! असे सचिन तेंडुलकरने सोशल मीडियावर पोस्ट केले. ११ ऑस्ट्रेलियन ओपन फायनलमध्ये जोकोविचला पहिला पराभव पत्करण्यास भाग पाडून, २२ वर्षीय अल्काराझ ओपन युगामध्ये करिअर ग्रॅण्ड स्लॅम पूर्ण करणारा सर्वात तरुण खेळाडू बनला. करिअर ग्रॅण्ड स्लॅम म्हणजे चारही प्रमुख स्पर्धांमध्ये विजेतेपद पटकावणे.

### ओंकार गायकवाडला दोन रौप्य पदके

**सोलापूर, दि. १ फेब्रुवारी-**
सोलापूर ग्रामीण पोलीस दलातील लिपिक ओंकार हरिदास गायकवाड यांनी युनायटेड नॅशनल गेम्स २०२६ मध्ये दोन रौप्य पदके पटकाविली. नाशिक येथे झालेल्या या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत ३० ते ३५ वर्षे या वयोगटात १०० मीटर व ५० मीटर बॅकस्ट्रोक या प्रकारात ही कामगिरी केली. त्यांचे सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, पोलीस उपअधीक्षक शिरीष हुंबे, कार्यालय अधीक्षक बाबासाहेब धर्मे यांनी अभिनंदन केले



# क्रीडा क्षेत्राला ५०० कोटी रुपयांचे प्रोत्साहन

## खेलो इंडियासाठी भरीव तरतूद कायम




**◆ नवी दिल्ली, १ फेब्रुवारी**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी रविवारी सादर केलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाच्या तरतुदीत १००० कोटी रुपयांहून अधिक वाढ करण्यात आल्याने, क्रीडा साहित्य उत्पादन क्षेत्र प्रथमच ५०० कोटी रुपयांची तरतूद मिळवून एक प्रमुख लाभार्थी ठरले आहे.

क्रीडा मंत्रालयासाठी एकूण अर्थसंकल्पीय तरतूद ४४७९.८८ कोटी रुपये होती, जी २०२५-२६ च्या ३३४६.५४ कोटी रुपयांच्या सुधारित तरतुदीपेक्षा ११३३.३४ कोटी रुपयांनी अधिक आहे.

राष्ट्रीय शिबिरे आयोजित करणारी आणि खेळाडूंच्या प्रशिक्षणासाठी लॉजिस्टिक व्यवस्था पाहणारी नोडल संस्था असलेल्या भारतीय क्रीडा प्राधिकरणाची (साई) तरतूद ८८० कोटी रुपयांवरून ९१७.३८ कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आली.

देशभरातील स्टेडियमची देखभाल आणि वापर करण्याची जबाबदारीही साईवर आहे.

तथापि, राष्ट्रीय डोप चाचणी प्रयोगशाळा (नाडा) आणि राष्ट्रीय उत्तेजक-विरोधी संस्थेचे बजेट अनुक्रमे २०२५-२६ मधील २८.५५ कोटी रुपयांवरून २३ कोटी रुपयांपर्यंत आणि २४.३० कोटी रुपयांवरून २०.३० कोटी रुपयांपर्यंत कमी करण्यात आले.

सीतारामन् यांनी उच्च दर्जाच्या आणि परवडणाऱ्या क्रीडा साहित्यासाठी भारत जागतिक केंद्र म्हणून उदयास येण्याच्या क्षमतेवर भर दिला. त्यामुळे पदभार स्वीकारल्यापासून क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी घेतलेल्या भूमिकेला दुजोरा मिळाला.

मी क्रीडा साहित्यासाठी एक समर्पित उपक्रम प्रस्तावित करते. उपकरण डिझाइन तसेच साहित्य विज्ञानातील उत्पादन, संशोधन आणि नाविन्याला चालना देईल, असे सीतारामन् म्हणाल्या.

क्रीडा साहित्य स्टार्ट-अप्सना चालना मागील अर्थसंकल्पांमध्ये क्रीडा साहित्य क्षेत्राशी संबंधित कोणतीही तरतूद नव्हती. क्रीडा मंत्रालयाने या तरतुदीचे स्वागत केले असून, उद्योगाला पाठिंबा देण्यासाठी सविस्तर योजना तयार केली जाईल, असे म्हटले आहे. या उपक्रमामुळे मेक इन इंडिया योजनेअंतर्गत देशातील क्रीडा साहित्य उत्पादन करणाऱ्या स्टार्ट-अप्सना चालना मिळण्याची शक्यता आहे.



### खेलो इंडिया मिशन

सीतारामन यांनी पुढील दशकात प्रशिक्षण केंद्रे व प्रशिक्षकांच्या पद्धतशीर विकासावर लक्ष केंद्रित करण्यासाठी खेलो इंडिया मिशन सुरू करण्याचा प्रस्ताव मांडला. हे मिशन आंतर-जोडणी मार्गांद्वारे एकात्मिक प्रतिभा विकास कार्यक्रमाला सुलभ करेल, असे त्या म्हणाल्या. खेलो इंडिया कार्यक्रम २०१७ मध्ये सुरू करण्यात आला होता आणि त्याचा प्राथमिक उद्देश प्रतिभा ओळखण्यासाठी विविध वयोगटांमध्ये राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा आयोजित करणे हा होता.


### खेलो इंडियासाठी ९२४.३५ कोटींची तरतूद

सरकारच्या महत्त्वाकांक्षी खेलो इंडिया कार्यक्रमाला ९२४.३५ कोटी रुपयांची तरतूद मिळाली आहे. गत वर्षी यासाठी १००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती, परंतु अंतिम खर्च ७०० कोटी रुपये झाला होता. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांसाठीची मदत या वर्षी २८.०५ कोटी रुपयांवरून ५० कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. गत वर्षीच्या तुलनेत ७८ टक्के वाढ आहे. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा या वर्षी जुलै-ऑगस्टमध्ये ग्लासगो येथे होणार आहेत.

### इतर क्षेत्रांतील तरतुदी

राष्ट्रीय क्रीडा विद्यापीठासाठीची अर्थसंकल्पीय तरतूद देखील ७८.६४ कोटी रुपयांवरून ४६.९८ कोटी रुपयांपर्यंत कमी करण्यात आली.

१९९८ मध्ये स्थापन झालेल्या राष्ट्रीय क्रीडा विकास निधीसाठीचे योगदान ३ कोटी रुपयांवरून ५ कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आले, तर सरकारने या वर्षी खेळाडूंना मिळणारे प्रोत्साहन २८ कोटी रुपयांवरून ४० कोटी रुपयांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. ◂(वृत्तसंस्था)




### राष्ट्रीय क्रीडा महासंघांसाठी किंचित वाढ

राष्ट्रीय क्रीडा महासंघांना मिळणारी मदतही ४०० कोटी रुपयांवरून ४२५ कोटी रुपयांपर्यंत किंचित वाढवण्यात आली आहे.

### युवक व्यवहार मंत्रालयासाठीच्या तरतुदी

राष्ट्रीय युवा व किशोरवयीन विकास कार्यक्रमासाठीचा निधी या वर्षी ५७.६८ कोटी रुपयांवरून ५८.४१ कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आला आहे. राष्ट्रीय सेवा योजनेलाही मोठी वाढ देण्यात आली आहे. गत वर्षाच्या २७५.०० कोटी रुपयांवरून ३५७.३९ कोटी रुपये मिळतील. राष्ट्रीय सेवा योजना सामाजिक कार्य आणि सामुदायिक सेवेद्वारे तरुणांना घडवण्याचे कार्य करते.

पाकिस्तान टी-२० विश्वचषकात

# भारताविरुद्ध खेळणार नाही

## पाकिस्तान सरकारचा निर्णय

**◆ नवी दिल्ली, १ फेब्रुवारी**

पाकिस्तान सरकारने २०२६ च्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषकात सहभागी होण्यासाठी पाकिस्तान क्रिकेट संघाला मान्यता दिली आहे. तथापि, सरकारने या मंजुरीसोबत एक महत्त्वाची अट देखील घातली आहे. सरकारी आदेशानुसार, १५ फेब्रुवारी रोजी भारताविरुद्ध होणाऱ्या सामन्यात पाकिस्तान क्रिकेट संघ सहभागी होणार नाही. याचा अर्थ असा की पाकिस्तान स्पर्धेत सहभागी होईल, परंतु बहुप्रतिक्षित भारत-पाकिस्तान सामन्यापासून स्वतःला दूर ठेवेल.

पाकिस्तान सरकारच्या अधिकृत एक्स हॅण्डलवरून एका ट्विटद्वारे याची घोषणा करण्यात आली. पाकिस्तानच्या इस्लामिक रिपब्लिकचे सरकार आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये सहभागी होण्यासाठी पाकिस्तान क्रिकेट संघाला मान्यता देते, तथापि, पाकिस्तान क्रिकेट संघ १५ फेब्रुवारी २०२६ रोजी भारताविरुद्ध नियोजित सामना खेळणार नाही, असे या ट्विटमध्ये म्हटले आहे.

हे पाऊल आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेला (आयसीसी) आर्थिक नुकसान पोहोचवण्याच्या रणनीतीचा एक भाग आहे, असे मानले जात आहे.

आयसीसी दुटप्पी भूमिका वठवित आहे. ही संघटना बीसीसीआयच्या प्रभावाखाली काम करत आहे, असा आरोप पाकिस्तान क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांनी पत्रकार परिषदेत केला.

पाकिस्तानने अद्याप आयसीसीला कळवलेले नाही, अशी माहिती एका सूत्राने दिली. या प्रकरणाबाबत आयसीसीला अद्याप पाकिस्तान क्रिकेट मंडळाकडून (पीसीबी) कोणताही लेखी संदेश मिळालेला नाही. पीसीबीने आयसीसीला अधिकृतपणे कळवल्यानंतरच आयसीसी कोणत्याही कारवाई किंवा निर्बंधांचा निर्णय घेईल. ◂(वृत्तसंस्था)

# भारतीय युवकांचा पाकिस्तानवर विजय

**बुलावायो, १ फेब्रुवारी -**

येथे सुरु असलेल्या आयसीसी १९ वर्षांखालील विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत रविवारी सुपर सिक्स फेरीच्या सामन्यात भारताने पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तावर ५८ धावांनी विजय नोंदविला. २९ चेंडूंत ३५ धावा काढणारा व ३० धावांत एक बळी टिपणारा कनिष्क चौहान सामनावीर ठरला. भारताला आता बुधवार, ४ फेब्रुवारी रोजी अफगाणिस्तानविरुद्ध अखेरचा सुपर सिक्स सामना खेळावयाचा आहे. भारतीय युवा संघाने प्रथम फलंदाजी करत ४९.५ षटकांत सर्वबाद २५२ धावा केल्या. प्रत्युत्तर देताना पाकिस्तानचा संपूर्ण संघ ४६.२ षटकांत १९४ धावांत गारद झाला. ॲरोन जॉर्ज (१९) व वैभव सूर्यवंशीने (३०) पहिल्या गड्यासाठी ४७ धावाची सलामी भागीदारी करत भारताच्या डावाची चांगली सुरुवात केली, मात्र याच धावसंख्येवर वैभवसह आयुष म्हात्रे (0) व ॲरोन जॉर्ज (१६) हे तीन मोहरे बाद झालेत. मात्र पुढे वेदांत त्रिवेदीने विहान मल्होत्रा(२१), अभिज्ञान कुंडू (१६) मदतीने भारतचा डाव सावरला. वेदांतने ९९ चेंडूंत २ चौकार व एका षट्काराच्या मदतीने ६८ धावांची खेळी केली. मोमीन कमरने वेदांतला बाद केले, तेव्हा भारताची ४0.२ षटकांत ६ बाद १८२ अशी स्थिती होती. पुढे आर. कनिष्क चौहान सामनावीर एस. अंबरीश ( २९), कनिष्क चौहान (३५) व खिलान पटेलने (२१) भरीव योगदान देत भारताच्या धावसंख्येला आकार दिला. भारताचा डाव ४९.५ षटकांत २५२ धावांवर आटोपला. विजयासाठी धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानच्या पहिल्या फळीतील फलंदाजांनी चांगले प्रदर्शन केले, परंतु त्यानंतर त्यांच्या संघाची त्रेधातिरपीट उडाली. सलामीवीर हामझा झहुर (४२), उस्मान खान (६६) व कर्णधार फरहान युसूफने(३८) संघाची धावसंख्या वाढविण्याचा प्रयत्न केला, परंतु मधली व तळाची फळी भारतीय गोलंदाजांच्या प्रभावी माऱ्यापुढे टिकाव धरू शकली नाही. भारताकडून खिलान पटेल व आयुष म्हात्रेने प्रत्येकी ३ बळी, तर आर. एस. अंबरीश, हेनिल पटेल, कनिष्क चौहान व विहान मल्होत्राने प्रत्येकी एक बळी टिपला.


सामनावीर कनिष्क चौहान

# महाराष्ट्राची दणदणीत सलामी

## ३५वी किशोर-किशोरी राष्ट्रीय खो-खो स्पर्धा : आंध्रप्रदेश व पाँडेचेरीवर विजय

**तभा वृत्तसेवा,**
**हरियाणा, दि. १ फेब्रुवारी-**

कुरुक्षेत्र (हरियाणा) येथील थीम पार्क मैदानावर सुरु झालेल्या ३५ व्या किशोर-किशोरी (सब ज्युनिअर) राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या दोन्ही संघांनी विजयी सलामी देत आपली ताकद ठसठशीतपणे दाखवून दिली. वेग, चपळाई, अचूक डावपेच आणि भक्कम संरक्षणाच्या जोरावर महाराष्ट्राने साखळी सामन्यांत प्रतिस्पर्ध्यांना नामोहरम करत स्पर्धेत आपली विजयाची दावेदारी निर्माण केली.



किशोरी गटातील एका सामन्यात महाराष्ट्राने सुरुवातीपासूनच सामना आपल्या बाजूने झुकवला. महाराष्ट्राने आंध्रप्रदेशवर एक डाव ३४ गुणांनी ४२८ असा दणदणीत विजय मिळवला. महाराष्ट्राकडून पियुषा पानमाळकर (३.१0 मि. संरक्षण), अपर्णा वर्दे (२.५0 मि. संरक्षण व २ गुण), ऋतुजा सुरवसे (२.५0 मि. संरक्षण व ८ गुण), वेदिका तामखडे (२.३0 मि. संरक्षण व २ गुण) यांनी प्रभावी कामगिरी करत विजय साकारला. आंध्रप्रदेशकडून एस. मीना हिने एकाकी प्रतिकार केला.

किशोर गटातील सामन्यात महाराष्ट्राने पाँडेचेरीवर २१ गुणांनी ३५१४ असा स्पष्ट विजय मिळवला. महाराष्ट्राकडून विक्रम सिंग राठोड (नाबाद २.२0 मि. संरक्षण व २ गुण), वेदांत गायकवाड (१२ गुण), कर्तव्य गाडेकर (२.१0 मि. संरक्षण) यांनी दमदार कामगिरी नोंदवत संघाला विजय मिळवून दिला. पाँडेचेरीकडून आर. विश्वनाथ (१ मि. संरक्षण), एम. दिबिनेश (१ मि. संरक्षण) यांनी प्रयत्न केले.

# बडोदा फुल मॅरेथॉनमध्ये सोलापूरचे अतिश शहा तृतीय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ फेब्रुवारी-**

गुजरात येथे रविवारी झालेल्या बडोदा फुल मॅरेथॉनमध्ये अतिश शहा यांनी तृतीय स्थान संपादले.

त्यांनी ४२.१९५ किमी अंतर ३ तास ३८ मिनिटांत यशस्वीपणे पूर्ण करून ४0 ते ५0 वयोगटात ही कामगिरी केली. याआधी त्यांनी २१ आणि १0 किमी स्पर्धांमध्येही कामगिरी केली असून आता पूर्ण मॅरेथॉनमध्येही त्यांनी यशस्वी कामगिरी करून आपला ठसा उमटवला आहे.

'चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन'च्या माध्यमातून ते दरवर्षी सोलापूर येथे 'आझादी अल्ट्रा मॅरेथॉन'चे आयोजन करतात. तसेच गरजू धावपटूंना कोचिंग देऊन प्रोत्साहनही देतात.

**अनुभव व योग्य प्रशिक्षणामुळे ही कामगिरी शक्य**

त्यांच्या या यशाबद्दल सर्व क्रीडा व रनिंग प्रेमींकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अनुभव, योग्य प्रशिक्षण आणि रेसदरम्यानचे प्रभावी हायड्रेशन यामुळे ही कामगिरी शक्य झाल्याचे अतिश शहा यानी सांगितले.




# महाराष्ट्राचा पाँडेचेरीवर एक डाव १३ धावांनी दणदणीत विजय

## सलग दुसरा सामना जिंकला तिसऱ्याच दिवशी, अभिषेक निषदचे ७ बळी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ फेब्रुवारी-**

इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर गेल्या २ दिवसापासून चालू असलेल्या कर्नल सी के नायुडू चषकातील पाचव्या फेरीचा सामना गेल्या सामन्याप्रमाणे महाराष्ट्राने तिसऱ्याच दिवशी एका डाव व १३ धावाने जिंकला.

तिसऱ्याच दिवशी सामना जिंकण्याचे श्रेय जाते ते फिरकी गोलंदाज अभिषेक निषद याला, त्याने घेतलेल्या ७ बळी मुळे. तिसऱ्या दिवशी सकाळी महाराष्ट्राच्या कालच्या नाबाद जोडीने खेळ पुढे सुरू केला आणि केवळ अर्धा तासात महाराष्ट्राचा पहिला डाव ३५४ धावांवर संपला.

९व्या गड्यासाठी वैभव दारकुंडे याने अजय बोरुडे सोबत ६६ धावांची भागीदारी रचली, पण वैयक्तिक १७ धावांवर तो नितीन प्रणव चे गोलंदाजी वर प्रवीण कडे झेल देऊन बाद झाला आणि त्याच्या पुढच्याच १0२व्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर ३५४ धावा झाल्या असताना शिशिर एच.आर. ने अजयला ७५ धावांवर (१३६ चेंडू, ८ चौकार १ षटकार) त्रिफळा बाद करत महाराष्ट्राचा डाव संपवला. अभिषेक निषद शून्यावर नाबाद राहिला व १७४ धावांची आघाडी मिळाली. पाँडिचेरी कडून नमन शर्मा ११४/५ बळी, नितीन प्रणव व शिशिर एच आर यांनी प्रत्येकी २ तर आकाश पुगाझाणथीने १ बळी टिपला.

१0 मिनिटाच्या अंतरानंतर पाँडिचेरीचा दुसरा डाव सुरू झाला. ३७ धावांची सलामी दिल्यावर निषद ने प्रवीण (२३)चे रूपात पहिला बळी मिळवला. त्याचे पाठोपाठ १ धावे नंतर दुसरा सलामीवीर अनिश विशागन (११) याला देखील निषद ने पायचीत बाद केले, आणि पुढच्याच चेंडूवर कार्थीराजा धावबाद झाला. त्यानंतर आलेल्या साई हरीराम व पृथ्वी खन्ना यांनी थोडाफार प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, ३१ धावा जोडल्या पण, निषद ने त्याला देखील १९ धावावर आणि १६ धावांच्या फरकाने साई (१६) ला शुभम मेड ने त्रिफळाचित केले. त्यानंतर आलेल्या नितीन प्रणव (८) ला निषदने पायचीत बाद करत पाठोपाठ झटके दिले. त्यानंतर पहिल्या डावातील अर्धशतकवीर आकाश पुगाझाणथी व समर खान या जोडीने जेवणाला खेळ थांबेपर्यंत धावसंख्या ६ बाद ११३ (२५ षटके) पर्यंत नेली तेव्हा डावाचा पराभव टाळण्यासाठी पाँडिचेरीला ६१ धावांची गरज होती आणि हातात गडी शिल्लक होते फक्त ४, व त्यावेळीच सामन्याचा निकाल तिसऱ्याच दिवशी दुसऱ्या सत्रात लागणार हे नक्की झालेले.



दुसऱ्या सत्रात ७व्या विकेट साठी ३३ धावा जोडल्या असताना अभिषेक निषद याने वैभव दारकुंडे करवी आकाश पुगाझाणथी याला झेलबाद करत ५ वा बळी टिपला. यानंतर समर खान याने एक बाजू लावून धरत नमन शर्मा सोबत ३0 धावा जोडल्या पण शर्मा (६) ला सचिन धस कडे झेल देण्यास भाग पाडत जोडी फोडली. त्यानंतर आलेल्या शिशिर याला एका धावेवर पायचीत करत अभिषेक निषद ने ७ बळी मिळवण्याची किमया केले. पुढच्याच षटकात शुभम मेड याने एका बाजूने फटकेबाजी करत चांगली फलंदाजी करणाऱ्या समर खान (४0 धावा, ५९ चेंडू, ३ चौकार, १ षटकार) याला दिग्विजय पाटील द्वारे झेलबाद करत ३९ व्या षटकात १६१ धावांवर पाँडिचेरीचा दुसरा डाव गुंडाळला आणि एक डाव, १३ धावांनी दणदणीत विजय मिळवून दिला.

### ५९ गुणांसह महाराष्ट्राची आघाडी

महाराष्ट्राने १५ गुण प्राप्त करत गटात ५९ गुणांसह आघाडीचे स्थान मिळवले आहे आता महाराष्ट्राचे ५ सामन्यात विजय, २ अनिर्णित मुळे क गटात सर्वाधिक ५९ गुण झाले आहेत व पुढील सामना विजयवाडा येथे आंध्रप्रदेश सोबत ६ फेब्रुवारी पासून होणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## केंद्रीय अर्थसंकल्प

# विकसित भारताचे स्वप्न... सर्वसामान्यांचा अपेक्षाभंग... नवा आयकर कायदा लागू...



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ फेब्रुवारी-**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी रविवार, १ फेब्रुवारी २०२६ रोजी संसदेत सन २०२६-२७ या सालचा भारताचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पबाबत दैनिक सोलापूर तरुण भारतने सोलापुरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता, यंदाचा अर्थसंकल्प हा विकसित भारताचे स्वप्न साकार करणारा आहे. सर्वसामान्यांचा अपेक्षाभंग करणारा अर्थसंकल्प आहे. नवा आयकर कायदा लागू होणार असल्याचे या अर्थसंकल्पाद्वारे स्पष्ट झाले, अशा संमिश्र प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या. त्या-त्या क्षेत्रातील मान्यवरांनी व्यक्त केलेल्या प्रतिक्रिया त्यांच्याच शब्दात...

### विकसित भारताचे स्वप्न साकारणार



आजच्या अर्थसंकल्पामुळे देशाच्या सर्व क्षेत्रात सुधारणा होतील, विशेषतः मध्यमवर्ग, शेतकरी, युवक आणि उद्योग क्षेत्रासाठी महत्त्वाची घोषणा करण्यात आली आहे. चालू आर्थिक धोरणे आणि गुंतवणूक वाढविण्याच्या उपाययोजनांमुळे देशाची आर्थिक प्रगती जलद होईल आणि रोजगारसंधी वाढणार आहेत. हा अर्थसंकल्प २१ व्या शतकातील एक महत्वाचा आणि सर्वसमावेशक अर्थसंकल्प आहे. विद्यार्थिनींसाठी वसतीगृह बांधण्याच्या निर्णयामुळे विद्यार्थिनींच्या शैक्षणिक प्रवासास चालना देणारा निर्णय ठरणार आहे. केंद्र सरकार वस्त्रोद्योगाच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याचा प्रत्यय या अर्थसंकल्पातून येत आहे. या अर्थसंकल्पामुळे सोलापुरातील हँडलूम, खादी, हातमाग व्यवसायाला दिलासा मिळाला आहे. सुक्ष्म व लघु उद्योग व टेक्सटाइल, गारमेंट उद्योग या उद्योगात नवीन आधुनिक करण होण्यासाठी प्रोत्साहन योजना घोषित करण्यात आले. शेती, सिंचन, युवा साठी शिक्षणासोबतच रोजगार निर्मिती, महिला, आरोग्य, आयुर्वेदिक उपचार, सोलर, सीएनजी, कामगारांना घरकुल योजना, छोटे २३ टायर शहरांसाठी मोठा निधी आदींची तरतूद, करण्यात आली आहे. यामुळे विकसित भारताचे स्वप्न साकारणार आहे.

**- सुभाष देशमुख, आमदार, दक्षिण सोलापूर**

### हायस्पीड रेल्वे कॉरिडोरमुळे सोलापूरच्या विकासालाही मिळणार गती



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला हा अर्थसंकल्प सर्वार्थाने विकासाभिमुख आहे. या अर्थसंकल्पामध्ये अंतर्भूत केलेला मुंबई - पुणे आणि पुणे - हैदराबाद या हायस्पीड रेल्वे कॉरिडॉरमुळे सोलापूरच्या विकासालाही मोठी गती मिळणार आहे. सोलापुरात आयटी पार्कची उभारणी होत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारने सोलापूरला दिलेला हा बूस्टर डोस सोलापूरच्या प्रगतीत सिंहाचा वाटा उचलणार आहे. विद्यार्थिनींसाठी वसतीगृह बांधण्याच्या निर्णयामुळे विद्यार्थिनींच्या शैक्षणिक प्रवासास चालना देणारा निर्णय ठरणार आहे. केंद्र सरकार वस्त्रोद्योगाच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याचा प्रत्यय या अर्थसंकल्पातून येत आहे. या अर्थसंकल्पामुळे हँडलूम, खादी, हातमाग व्यवसायाला दिलासा मिळाला आहे. परदेशात शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना करात सवलत जाहीर झाल्यामुळे उच्च शिक्षण घेण्यास केंद्र सरकार चालना देत असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. कोणतीही करवाढ नसलेला हा अर्थसंकल्प सर्वसामान्यांना दिलासा देणारा अर्थसंकल्प आहे. एकूणच विकसित भारताची पायाभरणी करणारा हा अर्थसंकल्प आहे.

**- देवेंद्र कोठे, आमदार, शहर मध्य**

### सर्वसामान्याच्या अपेक्षाभंग करणारा अर्थसंकल्प



आज केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामान यांनी सादर केलेल्या केंद्रीय अर्थसंकल्प हा सर्व सामन्याच्या अपेक्षा भंग करणारा आहे. वाढ़ती माहागाई वर कोणतेही नियंत्रण नाही, शेतकऱ्यांसाठी कोणतेही विशेष तरतूद नाही या अर्थसंकल्पातून सर्व सामान्य करदात्यांना सवलत देणे अपेक्षित होते ते हो झाले नाही तसेच महाराष्ट्राच्या वाट्याला विशेष अशी काही तरतूद करण्यात आली नाही एकदंरीतच सर्वच पातळ्यावर हा अर्थसंकल्प सर्वांच्या अपक्षा भंग करणारा ठरला आहे

**- काकासाहेब कुलकर्णी, प्रदेश प्रवक्ता, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी**

### आर्थिक वाढ, संरचनात्मक परिवर्तनासाठी ठोस आराखडा



केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ हा सातत्यपूर्ण आर्थिक वाढ आणि संरचनात्मक परिवर्तनासाठीचा एक ठोस आराखडा आहे. वित्तीय शिस्त राखत उद्योग, नवोपक्रम आणि तंत्रज्ञान क्षेत्राला लक्षित पाठबळ देण्याचा समतोल या अर्थसंकल्पात दिसून येतो. त्याचे परिणाम कालांतराने स्पष्ट होतील; मात्र पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञान यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांत सरकारने स्पष्टपणे महत्त्वाकांक्षी उद्दिष्टे निश्चित केली आहेत. वेतनधारक, उद्योजक, महिलांसाठी हा अर्थसंकल्प स्थैर्य आणि दिशादर्शक ठरतो. तथापि, अधिक लक्षित आणि ठोस सवलती जाहीर झाल्या असत्या तर तात्काळ आर्थिक लाभ अधिक प्रभावीपणे जाणवले असते. आज जाहीर करण्यात आलेला हा अर्थसंकल्प अपेक्षांची पूर्तता करणारा ठरलेला नाही आणि समाधानकारकही नाही.

**-आरती चंद्रशेखर बेत**

### शेतकरी, कष्टकरी, युवकांच्या प्रश्नांवर अर्थसंकल्प अपुरा ठरला



शेतकरी, युवक आणि ग्रामीण भारताच्या अपेक्षांना पूर्णतः न्याय दिला गेलेला नाही. महागाई, बेरोजगारी आणि शेतीतील वाढता खर्च या ज्वलंत प्रश्नांवर ठोस उपाययोजना अर्थसंकल्पात दिसून येत नाहीत.शेतकऱ्यांसाठी किमान आधारभूत किंमतला कायदेशीर हमी देण्याबाबत पुन्हा एकदा टाळाटाळ करण्यात आली आहे. सिंचनासाठी राज्यनिहाय, विशेषतः महाराष्ट्रासाठी, स्वतंत्र व ठोस निधीची घोषणा न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. खत, बियाणे, वीज व इंधनाच्या वाढत्या खर्चाच्या तुलनेत थेट आर्थिक मदत अपुरी आहे. युवकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती करणाऱ्या ठोस योजना अर्थसंकल्पात दिसत नाहीत. कौशल्य विकासाच्या नावाखाली प्रशिक्षण दिले जात आहे. मात्र त्या प्रशिक्षणानंतर नोकरीची हमी नाही. शिक्षण पूर्ण करुन बाहेर पडणाऱ्या तरुणांच्या हाताला काम देण्याचे ठोस धोरण सरकारकडे नसल्याचे पुन्हा स्पष्ट झाले आहे. हा अर्थसंकल्प मोठ्या उद्योगपतींसाठी बनवलेला आहे. शेतकरी, कष्टकरी, युवकांच्या प्रश्नांवर अर्थसंकल्प अपुरा ठरलेला आहे.

**- खासदार धैर्यशील मोहिते-पाटील.**

### ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्थेकडे नेणारा, विकसित भवितव्याचा दूरदर्शी आराखडा



केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ हा केवळ आकडेवारीचा दस्तऐवज नसून भारताच्या विकसित भवितव्याचा दूरदर्शी आराखडा होय. सार्वजनिक गुंतवणुकीवर दिलेला विशेष भर, उच्च आर्थिक वाढीचा ध्यास आणि संरचनात्मक सुधारांची गती यामुळे राष्ट्राच्या प्रगतीला नवे आयाम लाभतील. शिक्षण क्षेत्रात लॉजिस्टिक कॉरिडोर जवळ व औद्योगिक मार्गिकांभोवती 'विद्यापीठ टाउनशिप' उभारण्याची संकल्पना ही ज्ञान आणि उद्योग यांच्यातील सजीव सेतू निर्माण करणारी ठरेल. युवकशक्तीला केंद्रस्थानी ठेवणारे हे बजेट कौशल्य, स्पर्धात्मकता, उत्पादन क्षमता आणि रोजगारक्षमतेचा संगम साधते. विशेषतः डढएच् शिक्षणातील पायाभूत सुविधा आणि विद्यार्थिनींसाठी वसतिगृहांचा विचार सामाजिक समावेशकतेचा आदर्श दाखवतो. परिणामी, हा अर्थसंकल्प ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्थेकडे नेणारा भारताला निर्णायक टप्पा ठरेल.

**- प्रा.डॉ.नरेंद्र काटीकर**
**राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य,**
**इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन, नवी दिल्ली**

### दूरदृष्टी असलेला अर्थसंकल्प



या अर्थसंकल्पामध्ये अंतर्भूत केलेला मुंबई-पुणे आणि पुणे-हैदराबाद या हायस्पीड रेल्वे कॉरिडॉरमुळे सोलापूरच्या विकासालाही मोठी चालना मिळणार आहे. रस्ते विकास झाल्याने वेळ आणि पैसा बचत होईल. आर्थिक क्षेत्राचा विकास करायचा असल्याने आयटी पार्क व इतर नवउद्योग येतील आणि याचा फायदा युवा वर्गाला होणार आहे. देशातील उत्पादन क्षमता वाढणार असल्याने देश स्वयंपूर्ण होणार आणि विदेशी मालाला बाजारपेठ मिळणार नाही. वस्त्रोद्योगाला चालना मिळणार असल्याने शहरातील हँडलूम, खादी, हातमाग व्यवसायाला दिलासा मिळणार असल्याने सोलापूर शहराला पुनर्वैभव मिळणार आहे. विद्यार्थिनींसाठी वसतीगृह बांधण्याच्या निर्णयामुळेही मुलींना शिक्षणाची सोय होणार आहे. एकूणच, केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ हा विकसित भारताच्या दिशेने मोठे पाऊल असून, दूरदृष्टीनेच तो तयार केला आहे.

**- रोहिणी तडवळकर, शहराध्यक्षा, भाजपा**

### सर्वसामान्यांसाठी कसलीही ठोस तरतूद नसलेला अर्थसंकल्प



केंद्रीय शेतकरी, मजूर आणि देशातील सर्वसामान्य जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यात अपयशी ठरला. हा अर्थसंकल्प सर्वसामान्यांसाठी नसून केवळ कार्पोरेट हितसंबंध जपणारा असल्याचे स्पष्ट केले. गृहनिर्माण, प्रधानमंत्री आवास योजना, जलजीवन योजना यांसारख्या महत्त्वाच्या लोककल्याणकारी योजनांसाठी अर्थसंकल्पात कोणतीही ठोस तरतूद करण्यात आलेली नाही. सामान्य नागरिकांच्या जीवनाशी व दैनंदिन जगण्याशी संबंधित मूलभूत प्रश्नांकडे सरकारने पुन्हा एकदा दुर्लक्ष केल्याचा केला. या अर्थसंकल्पातून देशातील शेतकरी, शेतमजूर व गरीब घटकांना कोणताही प्रत्यक्ष लाभ मिळालेला नाही. त्यामुळे हा अर्थसंकल्प सर्वसामान्य जनतेसाठी निराशाजनक असून सरकारची जनविरोधी भूमिका स्पष्ट करणारा आहे.

**- खासदार प्रणिती शिंदे**

### अपेक्षित अर्थसंकल्प



वर्षा दोन वर्षात निवडणुका नाहीत. त्यामुळे मध्यमवर्गीय करदात्यांना दिलासा देणे, मतदारांना स्वप्ने दाखवणे आणि जनतेला खुश करण्याची आवश्यकता नाही. याची पुरेपूर जाण असणारा अर्थसंकल्प. धोरणात्मक आणि रचनात्मक दृष्टिकोनातून मांडलेला व भान असणारा असा हा अर्थसंकल्प. १ एप्रिल २०२६ पासून नवा आयकर कायदा २०२५ लागू होणार असल्यामुळे आयकराचे दर आणि त्या कायद्यात फार मोठे बदल अपेक्षित नव्हतेच. नवीन करपप्रणाली लागू होणार असल्यामुळे कंपनी आयकरदात्याना मात्र काही दिलासा मिळेल हे नक्की. आयकर विवरणपत्र भरत असताना, चूक झाली तर ती महागात पडणार आहे. त्यामुळे आयकरदात्यांनो विवरणपत्र जबाबदारीने भरा. छोट्या आणि मध्यम उत्पादकांना इन्व्हॉस डिस्काउंटींगची केलेली सोय खूप मोठा दिलासा देणारी आहे. शेअर मार्केटमध्ये फ्यूचर्स आणि ऑप्शन्सचे व्यवहारावर अतिरिक्त कर लावला ते चांगले झाले. यामुळे भांडवली बाजारातील सूज कमी झाली तर आनंदच आहे. अल्प, मध्यम तथा दीर्घकालीन गुंतवणूकदारांचे नुकसान होणारे नाही. अंजली भांडवली बद्दल पडलेला असला तरी उद्या तो सुधारणार आहे. अपेक्षित असाच हा अर्थसंकल्प आहे.

**- श्रीनिवास माधवराव वैद्य**
**चार्टर्ड अकांउंटट, सोलापूर**

### कर रचनेत स्थिरता



आजचा बजेट संतुलित आणि विकासाभिमुख आहे. भांडवली खर्च वाढवून पायाभूत सुविधा व उद्योगांना चालना देण्यावर योग्य भर दिला आहे. कर रचनेत स्थिरता ठेवून करदात्यांना स्पष्टता आणि विश्वास दिला आहे. दीर्घकालीन दृष्टीने हा बजेट अर्थव्यवस्थेच्या शाश्वत वाढीस पूरक ठरेल.

**- जयेश एकनाथराव रेलकर**
**चार्टर्ड अकाउंटंट**

### बजेट मिश्र स्वरूपाचे

रेल्वे बजेटचा सर्वसामान्य प्रवाशांच्या दृष्टीने विचार केला, तर हे बजेट मिश्र स्वरूपाचे आहे असे म्हणता येईल. सुरक्षितता आणि आधुनिकतेच्या दृष्टीने पाहिले तर हे बजेट योग्य आहे. भविष्यातील भारतासाठी पायाभूत सुविधा मजबूत करणे गरजेचे आहे. मात्र, तात्काळ सुटकेच्या दृष्टीने पाहिले जसे की गर्दी कमी होणे किंवा स्वस्त प्रवास तर हे बजेट सर्वसामान्यांसाठी थोडे निराशाजनक ठरू शकते, कारण यात प्रिमियम प्रवासावर जास्त भर देण्यात आला आहे.

**- नीलकंठ शिंदे, अध्यक्ष,**
**शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटना, सांगोला**

### रोजगारनिर्मितीला गती देणारा अर्थसंकल्प



२०२६-२७ चा केंद्रीय अर्थसंकल्प उद्योगांसाठी निश्चितच दिलासादायक आणि आशादायी आहे. MSME क्षेत्र, पायाभूत सुविधा आणि उत्पादन क्षेत्रावर सरकारने दिलेला ठोस भर स्वागतार्ह आहे. याचा थेट फायदा सोलापूरसारख्या उदयोन्मुख औद्योगिक शहरांना होणार असून येथे नव्या गुंतवणुकीच्या संधी निर्माण होतील. स्थानिक लघु-मध्यम उद्योगांना बळ मिळेल, ऑटो पार्टस् व इंजिनिअरिंग उद्योगाचा विस्तार होवून रोजगारनिर्मितीला गती मिळेल. ऑटोमोबाइल क्षेत्राच्यादृष्टीने सकारात्मक दिशा देणारा आहे. उत्पादन क्षमता वाढवणे, तंत्रज्ञानात सुधारणा करणे आणि भविष्यातील इलेक्ट्रिक वाहनांबाबत सरकारने दाखवलेली स्पष्ट भूमिका उद्योगविश्वास वाढवणारी आहे. यामुळे देशांतर्गत उत्पादनासोबतच निर्यातीच्या संधीही वाढतील. हा अर्थसंकल्प उद्योगांच्या दीर्घकालीन वाढीस पूरक असून आर्थिक स्थैर्य आणि विकास यांचा समतोल साधणारा आहे. सोलापूरच्या औद्योगिक विकासाला चालना देणारा आणि स्थानिक उद्योजकांसाठी नवी दारे उघडणारा असा हा अर्थसंकल्प ठरेल, असा विश्वास वाटतो.

**-यतिन शहा, चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक, प्रिसिजन कॉम्पशाफ्ट्स, सोलापूर.**

### भारताची अर्थव्यवस्था बळकट होणार



एप्रिलपासून नवीन सुधारित पद्धतीने आयकर लागू करण्यात येणार आहे. सबका साथ सबका विकास हे ब्रीद वाक्य आहे; त्या स्थितीत आज अर्थ संकल्प सादर करण्यात आला आहे. शेतकरी फलोत्पादन अभियान, मस्तव्यवसाय फिशरी, लघुउद्योजक महिला केंद्र स्थानी ठेवून बजेट २०२६ अतिशय अर्थ व्यवस्था मजबूत करण्यासाठी आहे. जागतिक आरोग्य तुलनेत अधिक स्वस्त दरात सेवा देण्यासाठी प्रयत्न आहे. एकूण काय तर भारत सरकारच्या नवीन धोरणानुसार अर्थ संकल्प आता सर्व कर्तव्य पार पाडण्यासाठी सक्षम आहे. देश, विदेश व्यापार सक्षम करण्यासाठी हा अर्थ संकल्प आहे. जागतिक पातळीवर आता भारतीय अर्थव्यवस्था जगातील तिसऱ्या क्रमांकाचे स्थान निर्माण करून वाटचाल करील. शेती विषयक माहितीपर फलोत्पादन अभियानांतर्गत विवीध फळे उदा काजू नारळाच्या आर्थिक बाजू बळकट करण्यासाठी नियोजन लघुउद्योजक मेडिकल पर्यटकांना खेचण्यासाठी सोयी सी प्लन जलवाहतूक वाट पशुसंवर्धन मस्तव्यवसाय फिशरी.

**- श्रीकांत मोरे,**
**अर्थतज्ज्ञ, मनोरमा बँक**

### भरीव तरतूद व नवीन भारत निर्माणचे धोरण



आजच्या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा करिता भरीव तरतूद व नवीन भारत निर्माणच्या धोरणाने शेतकरी, नव उद्योजक, महिला व सुक्ष्म व लघु उद्योग यांना केंद्रीत करुन सदर अर्थसंकल्प् सादर करण्यात आला. तसेच आत्मनिर्भर भारत व स्टार्ट अप उद्योगांना आर्थिक सहकार्य देऊन भविष्याचा वेध घेऊन नवीन गुंतवणूकीद्वारे रोजगार वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात आलेला आहे. सुक्ष्म व लघु उद्योग व टेक्सटाइल, गारमेंट उद्योग या उद्योगात नवीन आधुनिक करण होण्यासाठी प्रोत्साहन योजना घोषित करण्यात आले. शिवाय रेल्वेचे नवीन कॉरिडॉर पूणे ते हैदराबाद घोषित करण्यात आला. याचा फायदा सोलापूरला होणार, मेगा टेक्सटाईल पार्क हे सोलापुरात उभारले जाऊ शकते.

**-राजू राठी, अध्यक्ष चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड अँग्री कल्चर, सोलापूर**

### आयकर कररचनेत कोणताही बदल नसलेला व नवा आयकर कायदा लागू होणारा अर्थसंकल्प



केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी वर्ष २०२६ चा अर्थसंकल्प सादर केला. प्रस्तावित नवीन आयकर कायदा दि. १ एप्रिल २०२६ पासून लागू होईत. नव्या आयकर कायद्यातील तरतुदींबाबत यापूर्वीच स्पष्टीकरण आले आहे. आयकर विवरणपत्रकाचे नमुने व अन्य प्रशासकीय तरतुदी लवकरच जाहीर होतील. मागील अर्थसंकल्पात करपात्र रकमेत ७ लाख रु. वरून १२ लाख रु. ची वाढ केली होती, त्यामुळे या वर्षीच्या अर्थसंकल्पात पुन्हा वाढ होईल याची अपेक्षा नव्हती. उद्गम कर कपात दरातील थोडेफार सवलती वगळता आयकर दरात कोणतेही बदल केलेले नाहीत. व्यक्तीगत (पगारदार) करदात्यांना आयकर विवरणपत्रके भरण्यासाठी असलेल्या ३१ जुलै मुदतीत कोणतेही बदल केलेले नाहीत. विवरणपत्रकातील आकारणीदरम्यान आढळलेल्या चुका त्यावरील दंडात्मक कारवाईतील तरतूदीत थोडी शिथिलता आणलेली आहे. आयकर करणीतील दोषदुरुस्ती, प्रलंबित आयकर अपिले, संगणकीय दोषामुळे आवाजवी आयकर आकरणी, प्रलंबित आयकर परतावे याबाबत विवाद संपुष्टात आणणेसाठी एखादी योजना आणणे आवश्यक होते, परंतु नेहमीप्रमाणे या समस्येवर दुर्लक्ष करण्यात आले आहे.

**- किशोर आदोने चार्टर्ड अकौंटंट,**

## अर्थसंकल्प जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी भाजपा राबविणार विशेष मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ०१ फेब्रुवारी-**

केंद्रीय अर्थसंकल्पातील तरतुदींचा सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर थेट परिणाम होत असतो. मात्र, सर्वसामान्य नागरिकांना अशा तरतुदींची फारशी माहिती होत नाही. ही माहिती करून देण्याच्या दृष्टीने भारतीय जनता पक्षाच्या वतीने विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे.

या मोहिमेंतर्गत विविध माध्यमांचा वापर करून एक ते पंधरा फेब्रुवारी या कालावधीत अर्थसंकल्पातील विशेष तरतुदी नागरिकांना समजावून सांगण्यात येणार आहेत. त्यासाठी समाज माध्यमांचा प्रभावी वापर करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे या कालावधीत त देशभरात तब्बल दीडशे पत्रकार परिषदा घेण्यात येणार असून, प्रसारमाध्यमांद्वारे नागरिकांना अर्थसंकल्प समजावण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यासाठी केंद्रीय मंत्री, विविध राज्यांचे मुख्यमंत्री, मंत्री, खासदार आणि आमदार यांना पुढाकार घेण्याची सूचना पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

अर्थसंकल्पातील तरतुदींचा थेट परिणाम शेअर बाजारावर होत असतो. त्याच्या तात्काळ प्रतिक्रिया ही शेअर बाजारात उमटत असतात. आज रविवार असूनही अर्थसंकल्प सादर होत आहे. अर्थसंकल्पाच्या प्रतिक्रियांचा ताण सोमवारी शेअर बाजाराच्या कामकाजावर येऊ नये यासाठी आज रविवार असूनही शेअर बाजाराचे कामकाज सुरू ठेवण्यात आले आहे. सकाळी साडेनऊ ते दुपारी साडेतीन या काळात रविवार असूनही शेअर बाजारातील व्यवहार सुरू राहणार आहेत. यापूर्वी अटल बिहारी वाजपेयी यांच्या पंतप्रधान पदाच्या कार्यकाळात रविवारी अर्थसंकल्प सादर झाला होता. त्यावेळी देखील शेअर बाजार खुला ठेवण्यात आला होता, असेही सांगण्यात आले.



## महत्वाचे...



### सांगोला तालुक्यात ७४ टक्के टपाली मतदान पूर्ण

**सांगोला, दि.१ फेब्रुवारी -**

सांगोला तालुक्यात ७ जिल्हा परिषद व १४ पंचायत समिती जागेसाठी सार्वत्रिक निवडणूक होत असून रविवार दि.१ फेब्रुवारी रोजी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृह येथे टपाली मतदान घेण्यात आले. स.१० ते रात्री ८ पर्यंत सदर टपाली मतदान सुरू होते. एकूण ५८५ टपाली मतदार असून त्यापैकी ४३७ मतदान झाले असून टपाली मतदान ७४ टक्के झाल्याची माहिती सहा.निवडणूक निर्णय अधिकारी बाळूताई भागवत यांनी दिली. सदर मतदान करण्यासाठी ७ कंपार्टमेंट तयार करण्यात आले होते. निवडणूक कर्तव्यावर असणारे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सकाळपासून मतदान केंद्रावर रांगा लावून उस्फूर्तपणे मतदान केले. मतदान केंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. टपाली मतदान करण्यासाठी निवडणूक कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांना मतदान करण्याचे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर.माळी व सहा. निवडणूक निर्णय अधिकारी बाळूताई भागवत यांनी केले होते. यावेळी टपाली मतदान केंद्राचे नोडल अधिकारी दिपाली जाधव, सहा.गटविकास अधिकारी वसंत फुले, गटशिक्षणाधिकारी सुयोग नवले व प्रत्येक कंपार्टमेंट मध्ये केंद्राध्यक्ष, सहा.मतदान अधिकारी, मतदान अधिकारी २ व ३ उपस्थित असल्याची माहिती मीडिया नोडल अधिकारी मिलिंद सावंत यांनी दिली.

### जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी मतदान यंत्रे तयार

**माळशिरस, दि. १ फेब्रुवारी-**

जि.प. व पंचायत समिती निवडणुकीसाठी आज मतदान यंत्रे तयार करण्यात आली एकूण ३६३ केंद्रांसाठी ३६३ लीं व लीं अशी ३६३ तसेच १०८ राखीव यंत्रे अशी ४७१ मतदान्यंत्रे तयार करण्यात आली .यासाठी ३७ क्षेत्रीय अधिकारी व ३७ ग्राम महसूल अधिकारी आणि ३७ ग्राम महसूल सेवक यांची ३७ टेबलावर नियुक्ती करण्यात आली होती याखेरीज सुरक्षा कक्ष, हजेरी ओळखपत्रवितरण, साहित्यवाटप, इ कामासाठी मिळून १५० हून अधिक कर्मचारी नियुक्त करण्यात आले होते. या प्रक्रियेसाठी उमेदवारांचे प्रतिनिधीही उपस्थित होते. सर्व मतदान यंत्रे सुरक्षा कक्षात ठेऊन उमेदवार प्रतिनिधींच्या उपस्थितीत सुरक्षा कक्ष सील करण्यात आले असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

# महापौर, उपमहापौर पदाची निवडणूक बिनविरोध होणार?

## ● दिवसभर झाली खलबते ● स्थानिक स्तरावर बैठक ● प्रदेश स्तरावर चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ फेब्रुवारी-**

महापालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदाची निवडणूक बिनविरोध होण्याची दाट शक्यता आहे. दरम्यान, भारतीय जनता पार्टीकडून त्यादृष्टीने जोरदार फिल्डिंग लावण्यात आल्याचे दिसून येत आहे.

या दोन्ही पदांसाठी ६ फेब्रुवारी रोजी निवडणूक होणार आहे. त्यासाठी सोमवारी उमेदवारी अर्ज भरण्यात येईल. सकाळी १० ते ११.३० या वेळेत नगरसचिव कार्यालयात अर्ज स्विकारले जाणार आहेत.



'भाजपा'कडून या दोन्ही पदांसाठी आजरोजी दिवसभर खलबते झाली असून उमेदवारांची नावे उद्या सकाळी जाहीर करण्यात येणार आहे. स्थानिक पदाधिकारी यांची बैठक आणि प्रदेश पातळीवरील नेत्यांशीदेखील चर्चा झाली असल्याचे समजते.

१०२ सदस्य असलेल्या महापालिकेत ८७ सदस्य भाजपाचे आहेत. उर्वरित १५ सदस्य विरोधी पक्षाचे तर एमआयएमचे ८ सदस्य आहेत. महापालिकेतील सर्वात मोठा विरोधी पक्षाचा मान एमआयएमने पटकावला आहे. शिवसेना शिंदे गटाचे चार सदस्य आहेत. हा पक्ष राज्यात महायुती सरकारमध्ये भाजपाचा मित्रपक्ष आहे.

एमआयएम आणि शिवसेना शिंदे गट महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणुकीत उतरणार नसल्याचे सांगण्यात येते. काँग्रेसचे दोन व राष्ट्रवादी काँग्रेसचा एक सदस्य आहेत. हात दाखवून अवलक्षण नको म्हणून मिळेल ते पदरात पाडून घेण्याची भुमिका असू शकते.

सोलापूर महापालिकेतील एकूण १०२ जागांपैकी भाजपा ८७, एमआयएम ८, शिवसेना शिंदे गट ४, काँग्रेस २, राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.) १ असे पक्षीय बलाबल आहे. शिवसेना (शिंदे), राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.) सोलापूर महापालिका निवडणुकीत युती करुन भाजपा विरोधात लढले असले तरी राज्यात महायुती असल्याने भाजपच्या विरोधात उमेदवार देण्याची शक्यता नसल्याची चर्चा आहे.

### एमआयएम तटस्थ राहणार : शेख

महापौर आणि उपमहापौर निवडणुकीसाठी आम्ही आमच्या पक्षाचा उमेदवार देणार नाही. ६ मार्चला मतदान झाल्यास आमचे ८ सदस्य तटस्थ राहतील. अन्य विरोधी पक्षाने उमेदवार उभे केले तरी आम्ही त्यांना पाठिंबा देणार नाही. आमच्या पक्षातील वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करुनच हा निर्णय घेतला आहे, असे 'एमआयएम'च्या गटनेत्या वाहिदाबी शेख यांनी सांगितले.

### 'डीआरएम' प्रवेशद्वारावर १२ फेब्रुवारीला उपोषण

**सोलापूर, दि. १ फेब्रुवारी-**

मध्य रेल्वेकडील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या फॅमिली पेन्शनच्यासंबंधी आलेल्या अर्जावर विनाविलंब चौकशी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना डी. आर.एम. यांनी पेन्शन अदालतीत सर्व वेल्फेअर इन्स्पेक्टर दिल्या होत्या. एका अर्जदाराकडं जवळपास ५० दिवसात चौकशीसाठी कोणीही फिरकलं नसल्याचं पुढं आलं आहे. त्यांच्या सूचनेकडे वेल्फेअर इन्स्पेक्टर यांनी जणू कानाडोळा केल्याचं दिसतंय. पेन्शन अदालतीतील अर्जावरील चौकशीसाठी एक अर्जदार १२ फेब्रुवारी रोजीपासून डी.आर.एम. कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर उपोषणास बसणार आहे.

मुस्लिम पाच्छा पेठेतील रहिवाशी नसरीन बानो यांचे वडील वलियोद्दीन भागनगरी सोलापूर मध्य रेल्वेकडे सेवा केल्यानंतर वयोनियमाने २८ फेब्रुवारी १९९३ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांचे २९ सप्टेंबर २०१८ तर आईचं ०५ जुलै २०२५ निधन झालं आहे. उभयतांच्या निधनानंतर नसरीन बानो यांनी, मंडल रेल्वे प्रबंधक यांच्या कार्यालयाकडं ११ ऑगस्ट २०२५ रोजी अर्ज करून फॅमिली पेन्शन मिळण्यासाठी अर्ज केला. पेन्शन अदालतीसाठी हाच अर्ज ०१ ऑक्टोबर रोजी दाखल करण्यात आला होता, असे सांगण्यात आले.

### शेळी विक्रीच्या पैशावरुन भावानेच भावाला केले गंभीर जखमी

**मंगळवेढा दि.१ फेब्रुवारी -**

हुन्नूर येथे विक्री केलेल्या शेळ्याच्या पैशाच्या व्यवहाराच्या कारणावरुन एका ३० वर्षीय भावास दुसर्या भावाने डोक्यात दगड घालून गंभीर जखमी करुन जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी भाऊ सुनिल जकाप्पा पुजारी याच्या विरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. यातील जखमी फिर्यादी संजय जकाप्पा पुजारी व आरोपी सुनिल जकाप्पा पुजारी हे दोघे सख्खे भाऊ असून तीन महिन्यापुर्वी फिर्यादीकडील एक शेळी आरोपी भावास ८ हजार रुपयास विक्री केली होती. त्यातील ३ हजार रुपये फिर्यादीस दिले होते. ५ हजार रुपये येणे बाकी असल्याने दि. २५ जानेवारी रोजी सकाळी ९.३० वाजता राहिलेले पैसे मागीतले असता आरोपी भावाने तू मला शेळीचे वारंवार पैसे का मागतो ? असे म्हणून मारहाण करु लागला यावेळी जवळ पडलेला दगड घेवून आरोपीने पाठीवर व डोक्यावर मारुन गंभीर जखमी केले. त्यामुळे फिर्यादीच्या डोक्यातून रक्त येवू लागल्याने फिर्यादी मोठमोठ्याने ओरडा लागला,त्यावेळी फिर्यादीची आई सुरवंता तसेच मोठी भावजय संगीता घटनास्थळी आल्या व त्यांनी भांडणाची सोडवासोडव केली. आरोपीने तेथून निघून जाताना फिर्यादीस तू आता वाचला आहेस तुला परत जीवंत सोडत नाही अशी धमकी देवून निघून गेला असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.





## महापौरांसह सभागृह नेत्याचे दालन झाले सुसज्ज

### ▶▶ पंडित दीनदयाळ उपाध्याय सभागृहात होणार बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ फेब्रुवारी-**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीनंतर सोमवारी सकाळी महापौर व उपमहापौर निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यात येणार आहेत. तत्पूर्वी कौन्सिल हॉल इमारतीतील सभागृह नेत्यांचे दालन असलेले पंडित दीनदयाळ उपाध्याय सभागृह आणि महापौर कार्यालय नेटक्या पध्दतीने सुसज्ज ठेवण्यात आले आहे.

महापौर आणि उपमहापौर निवडणुकीसाठी सोम वारी नगरसचिव कार्यालयात उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येणार आहे. सर्वाधिक जागा जिंकलेल्या भाजपाचे गटनेते यांच्यासह अन्य सदस्य आज सोमवारी सकाळीच सभागृह नेत्यांचे कार्यालय असलेले पंडित दीनदयाळ उपाध्याय सभागृह येथे येणार आहेत.

सोलापूर महापालिकेच्या एकूण १०२ जागांपैकी भाजपाने ८७ जागा जिंकल्या आहेत. ८७ नगरसेवकांना बसण्याची व्यवस्था पंडित दीनदयाळ उपाध्याय सभागृहात करण्यात आली आहे. यापूर्वी भाजपचे ४९ सदस्य असल्याने तेवढीच व्यवस्था होती. मात्र यंदा भाजपा नगरसेवकांची संख्या ३८ ने वाढल्याने मधील पडदी काढून सभागृनेतेच्या कार्यालयाचा विस्तार केला आहे. साधारणतः १२० जणांना बसण्याची व्यवस्था केली आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय सभागृह या नामफलकाखाली मोठ्या आकाराचे कमळ साकारले आहे. अँटी चेंबर तसेच कर्मचाऱ्यांसाठी बसण्याची वेगळी व्यवस्था केली आहे.

महापौर यांच्या दालनात सोफासेट, खुर्च्या व इतर सर्व नेटके व्यवस्था केली आहे. येथील अँटी चेंबर व्यवस्थित ठेवण्यात आले आहे. आवश्यक ती साधनसामग्री ही लावण्यात आली आहे.

## कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त प्रबोधनात्मक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १ फेब्रुवारी -**

येथील शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक, संवर्धक निवृत्ती गोविंदराव तथा कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



रविवार दि. १ फेब्रुवारी रोजी सुप्रसिध्द व्याख्याते, माजी सनदी अधिकारी इंद्रजित देशमुख यांचे प्रेरक व्याख्यान झाले. सोमवार दि. २ रोजी सकाळी ११ वा. भाषा अभ्यासक तथा निरुपणकार डॉ. धनश्री लेले यांचे 'माझ्या मना रे ऐक जरा' या विषयावर व्याख्यान होईल. नगराध्यक्षा तेजस्विनी कथले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. बुधवार दि. ४ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजता ख्यातनाम साहित्यिक, ९२ व्या अ.भा.मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ.अरुणा ढेरे यांच्या अध्यक्षतेखाली जयंतीचा मुख्य कार्यक्रम होणार आहे. अ.भा. मराठी साहित्य महामंडळ, पुणेचे अध्यक्ष प्रा. मिलींद जोशी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असतील. यावेळी खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार दिलीप सोपल, माजी आमदार राजेंद्र राऊत, नगराध्यक्ष तेजस्विनी कथले यांची उपस्थिती असेल.

या कार्यक्रमात वीरमाता, वीरपत्नी यांचा सन्मान करण्यात येणार आहे. कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या प्रांगणात हे सर्व कार्यक्रम होणार आहेत. संस्थेचे अध्यक्ष डॉ.बी.वाय.यादव, उपाध्यक्ष नंदकुमार जगदाळे, सचिव पी.टी.पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे यांच्यासह संस्था विश्वस्त, प्राचार्य, प्राध्यापक, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आदी जयंती सोहळ्यासाठी परिश्रम घेत आहेत.

### डॉ.आमटे दांपत्य यंदाच्या पुरस्काराचे मानकरी

गडचिरोली जिल्हयातील हेमलकसा येथे आदिवासींसाठी लोक बिरादरी प्रकल्पाच्या माध्यमातून आयुष्यभर आरोग्य, शिक्षण आणि वन्यजीव संरक्षण करणारे थोर समाजसेवक, पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे व त्यांच्या पत्नी डॉ. मंदाकिनी आमटे यांना संयुक्तरित्या यंदाचा कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे समाज परिवर्तन गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. सामाजिक कार्यकर्ते प्रा.डॉ. सोमनाथ रोडे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. दि. ६ रोजी सकाळी ११ वाजता हा पुरस्कार सोहळा होणार आहे.

### यंदा प्रबोधनात्मक कार्यक्रम होणार

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे अपघाती निधनामुळे दि. ३१ रोजी होणारी महिलांची मोटारसायकल रॅली, दि. ३ फेब्रुवारी रोजी होणारा विविध गुणदर्शनचा कार्यक्रम व बुधवार दि. ४ रोजी सकाळी ७-३० वा. बार्शी शहरातून निघणारी जनजागरण मिरवणूक रद्द करण्यात आले आहेत. इतर प्रबोधनात्मक कार्यक्रम ठरल्याप्रमाणे होणार आहेत.






### अजितदादांना सर्वपक्षीय श्रध्दांजली

**रविवारी सायंकाळी निर्मलकुमार फडकुले सभागृहात उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांना सर्व पक्षाच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.**

# महापालिका इतिहासात फक्त तीनच महापौर बिनविरोध

## ▶▶ सामाजिक समन्वयाची दुर्मिळ उदाहरणे
## ▶▶ आतापर्यंत ३७ महापौर तर ३६ उपमहापौर झाले

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. १ फेब्रुवारी-**

सोलापूर महापालिकेच्या स्थापनेपासून आजपर्यंत फक्त तीन महापौरांची बिनविरोध निवड झाली आहे. राजकीय स्पर्धा तीव्र असलेल्या महापालिकेच्या इतिहासात या निवडी सामाजिक समतोल आणि तत्कालीन राजकीय समन्वयाचे प्रतीक मानल्या जातात. आतापर्यंत ३७ महापौर व ३६ उपमहापौर झाले आहेत.



मागासवर्गीय प्रवर्गातील पहिले महापौर होण्याचा मान दलितमित्र भीमराव जाधव गुरुजी (१९७४-७५) यांना मिळाला. मुस्लिम समाजातील पहिली व्यक्ती महापौरपदासाठी उभी राहिल्याने विरोधकांनी उमेदवार उभा न करता सामाजिक सलोखा जपल्याने युन्नूस शेख (१९७५-७६) यांची बिनविरोध निवड झाली होती.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधत अनुसूचित जाती प्रवर्गातील मुरलीधर पात्रे (१९९०-९१) यांची महापौरपदी बिनविरोध निवड झाली होती.

महापालिकेचे पहिले उपम हापौर एन.एम. वडवान हे सलग सहा वर्षे (१९६४ ते १९७०) या पदावर राहिले होते. आजवरचा सर्वाधिक कालावधी आहे.

### नगरपालिकेपासून महापालिकेपर्यंतचा प्रवास

१ ऑगस्ट १८५२ रोजी स्थापन झालेल्या सोलापूर नगरपालिकेचे १ मे १९६४ रोजी महापालिकेत रूपांतर झाले. शेवटचे नगराध्यक्ष पारसमल जोशी हेच सोलापूरचे पहिले महापौर ठरले. पुलोदच्या कालखंडात प्रा.डॉ. पुरणचंद्र पुंजाल (१९८५-८६) आणि किशोर देशपांडे (१९८६-८७) यांनी महापौरपद भूषवले. संजय हेमगड्डी (१९९९-२००२) हे काँग्रेसपुरस्कृत अपक्ष उमेदवार होते.

### १९६४ पासूनचे महापौरांची नावे

पारसमल जोशी, तात्यासाहेब घोंगडे, इरप्पा बोल्ली, गणेशप्पा बाळी, विश्वनाथ बनशेट्टी, राजाराम बुर्गुल, बाबुराव चाकोते, भीमराव जाधव, युन्नूस शेख, भालचंद्र अलकुंटे, विश्वनाथ भोगडे, सिद्राम आडम, भगवान चव्हाण, नारायणदास राठी, प्रा.डॉ.पुरणचंद्र पुंजाल, किशोर देशपांडे, बंडप्पा मुनाळे, महादेव महिंद्रकर, धर्मण्णा सादूल, मुरलीधर पात्रे, उमरखान बेरिया, विश्वनाथ चाकोते, मनोहर सपाटे, महेश कोठे, सुभाष पाटणकर, ख्वाजादाऊद नालबंद, शेवंताबाई पवार, जनार्दन कारमपुरी, संजय हेमगड्डी, नलिनी चंदेले, विठ्ठल जाधव, अरुणा वाकसे, आरिफ शेख, अलका राठोड, सुशीला आबुटे, शोभा बनशेट्टी, श्रीकांचना यन्नम.

### बिनविरोध चौथा महापौर होण्याचा मान कुणाला मिळणार?

सोलापूर महापालिकेच्या इतिहासात आतापर्यंत एकूण तीन महापौर बिनविरोध निवडण्यात आले आहेत. सामाजिक सौहार्द आणि इतर महत्त्वपूर्ण कारणास्तव या निवडणुका बिनविरोध झाल्या होत्या. सन २०२६ च्या या सोलापूर महापालिका निवडणुकीत भाजपाने सर्वाधिक ८७ जागा जिंकल्या आहेत. विरोधकांना केवळ १५ जागा मिळवता आल्या. एकूणच राजकीय परिस्थिती पाहता यंदाचा महापौर आणि उपमहापौर बिनविरोध होण्याची शक्यता आहे. यामुळे आता बिनविरोध चौथा महापौर होण्याचा मान कोणाला मिळणार याकडे आता लक्ष लागले आहे.

### आजपर्यंतचे उपमहापौर याप्रमाणे

एम. एन. वडवान, यल्लप्पा जेनुरे, माधवराव कोंतम, फजलेअहमद आडते, नारायण पिट्ठा, ल.आ. साठे, दीनानाथ एरम, प्रा.नसीम पठाण, म.ति. होसमनी, ह.ना. आसादे, त.म. गंभिरे, इस्माईल अल्लोळी, संगप्पा केंगनाळकर, लालसिंग रजपूत, नारायण कोनापुरे, बाळासाहेब घोंगडे, हबीब सय्यद, अभिमन्यू भोसले, वाय.एस. गायकवाड, सुषमा घाडगे, इस्माईल बागवान, फातिमा शेख, अरविंद काकडे, माणिकसिंग मैनावाले, प्रमोद गायकवाड, महानंदा भोसले, सुमन मुदलियार, अप्पाशा म्हेत्रे, पद्माकर काळे, दिलीप कोल्हे, राजेंद्र कलंत्री, विष्णू निकंबे, हारुण सय्यद, प्रवीण डोंगरे, शशिकला बत्तुल, राजेश काळे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अजितदादांना सर्वपक्षीय शोकसभेत वाहिली आदरांजली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ फेब्रुवारी :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्यानंतर लातूर जिल्ह्यात राजकीय पक्ष, शिक्षण संस्था, उद्योजक अशा विविध क्षेत्रांतून शोकभावना व्यक्त झाल्या. दरम्यान, शनिवारी लातूर येथील दयानंद सभागृहात सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी अनेकांनी आठवणींना उजाळा दिला. यावेळी माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर म्हणाले, अजितदादांनी सर्वसामान्य, कार्यकर्त्यांना सन्मान देण्याचे, बळ देण्याचे काम केले. 'बोले तैसा चाले' असे नेतृत्व सर्वांना मदत करणारे होते. कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल म्हणाले, अजितदादा सर्वसंमत नेतृत्व होते. प्रत्येक कामाची नस ओळखणारा नेता होता. अजित पाटील कव्हेकर म्हणाले, अजितदादा विकासाला आकार देणारे नेते होते. मकरंद सावे म्हणाले, लातूरमधील एका कार्यकर्त्याचे ऑपरेशन करायचे होते, यासाठी त्याला मुंबईत रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आम्ही अजितदादांना भेटलो. दादांनी दुसऱ्या दिवशी १२ लाखांची आर्थिक मदत केली. जिल्हाध्यक्ष डॉ. अफसर शेख म्हणाले, दादांशी आमचे कौटुंबिक नाते होते. ते सर्वसामान्यांचे नेते होते. सर्वांना आधार देणाऱ्या नेत्याला विसरणे कठीण आहे. औसा शहरासाठी त्यांनी करोडो रुपयांचा विकास निधी दिला. विक्रांत गोजमगुंडे म्हणाले, दोन अडीच महिन्यांपूर्वी मी दादांना भेटलो. तेव्हा त्यांनी लातूरच्या विकासाचा रोडमॅप सांगितला. लातूरकरांना माहीत नसणाऱ्याही गोष्टी त्यांनी सांगितल्या.



## विविध वृत्त...

### मोकाट कुत्र्याचा विद्यार्थ्यास चावा

**लातूर :** शहरात मोकाट कुत्र्यांचा वावर वाढला असून प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे. जुना औसा रोडवरील अयोध्या सोसायटीतील साईबाबा मंदिर आवारात शनिवारी दुपारी मोकाट कुत्र्याने एका शाळकरी मुलाला चावा घेतल्याची घटना घडली आहे. शहरात शाळा परिसर, बसस्थानके, दवाखाना परिसर, शासकीय कार्यालये अशा वर्दळीच्या ठिकाणी मोकाट कुत्र्यांचा वावर वाढला आहे. याचा त्रास बालके, महिला, वृद्धांना होत आहे. तसेच रस्त्याने जाताना वाहनधारकांनाही अडथळा ठरत आहे. महापालिका प्रशासनाने मोकाट कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ करीत आहेत.

### मतदान वाढीसाठी दैठणा येथे मतदार जनजागृती रॅली

**शिरूर अनंतपाळ :** जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. येत्या ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी तालुक्यातील दैठणा येथील जिल्हा परिषद शाळेने राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून चिमुकल्यांची मतदार जनजागृती रॅली काढली. शिरूर अनंतपाळ तालुक्यात जिल्हा परिषदेचे दोन गट आणि पंचायत समितीचे चार गण आहेत. राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून शाळा, महाविद्यालयाच्या माध्यमातून मतदार जनजागृतीचे विविध उपक्रम घेण्यात यावेत, अशा सूचना येथील निवडणूक निर्णय अधिकारी अहिल्या गाठाळ यांनी केल्या आहेत. त्यानुसार दैठणा येथील जिल्हा परिषद शाळेने विद्यार्थ्यांच्या हातात विविध फलक देऊन जनजागृती रॅली काढली. यावेळी उद्धव कावळे, यांची उपस्थिती होती. बालाजी पारशेट्टे, शिक्षिका पटणे, स्वामी मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांच्या हातात विविध जनजागृती फलक होते. मतदान करा, मतदान करा असे आवाहन करीत 'मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो' अशा घोषणा विद्यार्थी देत होते. दरम्यान, निवडणूक विभागाकडून मतदान वाढीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

### प्रत्येक कर्मचाऱ्याने जबाबदारीने कार्य करावे

**चाकूर :** निवडणूक ही लोकशाहीची सर्वात महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याने आपली जबाबदारी प्रामाणिकपणे व नियमांचे काटेकोर पालन करून पार पाडावी, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी संगीता टकले यांनी केले.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी तालुक्यातील निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी सहायक निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार नरसिंग जाधव, नायब तहसीलदार शैलेश निकम, नायब तहसीलदार संतोष धाराशिवकर,

२३ कर्मचाऱ्यांनी फिरवली पाठ..!

तालुक्यात निवडणूक प्रक्रियेसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांचे पहिले प्रशिक्षण येथील यशवंत गार्डन मंगल कार्यालयात पार पडले. त्यासाठी ८५० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यापैकी २३ कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणाकडे पाठ फिरविली होती. गैरहजर असलेल्या कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटिसा बजाविण्यात येणार असल्याची माहिती सहायक निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार नरसिंग जाधव यांनी दिली.

गटविकास अधिकारी संतोष वंगवाडे, मंदोदरी वाकडे, उपविभागीय अभियंता सुरज गोंड, झोनल अधिकारी तालुका कृषी अधिकारी शिवचंद्रपाल जाधव, उपअधीक्षक भूमी अभिलेख वैशाली गवई, वनपरिक्षेत्र अधिकारी शुभांगी चाटे, अनिल कचरे, बालाजी इंगळे, तलाठी शिवानंद गुंडरे आदी उपस्थित होते.

### आंतरराष्ट्रीय परिषदेत सुप्रिया सावंत यांचा सुवर्ण पदक पुरस्काराने गौरव

**चाकूर :** गोवा येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत नळेगावची कन्या सुप्रिया प्रभाकर सावंत यांचा सुवर्णपदक पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. कृषी व कृषी संलग्न विज्ञान क्षेत्रात नाविन्यपूर्ण आणि समाजोपयोगी संशोधन केल्याबद्दल सुप्रिया प्रभाकर सावंत यांना गोवा येथे पार पडलेल्या १२ व्या आंतरराष्ट्रीय परिषदेत सर्वोत्कृष्ट संशोधन पेपरसाठी सुवर्णपदक पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

ही प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय परिषद आयसी एव्ही आरआय २०२५ इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन ॲग्रिकल्चर अँड व्हेटरनरी : ट्रान्सफॉर्मेटिव्ह अप्रोच, रिसर्च अँड इनोव्हेशन्स फोरम या शीर्षकाखाली आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत देश-विदेशातील नामवंत शास्त्रज्ञ, संशोधक, प्राध्यापक, कृषी तज्ज्ञ आणि धोरणकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सुप्रिया सावंत यांनी सादर केलेल्या एआय अँड ड्रोन टेक्नॉलॉजी ईन ॲग्रीकलचर या संशोधन पेपर ला परीक्षक समितीने सर्वोच्च मानांकन दिले. या संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ड्रोन तंत्रज्ञानाचा शेतीमध्ये प्रभावी वापर कसा करता येईल, यावर सखोल अभ्यास मांडण्यात आला आहे. पिकांचे निरीक्षण, रोग व कीड व्यवस्थापन, खत व पाण्याचा अचूक वापर, उत्पादन खर्चात घट आणि उत्पन्नात वाढ यासाठी एआय व ड्रोन तंत्रज्ञान कसे उपयुक्त ठरू शकते, याचे शास्त्रीय विश्लेषण या संशोधनात करण्यात आले आहे.

तसेच, शाश्र्वत शेती विकास, हवामान बदलाचे परिणाम कमी करणे आणि शेतकऱ्यांच्या निर्णयक्षमतेत सुधारणा करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची भूमिका या संशोधनातून अधोरेखित करण्यात आली आहे.

## स्वास्थ्याबद्दलचा विचार आणि कृती बदलायला हवी : प्रा. शिंदे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ फेब्रुवारी :**

बदलत्या समाजजीवनात प्रत्येक जागरूक व्यक्तीने स्वास्थ्याबद्दलचा विचार आणि कृती बदलायला हवी,असे प्रतिपादन मानसशास्त्राचे प्रा. मीत शिंदे यांनी केले.

दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद विधी महाविद्यालय, लातूर येथील महिला अभ्यास केंद्राच्या वतीने होलिस्टिक ॲप्रोच टू मेंटल वेलनेस या विषयावर बहुविषयक परिसंवाद पार पडला. परिसंवादाला प्रमुख वक्ते म्हणून प्रा. मित. डी. शिंदे (सहायक प्राध्यापक, मानसशास्त्र पी. एन. दोशी महिला महाविद्यालय, मुंबई ) हे लाभले होते. त्यांनी तणाव, नैराश्य, स्पर्धा आणि अपेक्षांच्या ओझ्यात अडकलेल्या तरुणांनी मानसिक संतुलन कसे राखावे याबाबत मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी मानसिक स्वास्थ्याला शारीरिक, सामाजिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे असे सांगितले. संविधानातसुद्धा मानसिक स्वास्थ्याला महत्व दिले आहे. त्या दृष्टिकोनातून सुद्धा त्यांनी वेगवेगळे उदाहरण देऊन सविस्तर मार्गदर्शन केले.

आपल्या मार्गदर्शनात प्रा, मित शिंदे यांनी आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येकाला कोणत्या ना कोणत्या ताण तणावाचा सामना करावा लागा आहे. त्यामुळे आरोग्यावरही प्रतिकूल परिणाम होतो. असे होऊ नये म्हणून मनावर अधिकचा ताण येणार नाही, याची काळजीही घेणे आवश्यक असते. त्याकरिता तणावाचे संतुलन राखण्याचा प्रयत्न होणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने प्रत्येक सुजाण नागरिकाने प्रयत्नरत असणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

या राष्ट्रीय सेमिनारसाठी दुसरे प्रमुख वक्त्या डॉ. उज्वल अनिल नेने (मानसोपचारतज्ञ के. ई. एम. हॉस्पिटल, पुणे) ह्या लाभल्या होत्या. त्यांनी दैनंदिन जीवनातील ताणतणाव ओळखणे, भावनांचे व्यवस्थापन आणि वेळेवर समुपदेशन घेण्याचे महत्व स्पष्ट केले.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी हे होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी शिक्षणासोबत मानसिक स्वास्थ्याची जाणीव निर्माण करणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. मानसिक स्वास्थ संतुलित राखण्यासाठी प्रत्येकजण आपल्या परीने सर्वतोपरी प्रयत्न करत असतोच. प्रसंगी तज्ज्ञांचे मार्गदर्शनही घेणे आवश्यक असते,असेही त्यांनी सांगितले. व्यासपीठावर संस्थेचे संयुक्त सचिव जेष्ठ विधीज्ञ ड. श्रीकांत उटगे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ज्येष्ठ विधीज्ञ ड. आशिष बाजपाई व सी.ए. सुदर्शन भांगडिया तसेच दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड, समुपदेशक वैशाली चापसी आणि दयानंद विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. पूनम नाथानी व इतर महाविद्यालयाचे प्राचार्य व नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ड. रविंद्र शेट्टी तर आभार प्रदर्शन प्रा. स्वाती पाटील यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समन्वयक डॉ. संगीता महाजन, सहसमन्वयक प्रा. स्वाती पाटील व प्रा. अतिश तिवारी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. या नॅशनल सेमिनारसाठी दयानंद शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## आदर्श कॉलनीत फ्लॅटवर धाड; देहविक्री करणाऱ्या चार पीडित महिलांची सुटका

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ फेब्रुवारी :** शहरातील आदर्श कॉलनीमध्ये भाड्याने घेतलेल्या एका फ्लॅटमध्ये वेश्याव्यवसायाचा स्थानिक पोलिसांनी धाड टाकत पर्दाफाश केला. यावेळी एका आरोपी महिलेला अटक करण्यात आली असून, चार पीडित महिलांची सुटका करण्यात आली. याबाबत शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, अनैतिक मानवी वाहतूक आणि वैश्याव्यवसायाला आळा घालण्यासाठी लातूर पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. याअंतर्गत अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने (एएचटीयू) ३० जानेवारीरोजी आदर्श कॉलनी परिसरात धाड टाकून वैश्याव्यवसाय थाटणाऱ्या एका महिलेचे पितळ उघड पाडले. यावेळी एका महिला आरोपीला अटक केली असून, चार पीडित महिलांची सुटका करण्यात आली. दरम्यान, पोलिसांनी महिला आरोपी आणि चार पीडित महिलांना रंगेहात पकडले. याबाबत शिवाजीनगर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम १४३ आणि अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम कलम ३, ४ आणि ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास शिवाजीनगर ठाण्याचे पोलिस निरीक्षक अभिषेक शिंदे हे करीत आहेत.

ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलिस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे पोलिस निरीक्षक अशोक आनंत्रे, सहायक पोलिस निरीक्षक भालचंद्र तिडके, पोलिस अंमलदार सदानंद योगी, प्रकाश जाधव, निहाल मणियार, महिला पोलिस अंमलदार लता गिरी, अंबिका घनगावे यांच्या पथकाने केली.

### दयानंद विज्ञानच्या कॅप्टन डॉ.विजेंद्र चौधरी यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ फेब्रुवारी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभाग प्रमुख कॅप्टन डॉ.विजेंद्र अनंत चौधरी यांच्या फंडामेंटल ॲप्रोचेस अँन्ड ॲडव्हान्स्ड टेक्निक्स फॉर सिंथेसिस ऑफ नॅनोमटेरियल्स या पुस्तकाचे प्रकाशन दि.२६ जानेवारी २०२६ रोजी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या हस्ते झाले.याप्रसंगी संस्थेचे संयुक्त सचिव विशाल लाहोटी,कुणाल कोरे,संस्थेचे इतर सदस्य व पदाधिकारी, संस्थेचे एडिओ डॉ.जयप्रकाश दरगड,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड, प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, प्राचार्य डॉ.पुनम नथानी,प्राचार्य डॉ.क्रांती सातपुते, प्राचार्य डॉ.वाजिद चाऊस, प्राचार्य प्रीती पटवारी, उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे,पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरुडकर,सेल्फ फायनान्सचे प्रिन्सिपॉल प्रा.अनिलकुमार माळी यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा घ्या

### जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे : परीक्षा तयारीचा आढावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ फेब्रुवारी :** जिल्ह्यातील १५२ परीक्षा केंद्रांवर इयत्ता दहावीची आणि १०० परीक्षा केंद्रांवर इयत्ता बारावीची परीक्षा होणार आहे. इयत्ता बारावीची परीक्षा १० फेब्रुवारीपासून तर इयत्ता दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरू होत आहे. या परीक्षा भयमुक्त व कॉपीमुक्त वातावरणात पार पडाव्यात, यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत पूर्वतयारी सुरू आहे. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी नुकताच या पूर्वतयारीचा आढावा घेऊन आवश्यक सूचना केल्या.



शिक्षण उपसंचालक डॉ. दत्तात्रय मठपती, शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांच्यासह शिक्षण विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. लातूर जिल्ह्यातून ३९ हजार २४२ विद्यार्थी इयत्ता दहावी, तर तालुकास्तरावर वॉर रूम... तालुकास्तर, जिल्हा परिषद स्तरावर व जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावर झूम ॲपचा वापर करून वॉर रूम स्थापित करण्यात येणार असून प्रत्येक परीक्षा केंद्रावर त्रिस्तरीय नजर व निगराणी ठेवली जाणार आहे. कॉपी प्रकरणांची माहिती देण्यासाठी टोल फ्री मोबाइल संपर्क क्रमांक प्रसिद्ध करण्यात येणार आहे, प्रत्येक परीक्षा केंद्रास चोख पोलिस बंदोबस्त तैनात असेल. परीक्षा केंद्रवार व परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात येणार आहेत.

३६ हजार ५११ विद्यार्थी इयत्ता बारावीची परीक्षा देणार आहेत. प्रत्येक परीक्षा कक्षात, परिसरात सीसीटीव्ही बसविण्यात येणार आहेत. परीक्षा देत असताना विद्यार्थ्यांनी काय करावे, काय करू नये, याबाबतच्या सूचना प्रत्येक परीक्षा केंद्राच्या सूचनाफलकावर लावण्यात येणार आहेत.

## दगडावर घाव घालून भागविली जाते उपजिविका

**तभा वृत्तसेवा/प्रमोद सुरवसे**

**लातूर, दि. ०१ फेब्रुवारी :** दगडावर घाव घालून आपली उपजीविका भागविली जाते असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही कारण अशोक हॉटेलच्या पाठीमागो धोंडिराम ठेक ळे हे आपल्या कुंटुबास राहतात.



उदरनिर्वाहासाठी पारंपारिक धंदा करतात. धंदा म्हणजे दगड घडवितात त्यातून खलबते 'उखळ' महादेवाची पिंड, विविध देवांच्या मूर्ती बनवतात. त्या विकून आपली उपजिविका भागवतात. या तयार केलेल्या विविध वस्तू विकून महिनाकाठी ३ ते ५ हजारांची मिळकत होते . हे दगड उदगीर येथून मागवावे लागतात त्यासाठी ही खर्च होतो.

दगड घडवून विविध वस्तू र्ती बनवायच्या आणि बे भावाने विकायच्या अशी दिनचर्या असल्याचे धोंडिराम ठेकळे यांनी सांगितले.

ग्राहकांना कामाची कलाकुसरीची कदर नसत्याचे ही ठे कळे म्हणाले.

केवळ ३ ते ५ हजारात भागवायचे करते? आज महागाई प्रचंड वाढत आहे. कलेची कदर करणाऱ्यांची संख्या कमी झाली असून आमचा पारंपारिक व्यवसाय असल्यामुळे नाविलाजातव करावा लागतो शिवाय पावसाळ्यात काम करता येत नाही .

त्यामुळे सरकारने आम्हाला आर्थिक मदत करावी . जेणेकरून आम्हाला आपली उपजिविका भागविणे सोईचे होईल असेही ठेकळे म्हणाले

## रब्बी हंगामासाठी सिंचन प्रकल्पातील पाणी मागणीसाठी ३ फेब्रुवारीपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन


### घरणी, साकोळ, देवर्जन, रेणापूर, तिरू आणि व्हटी मध्यम प्रकल्पाचा समावेश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ फेब्रुवारी :** लातूर पाटबंधारे विभाग क्रं. २ विभाग अंतर्गत घरणी, साकोळ, देवर्जन, रेणापूर, तिरू आणि व्हटी मध्यम प्रकल्प, तसेच ९८ लघु प्रकल्प, साठवण तलाव व बॅरेजस आदी प्रकल्पातील पिण्यासाठी आवश्यक आरक्षित पाणीसाठा वगळता उर्वरित पाणी रब्बी हंगामात सिंचनासाठी देण्यात येणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी ३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत संबंधित पाटबंधारे विभागाच्या शाखा अधिकारी कार्यालयात पाणी मागणी अर्ज सादर करावेत, असे लातूर पाटबंधारे विभाग क्र. २ चे उपकार्यकारी अभियंता यांनी कळविले आहे.

रब्बी हंगाम २०२५-२६ करिता सर्व सिंचन लाभधारकांनी पाणी अर्ज नमुना ७ व ७ अ शासनाने सुधारित केलेल्या नमुन्यात संबंधित शाखा अधिकारी यांचे कार्यालयात पाणी अर्ज भरून शाखा अधिकारी यांच्या कार्यालयात ३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सादर करावेत. तसेच कमी पाण्यात येणारी रब्बी हंगामी पिके प्राधान्याने घ्यावीत. प्रकल्पातील उपलब्ध पाण्याचा विचार करता, प्रवाही सिंचनावरील ऊस आदी बारमाही पिकांसाठी वर्षभर पाणी उपलब्ध राहील, याची शाश्र्वती देता येणार नाही. त्यामुळे बारमाही पिकांची लागवड करताना याबाबीचा विचार करावा आणि काटकसरीने पाणी वापरावे.

अर्जदार हा संबंधित जमिनीचा मालक असणे आवश्यक आहे. पाणी अर्जासोबत सातबारा उतारा सादर करावा. मागील थकबाकी पूर्ण भरावी व रितसर पावती घ्यावी. पाणी मागणी क्षेत्र ०.२० आरच्या पटीत (कमीत कमी ०.२० आर क्षेत्र) असावे. तसेच अर्जासोबत थकीत पाणीपट्टी भरल्यानंतर पाणी अर्ज मंजूर करण्यात येईल. पाणी अर्ज मंजूर झाल्यानंतर पिकास पाणी घ्यावे. आपआपल्या हद्दीतिल शेतचाऱ्या दुरुस्तीची जबाबदारी संबंधित बागायतदाराची राहील. शेतचारी नादुरुस्त असल्यास मंजुरी दिली जाणार नाही व पाणी दिले जाणार नाही. मंजुरीपेक्षा जास्त क्षेत्र सिंचीत केल्यास



हंगामी दराच्या दीडपट दराने आकारणी केली जाईल. पाणी अर्ज न देता पाणी घेतल्यास बिनअर्जी क्षेत्राचे पंचनामे करुन दंडनीय दराने आकारणी करण्यात येईल.

कालव्यावरील उपसा सिंचन परवानाधारकाने त्यांचे मंजूर क्षेत्रास ठरवून दिलेल्या तारखेस पाणी कालव्याच्या शेवटपासून ते सुरवात याप्रमाणे घ्यावे. सिंचन नियोजन असल्यास मंजूर कालावधी सोडून कृषीपंप चालू ठेवल्यास सिंचन अधिनियम १९७६ चे कलम ९७ नुसार विद्युत पुरवठा खंडीत करणे, विद्युत मोटारी जप्त करणे, पाणीपरवाना रद्द करणे, व बिगर पाळी पंचनामा करण्यात येईल. शासनाने वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या प्रचलीत पाणीपट्टीच्या दराने आकारणी करण्यात येईल व त्यावर २० टक्के स्थानीक कर आकारला जाईल. नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा काही अपरिहार्य कारणामुळे अथवा तांत्रिक कारणास्तव पाणीपुरवठा शक्य न झाल्यास व त्यामुळे पिकांचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी पाटबंधारे विभागावर राहणार नाही.

प्रसिद्ध केलेल्या पाणी पालीच्या नियोजनाच्या कालावधीत काही अपरिहार्य कारणास्तव किंवा तांत्रिक अडचणी उद्भवल्यास या जाहीर निवेदनाद्वारे देण्यात आलेल्या पाणी पाळीच्या नियोजनामध्ये बदल करण्याचे हक्क लातूर पाटबंधारे विभाग क्र. २ चे उपकार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवले आहेत. उपसा सिंचन परवानाधारकांनी इतरांना पाणी दिल्यास किंवा मंजूर सिंचन परवान्यातील ५ एचपीपेक्षा जास्त क्षमतेची विद्युत मोटार आढळल्यास सिंचन परवाना रद्द करण्यात येईल. जबरदस्तीने अथवा विनापरवानगी गेट उघडल्यास, कालवा फोडून पाणी घेतल्यास पाटबंधारे अधिनियम १९७६ चे खंड क पोटकलम क व ख अन्वये दंडात्मक आणि कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

कालव्यावरील उपसा व ठिबक सिंचन पाणी परवानाधारकांचे पाणी अर्ज प्रथम प्राधान्याने मंजूर करून एकपट दरानेच अकारणी करण्यात येईल. तसेच ज्या लाभधारकांचे पाणी परवाने उपलब्ध नाहीत, त्या लाभधारकांस विनापरवाना व अनाधिकृत पाणी उपसा समजून संबधितास दिडपट दराने अकारणी करण्यात येईल. त्यामुळे कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त लाभधारकांनी पाणी परवाने घेवूनच सिंचनासाठी पाणी घ्यावे व पाटबंधारे विभागास सहकार्य करावे, असे आवाहन लातूर पाटबंधारे विभाग क्र. २ चे कार्यकारी अभियंता रो. सु. जगताप यांनी केले आहे.

# शिक्षक बस्वराज पटवारी यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा, विद्यार्थ्यांना अश्रू अनावर

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. ०१ फेब्रुवारी :** राचन्नावाडी जिल्हा परिषद शाळेतील बस्वराज पटवारी हे विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून त्यांची ओळख आहे.ते विद्यार्थ्यांना आपल्या मुलांप्रमाणे जिव लावून शिकवणारे शिक्षक असून ते सर्व विद्यार्थ्यांचे आवडते शिक्षक आहेत.पटवारी यांच्या सेवा समप्ती निमित्त गुणगौरव सोहळा ता.३१ जानेवारी रोजी राचन्नावाडी येथील जिल्हा परिषद शाळेत घेण्यात आला सर्वांचे आवडते सर शाळा सोडून जाणार हे विद्यार्थ्यांना चाहूल लागताच विद्यार्थी ढसाढसा रडू लागले.तसेच गावातील नागरिकांचेही डोळे भरून आले होते.बस्वराज पटवारी सरांचेही शाळा सोडून जाताना व विद्यार्थ्यांना सोडून जाताना डोळे भरून आले होते. विद्यार्थ्यांविषयी असलेला लळा या गुरू शिष्यांच्या नात्यातून दिसून आला.



बस्वराज पटवारी यांची ३१ ऑगष्ट १९९५ रोजी जिल्हा परिषद शाळा दोडगाव ता.जिंतूर या ठिकाणी प्रथम नेमणूक झाली तिथेही त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले आहेत आठ वर्षे तिथे त्यांनी विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे काम केले.आजही काही विद्यार्थी त्यांना संपर्क करून सरांनी दिलेल्या शिदोरीची आठवण सांगतात.त्यानंतर तिन ते चार ठिकाणच्या शाळेत त्यानी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे दिले.२०१८ नंतर पटवारी यांची राचन्नावाडी येथे बदली होऊन नियुक्ती झाली.२०१८ ते ३१ जानेवारी २०२६ पर्यंत राचन्नावाडी येथील जिल्हा परिषद शाळेत बस्वराज पटवारी यांनी दुसरीच्या विद्यार्थ्यांना शिकवण्याचे काम केले.त्यांनी विद्यार्थ्यांना आपलेसे करून ज्ञानदानाचे धडे दिले.मध्येच कोरानाचा काळ आला पण बस्वराज पटवारी यांनी कोरोनासारख्या महामारीतही ज्ञानदानाचे कार्य मोबाईलच्या माध्यमातून सुरूच ठेवले.माझा विद्यार्थी शिक्षणापासून दूर राहू नये हीच अपेक्षा त्यामागे होती. विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण भासू न देणारे शिक्षक व सर्वांचे आवडते शिक्षक म्हणून ते परीचीत आहेत.

बस्वराज पटवारी यांच्या सेवापुर्ती निमित्त राचन्नावाडी येथे हलगीच्या निनादात,फुलांची उधळण करीत,रांगोळी काढून, पुष्पहार घालून, मोठ्या उत्साहात शाळेच्या वतीने पटवारी यांना निरोप देण्यात आला.आता विद्यार्थ्यांत राहता येणार नाही,त्यांना सोडून राहवे लागणार, विद्यार्थ्यांचा निरोप घेताना बस्वराज पटवारी यांचे डोळे भरून आले,त्याचबरोबर विद्यार्थी व गावकरीही भावूक होऊन त्यांचेही डोळे भरून आले होते.यावेळी गटशिक्षणाधिकारी मंदोदरी वाकोडे, विठ्ठल माकणे,शेळगाव केंद्रप्रमुख गुरमे व्हि.पी., केंद्रीय मुख्याध्यापक शेख एन.आर, शालेय समितीचे अध्यक्ष सतिश पाटील,माजी अध्यक्ष बबन काळे,गणपत वागलगावे, दयानंद वागलगावे,खंडू वागलगावे सह शिक्षक व विद्यार्थी व विविध मान्यवर उपस्थित होते.

# धनादेश न वटल्याप्रकरणी आरोपीस दंडासह एक वर्षाच्या कारावासाची शिक्षा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ फेब्रुवारी :** कौटुंबिक अडचण व मुलीच्या विवाहासाठी झालेले देणे चुकते करण्यासाठी घेतलेल्या ५० हजार रुपयांच्या कर्जाच्या परतफेडीसाठी दिलेला धनादेश न वटल्याप्रकरणी लातूरचे प्रथमवर्ग सह न्यायदंडाधिकारी न्या. मा. गो. मोरे यांनी आरोपीस १ लाख ३ हजार रुपयांच्या दंडासह एक वर्षाच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, लातूर शहरातील देशपांडे गल्ली, तानाजी चौकातील इस्माईल उस्मान शेख ( ह.मु. औसा ) यांनी राजकुमार नागनाथ कापसे यांच्या मे.सिद्धेश्र्वर मनिलेंडर्स लातूर ( शासनमान्य फायनान्स ) कडून दि. २५ सप्टेंबर २०१६ रोजी सहा महिन्याच्या मुदतीसाठी कौटुंबिक अडचण व मुलीच्या विवाहासाठी झालेले देणे चुकते करण्यासाठी ५० हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. या कर्जाची सहा महिन्यांची मुदत उलटून गेली तरीही त्यांनी मे.सिद्धेश्र्वर मनिलेंडर्सला पैसे परत दिले नाहीत. या रकमेच्या वसुलीसाठी राजकुमार कापसे यांनी सतत तगादा लावला असता इस्माईल उस्मान शेख यांनी युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा लातूरचा धनादेश क्रमांक ०२८४४४ हा दि. ३ एप्रिल २०१७ रोजीचा व्याज व कर्जाच्या रकमेपोटी एकूण ५१ हजार ५०० रुपयांचा धनादेश मे. सिद्धेश्र्वर मनिलेंडर्सच्या नावाने दिला होता. तो धनादेश देय तारखेला इंदिरा महिला नागरी सहकारी बँक, शाखा गांधी मार्केट लातूर येथील खात्यावर लावला. मात्र, सदरचा धनादेश खात्यावर पुरेशी रक्कम उपलब्ध नसल्याच्या कारणावरून न वटता परत आला.धनादेश परत आल्यानंतरही राजकुमार कापसे यांनी इस्माईल उस्मान शेख यांच्याकडे पैशाची मागणी केली. त्यावेळी आरोपीने पैसे देण्यास टाळाटाळीचे धोरण अवलंबल्याने अखेर कापसे यांनी याप्रकरणी कलम १३८ नुसार सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्या. मा. गो. मोरे यांच्या न्यायालयात रितसर तक्रार दाखल केली होती. या प्रकरणी सुनावणी होऊन आरोपीने जाणीवपूर्वक फसवणूक केल्याचे निदर्शनास आल्याने त्याला १ लाख ३ हजार रुपये दंड व एक वर्षाची शिक्षा सुनावली. याप्रकरणी फिर्यादी राजकुमार कापसे यांच्या वतीने ॲड. नसीर एच. शेख, ॲड. ए.आर. टेकाळे, ॲड. वसीम सय्यद, ॲड. प्रवीण शिंदे यांनी काम पाहिले.

# लातुरातील ६० किलोमीटर चारपदरी रिंगरोडच्या डीपीआरला गती

## आमदार अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. ०१ फेब्रुवारी :** लातूर शहर व जिल्ह्याच्या वाहतूक व्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या ६० किलोमीटर लांबीच्या चारपदरी लातूर औटर रिंगरोड प्रकल्पाला मोठी गती मिळाली आहे. आमदार अभिमन्यू पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या प्रकल्पाचा प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यासाठी तज्ज्ञ एजन्सीची नियुक्ती करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (छक-ख) कडून निविदा मागविण्यात आल्या आहेत.

लातूर शहरातील वाढती वाहतूक कोंडी, जड वाहने, शहरांतर्गत दळणवळणावरील ताण आणि अपघातांची संख्या लक्षात घेता औटर रिंगरोडची मागणी अनेक वर्षांपासून नागरिकांकडून केली जात होती. औटर रिंगरोड पूर्ण झाल्यानंतर शहरात न येता रिंगरोडने वाहतूक होणार आहे. त्यामुळे लातूर शहरातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. रिंगरोड चार पदरी असून सुमारे ६० किलोमीटर लांबीचा राहणार आहे. यामुळे लातूर जिल्ह्यातील औद्योगिक, व्यापारी तसेच शैक्षणिक क्षेत्राच्या विकासाला चालना मिळणार आहे.तसेच शेतकरी, व्यापारी, वाहनचालक तसेच सर्वसामान्य नागरिकांना या प्रकल्पाचा मोठा लाभ होणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. तर आमदार अभिमन्यू पवार यांनी समाधान व्यक्त करुन सांगितले, लातूर शहराबाहेरील रिंगरोड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. डीपीआरसाठी निविदा प्रक्रिया सुरू होणे म्हणजे प्रत्यक्ष कामाच्या दिशेने टाकलेले ठोस पाऊल आहे.



या महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी देशाचे रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे आमदार अभिमन्यू पवार यांनी आभार मानले आहेत.लातूर औटर रिंगरोड प्रकल्प प्रत्यक्षात साकार झाल्यानंतर लातूर शहर व जिल्ह्याच्या विकासाला नवी दिशा मिळणार असून, नागरिकांमध्ये या निर्णयामुळे समाधान व्यक्त केले जात आहे.

# पूरग्रस्तांच्या मदतकार्यात दिलेल्या योगदानाबद्दल रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ०१ फेब्रुवारी :** ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे उदगीर तालुक्यातील धडकनाळ व बोरगाव या पूरग्रस्त गावात तातडीने जाऊन मदत कार्य राबविल्याबद्दल रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलचा गोवा येथे झालेल्या रोटरी क्लब ३१३२ च्या कॉन्फरन्समध्ये सन्मान करण्यात आला.




ऑगस्ट महिन्यात उदगीर तालुक्यात महापूराने थैमान घातले होते. या महापुरात उदगीर तालुक्यातील धडकनाळ व बोरगाव ही गावे पुरामध्ये अडकली होती. नागरिकांचे जीवनमान उध्वस्त झाले होते. अशा संकटाच्या काळात या भागातील नागरिकांना तातडीची मदत पोहोचवून पूरग्रस्तांना संकटातून बाहेर काढण्यासाठी रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलच्या पदाधिकाऱ्यांनी मोलाची भूमिका बजावली आहे. रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलच्या या कामाची दखल घेऊन गोवा येथे रोटरी क्लब ३१३२ चे प्रांतपाल सुधीर लातुरे यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या कॉन्फरन्स मध्ये रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलच्या पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलचे अध्यक्ष प्रशांत मांगुळकर, सचिव विक्रम हलकीकर, रामेश्वर निटुरे, चंद्रकांत ममदापुरे, अन्नपूर्णा मुस्तादर,ॲड. विक्रम संकाये, विशाल जैन, गजानन चिद्रेवार, संतोष फुलारी, विजयकुमार पारसेवार, गोपाळ मुक्कावार, मिलिंद मुक्कावार, रामदास जळकोटे, श्रीनिवास चंडेगावे, उदय धुर्वे, मल्लिकार्जुन चिल्लरगे, विजय ढोबळे, महेश गुरमे, राहुल धनाश्री आदी उपस्थित होते.

# रेणापूरात श्रीगुरु रविदास यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर दि. ०१ फेब्रुवारी :** श्रीसंतशिरोमणी गुरु रविदास महाराज यांची ६४९ वी जयंती संत रविदास महाराज मंदिर रेणापूर या ठिकाणी आज रविवार दि.१फेब्रुवार रोजी मोठ्या उत्साहाने भक्तिभावाने साजरी करण्यात आली. या प्रसंगी संत शिरोमणी श्री रविदास महाराज याच्या मुर्तीचा अभिषेक करून विधीवत पुजन करण्यात आले.



सोपात सातपुते यांनीमन चंगा तो कटोती मे गंगा त्याच्या या दोह्याचा अर्थ समजून सांगण्यात आला तसेच मानव सेवा हीच खरी ईश्र्वर सेवा त्याच्या विचाराना या प्रसंगीउजळा देण्यात आला. या वेळीभारतीय जनता पार्टीचे रेणापूर शहरअध्यक्ष अच्युत कातळे याच्या हास्ते आरती करण्यात आली.

कार्यक्रमास संतोष राठोड, मनोज चक्रे, प्रदिप राठोड, बालाजी धोपटे,विशाल परीहार,मारूती माने श्रीगुर रविदास प्रतिष्ठान रेणापूर ट्रस्टचे आध्यक्ष ज्ञानोबा सातपुते,उपा ध्यक्षक्, सोपान सातपुते, किसन शहापुरे,तुकाराम सातपुते, बापू सातपुते,राजू ठोंबरे, नागनाथ सातपुते,अनिल सातपुते, रोहण गायकवाड,सुमित पटणुरे, व सर्व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते उपस्थिताना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

# महिला सक्षमीकरणाची चळवळ तळागाळापर्यंत पोहोचणे गरजेचे : प्रा. डॉ. कुसुम ढोणे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ फेब्रुवारी :** महिला सक्षमीकरण ही आजच्या काळाची गरज असून महिलांचे सक्षमीकरण करण्याकरिता आपल्या देशात महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी महिलांसाठी शिक्षणाची दारे खुले करून महिला सक्षमीकरणाचा पाया रचला. भारतीय संविधानाने राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक क्षेत्रात पुरुष आणि महिलांना समान संधी आणि अधिकार दिलेले आहेत. त्या अधिकाराविषयी समाजातील तळागाळातील महिलांमध्ये जनजागृती करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. कुसुम ढोणे यांनी केले.

# कासार शिरसी गटात जि.प. साठी तिरंगी तर पं.स. साठी चौरंगी लढत

## विविध माध्यमातून प्रचार करण्यात उमेदवार व्यस्त

**तभा वृत्तसेवा**

**कासारशिरसी, दि. ०१ फेब्रुवारी :** होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत आता रंग येऊ लागला असून निलंगा तालुक्यातील व औसा मतदार संघातील कासार शिरसी गटात तीन खमक्या उमेदवारांची जी.प. साठी जोरदार लढत होत आहे. यात भारतीय जनता पक्षाच्या वतीने परमेश्र्वर (नाना) शेषेराव धुमाळ , भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने निलेश राजकुमार चिंचनसुरे तर राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाकडून उमेश रामराव उमापूरे हे तिन्ही मातब्बर युवा उमेदवार निवडणूक लढवत आहेत. या निवडणुकीत प्रत्येक उमेदवार सोशल मीडिया, डोअर टू डोअर, कॉर्नर बैठक व प्रत्यक्ष मतदार भेटीद्वारे आपली बाजू मांडण्याचे जोरदार प्रयत्न करत आहेत. या भागातील समस्या सोडविण्याची आश्वासने देऊन पुढील काळात काय काय कामे करणार याची माहिती मतदारांना देत आहेत.

या गटातील कासार शिरसी गणासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने विवेक भाऊराव कोकणे, वंचित बहुजन आघाडीच्या वतीने युवराज जोगी, राष्ट्रवादीकडून राचय्या स्वामी तर शिवसेना उ.बा.ठा. कडून अजहर मुजावर हे नशीब आजमावत आहेत. तर याच गटातील कोराळी गणातून भाजप च्या वतीने कुसुम भास्कर बिराजदार(पाटील), काँग्रेसच्या वतीने श्रीदेवी लक्ष्मण माने , राष्ट्रवादीतून शांताबाई मनोहर सूर्यवंशी तर शिवसेना उ.बा.ठा. कडून छकुली मंगेश जमादार या नशीब आजमावत आहेत. एकूणच या गटात व गटातील दोन्ही गणात चुरशीची लढाई होणार असल्याचे चित्र सध्यातरी दिसत आहे. प्रत्येक उमेदवार मतदारापर्यंत पोहचून आपले विचार सांगून आप आपला प्रचार करण्यात व्यस्त आहेत.

# प्रा.वैजनाथ सुरनर यांचा सेवापूर्ती सोहळा; ‘ज्ञानरत्न’ गौरव ग्रंथाचे प्रकाशन संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. ०१ फेब्रुवारी :** चाकूर तालुक्यातील झरी बु, येथील सिद्धेश्र्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मराठी विषयाचे ज्येष्ठ व विद्यार्थी प्रिय शिक्षक प्रा.वैजनाथ संभाजी सुरनर यांच्या सेवापूर्ती निमित्ताने भव्य सत्कार सोहळा व त्यांच्यावर आधारीत ‘ज्ञानरत्न’ गौरव ग्रंथाचे प्रकाशन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

या कार्यक्रमास चंचल भारती विद्या विकास मंडळाच्या कार्याध्यक्षा पुष्पाताई विक्रमसिंह दोडके-पाटील, मंडळाचे समन्वयक श्रीहरी पवार,विद्यालयाचे प्राचार्य निळकंठ सकनुरे,माजी प्राचार्य. निवृत्ती कानवटे, माजी प्राचार्या रसिका देशपांडे,माजी प्राचार्य तुकाराम गुरनाळे, मुख्याध्यापक विद्याधर माने, मुख्याध्यापक गुणवंत कदम, प्रा.बाबासाहेब कांबळे,समाबाई सुरनर,कुसुमताई सुरनर, सिद्धेश माने, डॉ. बालाजी सुरनर सह विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली.



कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा.दयानंद झांबरे यांनी केले. सन्मानपत्राचे वाचन लेखक प्रा.मारोती बुद्रुक पाटील यांनी केले. ‘ज्ञानरत्न’ गौरव ग्रंथाच्या संपादक प्रा.दत्तात्रय जाधव यांनी ग्रंथ निर्मिती मागील भूमिका व उद्देश स्पष्ट केला. यावेळी अनिल स्वामी व दशरथ जाधव या माजी विद्यार्थीनी प्रा. सुरनर यांच्या जीवन प्रवासावर व शैक्षणिक योगदानावर सविस्तर प्रकाश टाकला.

यावेळी मंडळाच्या कार्याध्यक्षा पुष्पाताई विक्रम सिंह दोडके पाटील म्हणाल्या की, प्रा.वैजनाथ सुरनर हे विद्यार्थी प्रिय, समाजप्रिय आणि आदर्श शिक्षक म्हणून ओळखले जातात. अध्यापन करताना विषयासोबतच संस्कार, मूल्ये आणि माणुसकीची शिकवण देणारे शिक्षक म्हणून त्यांनी हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव टाकला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रामाणिक प्रयत्न केले. त्यांच्या सेवाभावामुळेच आज अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत आहेत असेही त्यांनी सांगितले

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात माजी प्राचार्य तुकाराम गुरनाळे यांनी प्रा. सुरनर यांच्या कार्याचा गौरव केला, तर अध्यक्षीय समारोप करताना आयोजक प्राचार्य निळकंठ सकनुरे यांनी कार्यक्रम यशस्वी झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.मारोती बुद्रुक पाटील यांनी केले जावेद शेख यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी व्यंकट शिंदगे, बालाजी सोमवंशी, विनय नकाते, सूरज पाटील, मुराद शेख, बालाजी घायाळ तसेच आजी-माजी विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

हा सोहळा म्हणजे एका आदर्श शिक्षकाच्या कर्तृत्वाचा गौरव आणि शिक्षण क्षेत्रासाठी प्रेरणादायी क्षण ठरला.

# महामार्ग प्रशासनाचा आदेश, अहमदपुर मधील अतिक्रमण उद्ध्वस्त



**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. ०१ फेब्रुवारी :** शहराला वाहतूक कोंडीच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी आणि प्रलंबित विकासकामांना गती देण्यासाठी प्रशासन आता पूर्णपणे 'ॲक्शन मोड'मध्ये आले आहे. शनिवारी ३१ जानेवारी रोजी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे मोठी मोहीम राबवत शहरातील मुख्य मार्गांवरील अनधिकृत अतिक्रमणे हटवली आहेत. या धडक कारवाईमुळे गेल्या अनेक दिवसांपासून गुदमरलेल्या रस्त्यांनी अखेर 'मोकळा श्वास' घेतला आहे.

राष्ट्रीय महामार्ग ३६१ (लातूर-नांदेड) आणि ५४८-डी (अहमदपूर-अंबेजोगाई) यांच्या अंतर्गत ही मोहीम राबवण्यात आली. मरशिवणी बायपासपासून ते तात्या पेट्रोल पंपापर्यंतच्या अंतर्गत रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्यात येणार अशी माहिती समोर येत आहे . या कामात अडथळा ठरणारी सर्व अतिक्रमणे, अनधिकृत दुकाने आणि टपऱ्या प्रशासनाने पोलीस बंदोबस्तात जमीनदोस्त केल्या. नगर परिषद प्रशासनाने या मोहिमेत तांत्रिक सहकार्य केले.

शहरातील अत्यंत गजबजलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौक व बसवेश्र्वर चौक नांदेड रोड आणि कॉलेज रोड परिसर सावरकर चौक आणि अंबेजोगाई रोड या भागांतील अतिक्रमणे काढण्यात आली

या मोहिमेवेळी राष्ट्रीय महामार्गाचे अभिषेक रणवीरकर, शिवम वर्मा, नगर परिषदेचे नगराध्यक्ष स्वप्निल व्हत्ते, उपनगराध्यक्ष शेख आयाज मुख्याधिकारी प्रतीक लंबे यांच्यासह नगर परिषदेचे कर्मचारी उपस्थित होते.

कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार, सपोनी केदासे , सफो चिमणदरे पोह हनुमंत अरदवाड, मारुती शिंदे, सुकेश केंद्रे, प्रकाश भोपळे, गणेश चव्हाण, आत्माराम आंबिलवाड आदींच्या पथकाने कडक पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.

**नागरिकांकडून स्वागत, पण 'हे' प्रश्न कायम**

प्रशासनाच्या या धाडसी निर्णयाचे सर्वसामान्य नागरिकांनी स्वागत केले असून रस्ते रुंद झाल्याने वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अर्थसंकल्पात महाराष्ट्राची उपेक्षा; शेतकरी व तरुणांमध्ये निराशा : डॉ. प्रतापसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ फेब्रुवारी -**

केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्रासाठी फारशा मोठ्या किंवा ठोस घोषणा न झाल्याने औद्योगिक राज्यावर निरुत्साहाचे सावट पसरले आहे. करपात्र उत्पन्नाच्या मर्यादेत वाढ होईल, अशी अपेक्षा असताना याबाबत कोणताही बदल करण्यात न आल्याने सर्वसामान्य करदात्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

शेतकऱ्यांसाठी या अर्थसंकल्पात कोणतीही ठोस योजना जाहीर करण्यात आलेली नाही. सत्तेत येण्यापूर्वी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची घोषणा करण्यात आली होती; मात्र प्रत्यक्षात बियाणे, खते व शेतीसाठी लागणाऱ्या इतर साधनसामग्रीच्या किमती वाढल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न



निम्म्यावर आल्याची भावना शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

गेल्या काही वर्षांपासून वाढत चाललेली बेरोजगारी ही गंभीर समस्या ठरत असून, यंदाच्या अर्थसंकल्पातून बेरोजगार तरुणांसाठी मोठ्या घोषणांची अपेक्षा होती. मात्र या अर्थसंकल्पामुळे बेरोजगार तरुणांचा अपेक्षाभंग झाल्याची प्रतिक्रिया उमटत आहे.

### ▸▸ संक्षिप्त वृत्त...



### हर्षवर्धन सपकाळ यांचा इटकळ येथे सत्कार

**मंगरूळ, दि.१ फेब्रुवारी -**

धाराशिव जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूक प्रचारासाठी आलेले महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा इटकळ (ता. तुळजापूर) येथे शुक्रवार, दि. ३० जानेवारी रोजी सायंकाळी भव्य सत्कार करण्यात आला. तुळजापूर तालुक्यातील काडगाव जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीतील महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ सपकाळ इटकळ येथे आले असता, काँग्रेसप्रेमी युवकांच्या वतीने त्यांचे पुष्पहार, शाल, श्रीफळ व जरीटोपी देऊन जंगी स्वागत करण्यात आले. हा सत्कार लियाकत खुदादे, अब्दुल शेख, दयानंद गायकवाड, हसन शेख व काँग्रेसप्रेमी युवकांच्या पुढाकारातून करण्यात आला. यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष धीरज पाटील, प्रदेश काँग्रेस कार्यकारिणी सदस्य मलंग भैय्या शेख, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष रामदादा आलुरे यांच्यासह काँग्रेसचे अनेक मान्यवर नेते व कार्यकर्ते उपस्थित होते.



### शाखाधिकारी औरादे सेवानिवृत्त

**अणदूर, दि.१ फेब्रुवारी -**

येथील धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे शाखाधिकारी गुलाबराव विनायक औरादे हे आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर ३१ जानेवारी रोजी सेवानिवृत्त झाले, त्या निमीत्त त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा अणदूर चे शाखाधिकारी गुलाबराव विनायक औरादे हे २८ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. अणदूर सारख्या मोठ्या शाखेत शेतकरी, कष्टकरी, वृद्ध अनुदान खातेदारांना व्यवस्थित सेवा देणारा अधिकारी म्हणून त्यांची ख्याती होती. धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक सुनील चव्हाण यांच्या हस्ते भव्य सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास अणदूर सोसायटीचे माजी चेअरमन सिद्राम शेटे, व्हा. चेअरमन राजेश देवसिंगकर, राजेंद्र स्वामी, दीपक आलूरे, डॉ. जितेंद्र कानडे, धनराज चव्हाण, संजू शिवकर, सुरेश मोकाशे, संजीव आलूरे, अमर पाटील, मनोहर अहंकारी, सुधीर पुराणिक, चिमणे साहेब, घोडके आदी मान्यवरासह अणदूर, नळदुर्ग, इटकळ, बाभळगाव, चिवरी, फुलवाडी, खुदावाडी येथील शेतकरी, सोसायटी संचालक, सचिव नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तुकाराम बोंगरगे यांनी केले.



### श्री साई जनविकास आयटीआयमध्ये भगवान विश्वकर्मा जयंती साजरी

**धाराशिव, दि.१ फेब्रुवारी -**

व्ही. पी. शैक्षणिक संकुल, छत्रपती संभाजीनगर रोड, धाराशिव येथील श्री साई जनविकास आयटीआयमध्ये दैवी शिल्पकार व सृष्टीचे पहिले इंजिनिअर मानल्या जाणाऱ्या भगवान विश्वकर्मा यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. हा कार्यक्रम डॉ. प्रतापसिंह पाटील व करण प्रतापसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या कार्यक्रमास प्राचार्य अमरसिंह कवडे, प्रशासकीय अधिकारी प्राचार्य डॉ. सुरज ननवरे, कृषी महाविद्यालयाचे व्यवस्थापक प्रा. हरी घाडगे, प्रा. रामचंद्र सुतार, प्रा. सुनील भालेकर, प्रा. काका पौळ, प्रा. सुनील बनसोडे, संकुलाचे लेखापाल प्रा. योगेश मंडलिक, निदेशक सागर सुतार, निदेशक सुनील पुदाले, प्रा.डी.एम. घावटे तसेच आयटीआयचे प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

### नालीचे घाण पाणी साचले; नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

**तुळजापूर, दि.१ फेब्रुवारी -**

आर्य चौक ते किसान चौकी या मार्गावरील रस्त्यावर नालीचे घाण पाणी साचून संपूर्ण रस्त्याला तळ्याचे स्वरूप आले आहे. विशेष म्हणजे अवघ्या दोन-चार महिन्यांपूर्वीच या रस्ता व नालीचे काम पूर्ण झाले असताना, नालीचे घाण पाणी थेट रस्त्यावर येत असल्याने नागरिकांना घाण पाण्यातूनच ये-जा करावी लागत आहे. याच रस्त्यावर असलेल्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिरासमोर मोठ्या प्रमाणात नालीचे पाणी साचल्याने परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. या भागात मोठ्या संख्येने पुजाऱ्यांची घरे असल्याने तसेच भाविकांची वर्दळ असते. त्यामुळे भाविकांनाही घाण पाण्यातून मार्ग काढावा लागत असून, याचा धार्मिक व सार्वजनिक स्वच्छतेवरही विपरीत परिणाम होत आहे. रस्त्यावर घाण पाणी साचल्यामुळे डासांचे प्रमाण वाढले असून दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

# मतदार राजा काय ठरवणार? तेरखेडा गटात थरार

**धनुष्यबाण, घड्याळ, कमळ की मशाल... जि.प. व पं.स. निवडणुकीत चौरंगी लढतीमुळे राजकीय वातावरण तापले...**




**सुधीर घोलप**
**वाशी, दि.१ फेब्रुवारी -**

वाशी तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा प्रचार मतदान केंद्राच्या जवळजवळ पोहोचत असताना राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. मतदानाची तारीख जशी जशी जवळ येत आहे तसे तसे सर्वपक्षीय प्रचार यंत्रणा पूर्ण ताकदीने मैदानात उतरल्या आहेत. गावोगावी वाहनांवरून डिजिटल प्रचार, साऊंड सिस्टिमच्या माध्यमातून घोषणाबाजी सुरू असून उमेदवारांकडून जोरदार शक्तिप्रदर्शन पाहायला मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर वाशी तालुक्यातील सर्वात महत्त्वाचा समजला जाणारा तेरखेडा जिल्हा परिषद व पंचायत समिती गट यंदा चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. या गटातील निवडणूक यंदा अत्यंत रंजक आणि निर्णायक ठरणार असून, येथे चौरंगी लढत होत आहे. तेरखेडा गटात भाजप, शिंदे गट, ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस प्रमुख राजकीय शक्तींमध्ये थेट सामना रंगला आहे. प्रत्येक पक्षाने आपापली ताकद पणाला लावली असून प्रचारात आघाडी घेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. काही पक्षांनी तरुण चेहऱ्यांवर विश्वास टाकला आहे, तर काही पक्षांनी जुन्या नेत्यांना पक्षप्रवेश घेत मैदानात उतरवले आहे. त्यामुळे




ही निवडणूक केवळ व्यक्तींची नसून, जुने नेते विरुद्ध तरुणाई, तसेच रणनीती विरुद्ध संघटनबळ अशी लढत ठरत आहे. सत्ता, संघर्ष आणि स्वाभिमानाच्या या रणांगणात आता अंतिम निर्णय मतदार राजा देणार आहे. असून कोणता पैलवान विजयी होणार हे पाहणे गरजेचे आहे. मतदार धनुष्यबाण उचलणार का? घड्याळाची टिकटिक वाजवणार का? कमळ फुलवणार का? की मशाल पेटवून व्यवस्थेलाच सवाल विचारणार? उत्तर लवकरच मतपेटीतून मिळणार आहे.

## ‘जुनीच दारू नव्या बाटलीत’ अर्थसंकल्प; शेतकरीविरोधी : ॲड. रेवण भोसले

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ फेब्रुवारी -**

केंद्र सरकारने सादर केलेला अर्थसंकल्प म्हणजे जुन्याच योजनांना नवी नावे देऊन मांडलेला ‘जुनीच दारू नव्या बाटलीत’ प्रकार असून, त्यामध्ये शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीबाबत तसेच हमीभावाबाबत कोणतीही स्पष्टता नाही. त्यामुळे हा अर्थसंकल्प गरीबविरोधी, फक्त आकड्यांचा खेळ करणारा व सामान्य जनतेच्या मूलभूत प्रश्नांना बगल देणारा असल्याची तीव्र टीका समाजवादी नेते ॲड. रेवण भोसले यांनी केली आहे.



या अर्थसंकल्पात वाढती बेरोजगारी व गगनाला भिडलेली महागाई कमी करण्यासाठी कोणतीही ठोस तरतूद करण्यात आलेली नाही. हा अर्थसंकल्प केवळ मोठ्या भांडवलदारांच्या विकासासाठी असून शेतकऱ्यांना उध्वस्त करणारा असल्याचा आरोपही त्यांनी केला. काही राज्यांत होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून आश्वासनांची खैरात करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्रासाठी अर्थसंकल्पात खोटी आश्वासने देऊन स्वप्ने दाखवली जात असून केंद्र सरकारच्या या धोरणांचे महायुतीचे पुढारी इमाने-इतबारे समर्थन करत असल्याची टीकाही ॲड. भोसले यांनी केली. सर्वसामान्य करदात्यांना कोणताही दिलासा देण्यात आलेला नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

## फटाका कारखान्याला आग; मोठे नुकसान, जीवितहानी टळली



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१ फेब्रुवारी -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील खामकरवाडी शिवारात माणिकदंड रस्त्यालगत असलेल्या डिझायर फायर वर्क्स या फटाका कारखान्याला शनिवार, (दि.३१) जानेवारी रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास अचानक आग लागली.

कारखान्यातील पत्र्याच्या शेडला ही आग लागल्याची घटना घडली. या आगीत कारखान्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

आगीची माहिती मिळताच घटनास्थळी परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

घटनास्थळी वाशी तालुक्याचे तहसीलदार प्रकाश मेहत्रे, येरमाळा पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी संग्राम भालेराव, प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या टीमने भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

तसेच कळंब व भूम येथील अग्निशामक दल उशिरा घटनास्थळी दाखल होऊन आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला.

## अक्षय हॉस्पिटल व राजगुरू आय.व्ही.एफ. सेंटरतर्फे नि:संतान जोडप्यांसाठी शुक्रवारी मोफत वंध्यत्व तपासणी व सल्ला शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ फेब्रुवारी -**

अक्षय हॉस्पिटल व राजगुरू आय.व्ही.एफ. सेंटर, धाराशिव यांच्या २३ व्या वर्धापन दिनानिमित्त तसेच धाराशिव रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने नि:संतान जोडप्यांसाठी मोफत वंध्यत्व तपासणी व तज्ज्ञ सल्ला शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



हे शिबिर शुक्रवार, दि.६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत आयोजित करण्यात येणार असून, अक्षय हॉस्पिटल व राजगुरू आय.व्ही.एफ. सेंटर, सांजा रोड, धाराशिव येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

दरवर्षी अक्षय हॉस्पिटलच्या वर्धापन दिनानिमित्त हे शिबिर आयोजित करण्यात येते. आतापर्यंत हजारो नि:संतान जोडप्यांनी या शिबिराचा लाभ घेतला असून, अनेकांच्या जीवनात आनंदाचे क्षण निर्माण झाले आहेत. या शिबिरामध्ये नि:संतान जोडप्यांसाठी मोफत तज्ज्ञ मार्गदर्शनासह आवश्यक वंध्यत्व तपासण्या करण्यात येणार आहेत.

या शिबिराचे विशेष आकर्षण म्हणजे गरजेनुसार कॉम्प्युटरद्वारे शुक्राणू तपासणी तसेच महिलांसाठी मोफत सोनोग्राफी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या शिबिरात समस्या असलेल्या नि:संतान जोडप्यांनी या मोफत शिबिराचा लाभ घ्यावा,




असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. शिबिरात सहभागी होण्यासाठी पूर्वनोंदणी आवश्यक असून, नोंदणी प्रत्यक्ष हॉस्पिटलमध्ये किंवा ७३१७३१२७७७ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून करता येणार आहे, असे डॉ. आदिनाथ राजगुरू यांनी सांगितले आहे.

## वैशालीताई मोटे यांची पदयात्रा; स्व. अजित पवारांना श्रद्धांजली अर्पण

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१ फेब्रुवारी -**

जिल्हा परिषद गट जवळा (नि.) येथे स्वर्गीय अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर जिल्हा परिषद गटाचे अधिकृत उमेदवार नानासाहेब भगवान पवार, पंचायत समिती गणाचे उमेदवार हनुमंत कातुरे व प्रतिक्षा मुके यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस नेत्या वैशालीताई मोटे यांनी पदयात्रा व प्रचाराचा शुभारंभ केला.



या प्रचार दौऱ्याची सुरुवात जवळा गावातील दर्गा हजरत निजामुद्दीन येथे नतमस्तक होऊन करण्यात आली. प्रचाराच्या वेळी वैशालीताई मोटे यांचे समस्त ग्रामस्थ, कार्यकर्ते तसेच माता-भगिनींनी औक्षण करत प्रचंड उत्साहात स्वागत केले. दर्गातील पवित्र वातावरणात मनाला अनोखी शांतता व सकारात्मक शक्तीची अनुभूती मिळाल्याचे यावेळी सांगण्यात आले. यावेळी बोलताना मोटे म्हणाल्या की, गेल्या अनेक दशकांपासून समाजकारण, राजकारण, संघटन उभारणी व सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात राहुल भैयांनी केलेले कार्य खरोखरच कौतुकास्पद आहे. वंचित व शोषित समाजाच्या प्रश्नांसाठी त्यांनी केलेला संघर्ष मी जवळून पाहिला आहे.

समाजासाठीची निस्वार्थ धडपड, समाजाच्या हक्कांसाठी लढलेली लढाई व जनतेच्या प्रश्नांसाठी घेतलेली ठाम भूमिका यामुळे त्यांनी जनतेच्या मनात वेगळी ओळख निर्माण केली आहे, असे त्या म्हणाल्या.

## प्रवासादरम्यान सोनं व रोकड चोरी; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ फेब्रुवारी -**

शहर पोलीस ठाण्यात सुवर्णा उदय यादव (वय ४६, रा. खरघर, नवी मुंबई) यांच्या फिर्यादीवरून अज्ञात व्यक्तींच्या विरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, सुवर्णा यादव व त्यांच्या बहिणीसह विश्वा ट्रॅव्हल्स गाडी (क्र. एमएच २५ एजे ७९००) ने हिरानंदानी हायवे, खारघर येथून बोरीवली मार्गे धाराशिवकडे जात असताना दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी रात्री ११.३० ते दुसऱ्या दिवशी सकाळी ७.३० वाजेपर्यंतच्या काळात वडगाव परिसरात अज्ञात व्यक्तीने सुवर्णा यादव यांच्या बॅगमधील ६० ग्रॅम सोन्याचे दागिने, १५,००० रुपये रोख रक्कम व घड्याळ असा एकूण १,९८,००० रुपयांचा माल चोरी केला.

### प्रशासनावर पकड आणि राजकीय समतोल महत्त्वाचा !

राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदी जबाबदारी स्वीकारल्यानंतर सुनेत्राताई पवार यांच्यासमोर अनेक प्रशासकीया, राजकीय आणि पक्ष संघटनात्मक आव्हाने उभी राहिली आहेत. विशेषतः अजित पवार यांची प्रशासनावरील दीर्घकाळापासूनची पकड लक्षात घेता, निर्णयप्रक्रियेत स्वतःचा प्रभाव प्रस्थापित करणे हे मोठे आव्हान मानले जात आहे. प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, खात्यांची कार्यपद्धती आणि धोरणात्मक निर्णयांमध्ये सक्रिय सहभाग घेत सुनेत्राताईंना स्वतंत्र नेतृत्वाची छाप पाडावी लागणार आहे. सत्ताधारी आघाडीतील अंतर्गत समन्वय राखत पक्षांतर्गत गटबाजी आणि सहयोगी पक्षांशी संतुलन साधणेही तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे. राजकीय वर्तुळात सुनेत्राताईंच्या भूमिकेकडे स्वतंत्र ओळख निर्माण करतात का? याकडे लक्ष लागले आहे. केवळ पदापुरते न राहता, धोरणात्मक मुद्द्यांवर स्पष्ट भूमिका आणि विकासकामांतून जनविश्वास संपादन करणे अपेक्षित आहे.

**महाराष्ट्राची परंपरा : लढवय्या व जनकल्याणकारी स्त्री शासक...**

# महिला उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्राताई पवार यांच्यासमोरील आव्हाने

**▸▸ पती निधनानंतरही कणखरपणे उभे राहिले नेतृत्व ; जनसेवेला प्राधान्य**

**अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.१ फेब्रुवारी -**

महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय इतिहासात स्त्री नेतृत्वाची परंपरा केवळ गौरवशाली नाही, तर दिशा देणारी आहे. पतीच्या निधनानंतर आलेल्या आव्हानांना सामोरे जात, प्रशासन, समाजकारण आणि जनकल्याण या तिन्ही पातळ्यांवर प्रभावी ठसा उमटवणाऱ्या स्त्रियांनी या भूमीची ओळख अधिक समृद्ध केली आहे.

माँसाहेब जिजाऊंपासून ते आजच्या काळातील सुनेत्रा अजित पवारांपर्यंत हा प्रवास सातत्य, धैर्य आणि लोकहिताचा आहे. पतीच्या निधनानंतरही खचून न जाता, उलट अधिक कणखरपणे उभ्या राहून राज्यकारभार, समाजकारण आणि जनसेवा यांची धुरा समर्थपणे वाहणाऱ्या स्त्रियांनी या भूमीला समृद्ध केले आहे.

माँसाहेब जिजाऊ या परंपरेचा दीपस्तंभ ठरतात. पती शहाजी राजेंच्या अनुपस्थितीत व नंतरही त्यांनी स्वराज्याची संकल्पना रुजवली, शिवरायांना संस्कार दिले आणि लढवय्या नेतृत्वाची घडण केली. त्यानंतर महाराणी ताराबाई औरंगजेबा समोर स्वराज्याचा झेंडा उंचावून धरत त्यांनी प्रशासन, लष्करी रणनीती आणि जनविश्वास या तिन्ही आघाड्यांवर असामान्य कामगिरी बजावली.

महाराणी अहिल्याबाई होळकर या जनकल्याणकारी राज्यकारभाराचे सुवर्णमानक ठरल्या. न्याय, धर्म, पायाभूत सुविधा आणि लोककल्याण यांचा समतोल साधत त्यांनी प्रजेच्या मनात अढळ स्थान निर्माण केले. त्यांच्या कारकिर्दीतील पारदर्शकता आणि संवेदनशीलता आजही आदर्श मानली जाते.

आधुनिक काळातही ही परंपरा अखंड आहे. रमाबाई आंबेडकर यांनी सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यात अपार कष्ट घेतले. प्रतिभा पाटील यांनी राष्ट्रपतीपद भूषवून देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदावर महाराष्ट्राच्या स्त्री नेतृत्वाचा ठसा उमटवला.

आजच्या काळात सुनेत्रा अजित पवार यांच्यासारख्या नेतृत्वाने सामाजिक बांधिलकी, संघटन कौशल्य आणि जनसेवेची भावना पुढे नेली आहे. परंपरा आणि आधुनिकता यांचा संगम साधत, स्त्री नेतृत्वाचा नवा अध्याय लिहिला जात आहे. सुनेत्रा अजित पवार यांनी समाजसेवा, संघटन आणि जनसंपर्क या माध्यमांतून लोकाभिमुख कामाची परंपरा पुढे नेली आहे. सामाजिक उपक्रम, महिलांचे सक्षमीकरण आणि स्थानिक पातळीवरील सहभागातून त्यांनी आधुनिक काळातील स्त्री नेतृत्वाची ओळख ठळक केली आहे.



सुनेत्रा पवारांच्या माहेरी म्हणजे तेरच्या पाटलांच्या घरात त्यांना राजकारणाचे बाळकडू मिळाले होते. गेल्या ३७ वर्षांपासून सुनेत्रा पवार राज्यातल्या सर्वाधिक प्रभावशाली असलेल्या पवार कुटुंबाचा भाग आहेत. अजित पवारांच्या गेल्या चार दशकांच्या राजकीय प्रवासाच्या त्या साक्षीदार आहेत.

विद्या प्रतिष्ठान, बारामती टेक्स्टटाईल पार्कच्या जबाबदाऱ्या सांभाळताना त्यांनी एक स्वतंत्र जनाधार आपलंसा केलेला आहे. त्यांनी स्वतः लोकसभेची एक निवडणूक लढवली आहे. त्या गेली दीड वर्ष राज्यसभेच्या खासदार आहेत. मतदारसंघातल्या समस्यांची त्यांना जाण आहे.

माँसाहेब जिजाऊंपासून सुनेत्रा अजित पवारांपर्यंतचा हा प्रवास सांगतो महाराष्ट्रात स्त्री केवळ सहभागी नाही, तर ती दिशा देणारी आहे. संकटात न डगमगता, जनहिताला केंद्रस्थानी ठेवून कारभार करणारी ही परंपरा पुढील पिढ्यांसाठी प्रेरणास्त्रोत ठरत राहील.